गावकरांस ॥ १

किरकोळ अंकास......................०४

नोटीशीबद्दल.

१० ओळींचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस.........०१

Advertisements
Below 10 lines...2Rs
Per line over 10..4as
Repetition perline 3as.

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOLXXII AKOLA MONDAY 3 DECEMBER 1888 NO.47

वर्ष२२ अकोला सोमवार तारीख ३ माह दिसेंबर सन १८८८ इ० अंक४७

### नोटीस.

निवनराम वल्लद सुकदेव रहाणार अकोलें यांस गोगाबाई भ्रतार रामप्रताप रहाणार सांगवी इजकडून कळविण्यांत येतें कीं आम्ही मुक्ताराम वल्लद गोंदुराम यानबर अकोलें येथील स्पे० अ० क० साहिब बहादूर यांचे कोर्टांत दिवाणी मुकदमा नंबर २१८ सन १८८८ चा दावा दाखल केला आहे. त्यांत मुक्ताराम यानीं जो करारनामा तुम्ही पंच जाणून तंट्याचा निकाल करावा अशा मतलबाचा दाखला केला तो कोर्टानीं खरा मानला आहे परंतु तुमचे कपट, गैरवर्तन लबाडी पाहून व ऐकून त्या करार नाम्या प्रमाणें तुमचे हातून निकाल होणें इछीत नाहीं त्या करारनाम्यावरून तुह्मांस जो अधिकार आहे तो रद्द केला आहे. कळावे तारीख ३० माहे नोवेंबर सन १८८८ इ०

( सही )

सहीची निशाणी गोगाबाई जवजे रामप्रताप इचे हातची बांगडी

### नोटीस.

मुक्ताराम वल्लद गोंदुराम हल्लीं राहणार आकोले यासीं गोगाबाई भ्रतार रामप्रताप राहणार सांगवी इजकडुन कळविण्यात येतें कीं आम्हीं तुम्हांवर स्पे. अ. कमिशनर साहेब यांचें कोर्टांत दिवाणी मुकदमा नंबर २१८ सन १८८८ चा दावा केला आहे त्यांत तुम्हीं जो करारनामा दाखल केला तो कोर्टानीं खरा मानिला आहे करिता या नोटीसीनें कळविले जातें कीं तुमचे गैर वर्तन कपट लबाडीची कृत्यें माझ्या नजरेस आणि ऐकण्यांत असल्या मुळें सदरील करारनाम्यात लिहिलेल्या दाव्याचा निकाल करण्याचा जिवनराम वल्लद सुकदेव यांस जो अधीकार होता तो या नोटीसीनें रद्द केला आहे तुम्हीं ही त्या प्रमाणें अमल होण्याकडे बघूं नये कळावे तारीख ३०–११–८८ इसवी.

( सही )

सहीची निशानी गोगाबाई भ्रतार रामप्रताप ईची हातची बांगडी.

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

उमरावती ता० ३०।११।८८

ममन—कर्नल स्प्यान्स्की साहेब माजी कमिशनर व ज्युडिशियल कमिशनर यांना ज्यु० क० ची पक्की जागा न मिळाल्यामुळें कालच्या गाडीनें बुलडाण्यास डे० क० च्या जागेचा च्यार्ज घेण्या करितां निघून गेले.

कर्नल बुलक सा० हे हो १ महिना व ७ दिवसांच्या रजेवर त्याच गाडीनें मलकापूरास निघून गेले व तेथून ते पाय रस्त्यानें अजंठा कडेस जाणार असें ह्मणतात.

वरिष्ठ कोण!—माजी ज्यु० क० कर्नल बुलक साहेब यांनीं मि० हरिहर काशीनाथ डिपुटी क्लार्क आफ कोर्ट ज्यु० क० चे आफीस. यांना तारीख १९-२० रोजीं त्याच आफिसांतील क्लार्क मि० काशीनाथ यादव काळे यास तारीख २१-२२ रोजीं च्यार्ज देऊन आकोल्यास स्मालकाज कोर्टांतील क्लार्क अ.फ कोर्ट यांजपासून च्यार्ज घेण्याविषयीं हुकूम दिल्याचा फार बोलबा आहे. सरासरी ७-८ दिवस होऊन गेले अद्याप हुकुमाची अंमलबारी झाली नाहीं. यावरून ते प्रकरण सुपरिन्टेन्डेन्ट, अगर दुसरे कोणी तरी, यानीं दाबून टाकिलें असें दिसतें. मग ज्यु० क० श्रेष्ट! किंवा हुकूम दाबणारा? हें खरेंच असल्यास ज्यु० क० याच्या हुकमाचा कांहींच मान राहिला नाहीं.

नेटीव कारकून लोकांची अनास्था— एखादा युरोपिअन, नेटीव खेरीज करून जें काय करील तें मान्य होतें. या आठवड्यात येथें रेसीस, व गुरांचें प्रदर्शन होतें व त्यामुळें सर्व कारकून लोकांस सुटी मिळणें जरूर होतें, परंतु बहुतेक आफिसांतून आणि ज्यु० क० चे सुद्धां नेटीव लोकांस सुटी दिली गेली नाहीं. याचें कारण काय? ते लोक कामें बराबर करीत नाहींत कीं काय? त्याच प्रमाणें रजेचें. एखाद्या युरेजियन क्लार्कीला किती ही अडचणी असोत. रजेला अर्ज केला कीं रजा मंजूर. परंतु नेटिव क्लार्कची गोष्टच निराळी. रजेचा अर्ज एकदां हेडक्लार्क अगर सुपरिंटेंडेंट याजपाशीं वरिष्ठ अंमलदाराकडेस पाठविण्यास दिला कीं तो त्याजकडेस जाणेंच कठीण मग रजा कशाची मंजूर होणार. सदरहू प्रसंग एका नेटीव ज्यु० क० चे आफिसांतील क्लार्कवर आलेला आहे असें ऐकितों. अद्याप त्या इसमाचें नांव वगैरे समजलें नाहीं. समजल्यास कळवीन. इकडेस वरिष्ठ अंमलदार लक्ष पुरवितील अशी पूर्ण आशा आहे.

आपला

“ स ”

मुक्काम वाशीम २८।११। ८८ इ०

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः — कृतानेक साष्टांग नमस्कार वि. वि. मध्यें थंडी पडूं लागली होती. परंतु काल परवां दोन दिवस पुनः मेघडंबर आलें होतें. आंग भिजे पर्यंत पाऊसही पडला. आज पुनः आकाश स्वच्छ झालें आतां इतक्यांत पाऊस नको असें लोक ह्मणतात. पिकें चांगलीं आहेत. कपाशीचीं कामें करण्यांत लोक गुंतले आहेत. हल्लीं हुर्डा तयार झाला आहे. तो भक्षण करण्या करितां लोक आपापल्या स्नेही, आप्त वगैरे परिवारासह केव्हां केव्हां जात असतात. गांवांत देवींची सांथ आहे किंचित कमी आहे. हवेंत जसा कमी जास्त फरक होतो त्या मानानें ती कमी किंवा जास्त होते. दयाळू सरकारानें देवी न याव्या ह्मणून देवी खातें ठेविलें आहे. तर मूल उपजलें ह्मणजे नियमित वेळांत त्या काढवून घेण्या विषयीं लोकांनीं हयगय करून आपल्या प्रिय बालकांचे जीव धोक्यांत घालूं नये, व रोगाला बिऱ्हाडास जागा देऊं नये. जगनियंत्याची इच्छा निराळी आहे. ती आपल्या चरम दृष्टीनें दिसत नाहीं. व कोत्या बुद्धीनें समजत नाहीं तरी उपायही त्यानेंच योजून ठेविले आहेत. ते करण्यास मनुष्यांनीं चुकू नये. सुख दुःखांतही ईश्वरेच्छा आहेच.

मे. जिल्हाधिपति मंगरूळपीराकडे फिरत आहेत असें ह्मणतात. तसेंच मे० असिस्टंट कमिशनर साहेब बहादूर यांचीही स्वारी बाहेर आहे. लोकांच्या हिता करितां सरकारी कामगार दक्ष असतात. न्यायाभाव न व्हावा या विषयीं झटतात. हें यांना मोठें भूषण होय. मे. हेड मास्तर साहेब इं. म. शाळा वाशीम व मे. डे. एज्यूकेशन इन्स्पेक्टर साहेब जिल्हे वाशीम या उभय साहेबांच्या स्वाऱ्या अकोल्यास मास्तरांच्या सभे करितां गेल्या होत्या त्या परत येऊन आपापल्या कामीं रुजूं झाले. व मे. डे. ए. इन्स्पेक्टर यांची स्वारी शीरपुराकडे फिरावयास गेली. पुसद व मुळावा येथील मास्तर त्याच सभे करितां अकोल्यास गेले होते ते परत गेले. ‘वऱ्हाड शिक्षक समाज’ हा मोठ्या महत्वाचा विषय लोकांना व इतर विद्या वृद्धीच्छु लोकांना विचार करण्या सारखा झाला आहे. ईश्वर कृपेनें हा चिरकाळ भरभराटास आला पाहिजे. याची योग्यता इतर प्रांतांतील लोकांना कळून तेही अनुकरण करितील तर त्यांना ही फायदा होईल.

कित्येक वेळा सुधारणुकेच्या असतात. एकोणिसावें शतक हें सुधारणुकेचें आहे ह्या शतका मध्यें आपल्या ह्या हिंदुस्थानांत नाना प्रकारच्या पश्चिमात्य कला सुरू झाल्या. विद्या वृद्धि झाली अजून हा पुढें नाना प्रकार लोकांच्या सुखासाठीं इतर उत्पन्न कारणारच आहे व ह्या सर्व कळा व सुखें राज्यकर्त्या पुरुषांच्या हातून रयतेला मिळावयाचीं. व राज्य कर्ते जरी पंधरा हजार मैलां वरून सात समुद्रांच्या पलीकडून आले आहेत तरी रयतेला चांगले जपतात. तिच्या हिता करितां अनेक उपाय करितात आतां त्या सुखांचा उपभोग घेणें ज्याच्या कपाळीं नसेल त्यांना तें जर न मिळेल तर गोष्टी निराळ्या आहेत. परंतु राज कर्त्यांचे हेतु चांगले असतात हें येथें सांगण्याचे कारण आमचे वाशिमस्थ लोकांचे सुदैवानें येथें एक जिल्हाधिपती व टाऊनहाल ( Town Hall ) बांधीत आहेत. ही ईमारत चावडी समोर गढींत बांधण्या करितां जागा तयार होत आहे. पांच हजार रुपयां पर्यंत ही इमारत बांधण्यांचे ठरल्याचें लोक बोलतात. ह्या कामास पैसा जमा करण्या करीतां एक दोन वेळ सभा ही भरल्या होत्या असें म्हणातात. जुबिली पैकी शिल्लक असलेली रक्कम ह्या कामीं लागावयाची आहे असें म्हणतात. अशी ईमारत ह्या गांवी होते त्या बद्दल जिल्हाधिपतीची जितकी स्तुती करावी तितकी थोडीच. ह्या ईमारतीला जुबिली वाशिमहाल असें नांव देतील असें कित्येक म्हणतात. कोणतें कां नांव देतना ईमारत होते ह्या बद्दल आम्ही फार तारीफ करितो. अशीच येथें धर्मशाळेची फार जरूरी आहे ह्या बद्दल उतारू लोकांना फार त्रास होतो सबब मनुष्य कोणी आला तर त्यास उतरण्यास कोठें कोठें जागा नाहीं. आतां ज्याच्या ओळखी असतात तेथें तो उतरतो. ही गोष्ट निराळी. परंतु सर्वच लोकांच्या ओळखी कोठें असतात? आतां श्रीबालासाहेबाची धर्मशाळा आहे. तींत अठरा प्रकार जातीचे लोक उतरतात. तेथें धर्मांचा कांहीं प्रतिबंध ठेवण्याचें साधन राहत नाहीं. तेव्हां अशी एखादी धर्मशाळा व्हावी कीं जशी आपल्या अकोल्यास झाली आहे. ही गोष्ट जिल्हाधिपतीच्या लक्ष्यांत पुढारी लोकांनीं आणून दिली पाहिजे. त्यांनीं मनावर घेतल्यास फार आयास पडतील असें नाहीं. त्यांच्या कारकिर्दींत हें मोठें काम होईल अशी आशा आहे.

येथे गोदेश्वरी एक सरकी काढण्याचें यंत्र बांधण्याचें काम चालले आहे. अशीं यंत्र येथें होणें जरूर आहे. या पासून सुधारणुकेचें पाऊल पुढें आहे असें होतें. लोकांना काम धंदे लागतात. व्यापाराच्या सवयी उत्पन्न होतात. आगगाडीचें गमन ज्या दिवशीं होईल. त्या दिवशीं येथें अशीं यंत्र व कारखाने पुष्कळ सुरू होतील परंतु तो सुदीन येणें आमच्या कपाळीं कोठचें. परंतु दुष्काळ पडेल तेव्हां आगगाडी यावयाची असें ठरल्याचें बोलण्यांत येतें. असेंच जर असेल तर ईश्वरा तो दुष्काळाचा प्रसंग नको व ती आगगाडीची मौजही नको. मग सांप्रतची स्थिती आहे तीच बरी दुष्काळ पडल्यावर आगगाडी आली तर जीं मनुष्यें त्याच्या तडाक्यांतून वांचतील तींच त्या आगगाडीचा उपभोग घेणार असेंच आहे तर मग अशी अगोदर जीव घेऊ आगगाडी पाहिजे तरी कशाला. अशा दुर्भिक्ष प्रसंगाची वाट न पहातां सरकारनें इतर ठिकाणीं जशी केली त्या प्रमाणें इकडेही ती केल्यास सरकारला व रयतेला फायदा होईल.

गेल्या आठवड्यांत येथें उमरावतीचे प्रसिद्ध वकीलांपैकीं एक रा. रा. मोरो विश्वनाथ जोशी बी. ए. एल. एल्बी यांची स्वारी एका मुकदम्यांत येथें आली होती हे गृहस्थ आपल्या कामांत फार हुशार असून आपल्या कळां विषयीं फार कळ कळ बाळगणारे आहेत. हे फारच फार सज्जन असून मोठे विद्वान आहेत. यांचे आंगीं विद्येचा अगर पैशाचा गर्व मुळींच नसून वृत्ती अगदीं सा-

धी. नाहींतर आमचे वाशीमचे नुतन विद्वान पांचवी सहावी ईयत्ता मोठ्या कटकटीनें झाली कीं लागलेच छाती वर काढून चालूं कागतात. त्यांना आकाश पाताळ एक होऊन जाते. तर बाबानो या मोठ्या मोठ्या विद्वानांचा कित्ता घ्या. अशा अर्ध्या हळकुंडानें पिवळे होऊं नका. विद्येनें जे फायदे होतात त्याचा विचार करा. विद्या शिकलेले व न शिकलेले यात भेद आहे असें दाखवा. नोकरी करितांच केवळ विद्या शिकावयाची नाहीं. विद्या हें भूषण आपल्या शरीराला, कुळाला, नांवाला आहे. असें समजा विद्या विहिनः पशुः असें आपण वाचतां. तेव्हां विद्या शिकून तसें होऊं नका. हे शब्द आपल्या हृद पटावर लिहून ठेवा.

राष्ट्रीय सभे विषयीं अजून ह्या जिल्ह्यांत उद्योग कोणी करीत नाहींत. हे या जिल्ह्याचें दुर्दैव समजलें पाहिजे. जे जे येथें विद्वान लोक बाहेरचे येतात. ते कांहीं तरी हात पाय हालवितील असें वाटत असतें. परंतु घांटावरची थंड हवा लागली कीं थंडीच्या योगानें त्यांच्यांत शिथिलता होते ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. आह्मी ह्मणतों आमच्या येथील स्वतंत्र लोकांना ही बुद्धी होत नाहीं. त्यांचिवर थंड हवेचा परिणाम होतो परंतु हा त्यांनाच बोल नाहीं. बाहेरून जे येतात त्यांची अशीच दशा होते. कन्या कुमारी पासून ही मालया पर्यंत जो हिंदुस्थानची हद्द आहे त्या सर्वत्र ठिकाणीं राष्ट्रीय सभे बद्दल कोठेंच चर्चा झाली नाहीं. कोठें मेंबर निवडले गेले नाहींत. कोठें त्या सभे विषयीं लोकांनीं औदासिन्य दाखविलें कोठें आपल्या जन्मभूमीच्या सेवेपासून परान्मुख झालेले असें जर एखादे जिल्हापद पावलेलें मोठें ठिकाण हिंदुस्थानांत असेल तर तें वाशीम होय इतकी येथें राष्ट्रीय सभे संबंधें निष्काळजी असावी असें कोणाच्या स्वप्नीं ही नव्हतें. कदाचित येथील लोकांनीं राष्ट्रीय सभेला हातची सोडली तरी आमचे वऱ्हाडचे खरे हितचिंतक रा- रा. देवराव बाबा व मिस्तर ह्यूम हिंदुस्थानचे हितचिंतक हे हर तऱ्हेनें कार्यसिद्धी विषयीं झटत आहेत तों पर्यंत राष्ट्रीय सभे विषयीं किती ही कोणी औदासिन्य दाखविलें तरी अशा आमचे वाशीमस्थ लोकांचे दाखविण्यानें एक काडी ही वांकडी व्हावयाची नाहीं. अहो डामरगांव ते काय व तेथें पंधराशे लोक जमून विचार करितात व नागपुरासारख्या ठिकाणाहून प्रसिद्ध वक्ते येऊन सभेचा उद्देश लोकसमाजास समजावतात काय अशा लोकांना पाहून तरी आमच्या वाशिमस्थ लोकांना हुरुप यावा परंतु इतके करितो कोण येथें स्वतंत्र लोक आहेत वजनदार आहेत. हुशार आहेत खटपट केली तर त्यांना यश येईल. सर्व गोष्टी होतील. परंतु ह्या गोष्टी करितो कोण!! आलाहाबादेस सभा भरण्याची वेळ जवळ आली. वऱ्हाडांतील वासिम (जिल्हा) शिवाय करून सर्व ठिकाणी आकोला जिल्ह्यांत खेड्या पाड्यांना ही या बद्दल लोकांत हितचिंतकांनीं गोडी उत्पन्न केली. असें असतां सर्व कामी आमच्या जिल्हा जिल्हानें मागें पडावें ना!! कांहीं दिवसांपूर्वीं येथें बाबा साहेब आकोल्याहून आले होतें तेव्हां स्वतंत्र मंडळीला जो थोडासा राष्ट्रीय सभेचे कामीं लक्ष देण्या बद्दल उपदेश केला त्या उपदेशाचा प्रत्येक शब्द नित्य लक्षांत वागविण्या सारखा आहे तो उद्देश अमोल्य आहे. तेव्हांच बाबासाहेब सभा भरविणार होते. परंतु त्या वेळीं अकोल्यास सर्व जिल्ह्याची सभा भरावयाची होती, सबब त्यांना तिकडे तारांबळीनें जाणें भाग पडलें. व त्यांनीं इकडे केलेल्या उपदेशाप्रमाणें कांहीं झालें नाहीं. तसेंच मि. जोशी कांहीं करतील असें वाटलें होतें. परंतु त्याना ही वेळ न सापडल्यामुळें ते ही गेले. एकूण आमच्या येथील लोकांनीं कांहीं हात पाय हालवून सभा भरविण्याचें मनांत येत नाहीं. बरोबरचा कोणी आला तर त्याला वेळ सापडत नाहीं तेव्हां व्हावे कसें. एकुण राष्ट्रीय सभेच्या पटांत आमच्या वाशिमच्या नांवावर काळा डाग लागावा नाहीं धन्य बाबानो! आपल्या सुखाकरिता कोणी जपतोच. परंतु ह्या आर्य भूमीची सेवा करणारा सुपुत्र जो तो खरा सुपुत्र. वाशिमस्थ पुढारी स्वतंत्र लोक हो. उठा बघतां काय राष्ट्रीय सभेची खेड्या पाड्यात लोकांना गोडी लावा. सभा भरवा. तिचे उद्देश लोकांना कळवा. ही सभा सरकारच्या विरुद्ध नाहीं. पुढें मागें तुम्हाला नाहीं तरी तुमच्या वंशजांनां ह्या सभे पासून फायदा होणार नाही म्हणून कशा वरून. जे आज सुपुत्र ह्या सभे करितो रात्रंदिवस झटत आहेत त्याना कांहीं प्राप्ती होत आहे काय! पत्रकर्तेराव हा विषयीं पुन्हा:पाहू. हे विनंती.

आपला.

'क्ष'

## जाहिरात.

राजमाचीकर व साठे न्यायाश्रयकर्ते पुणें यांनीं नवीन तयार केलेला.

हिंदुस्थानचा करारचा आक्ट.

सन १८७२ चा ९ वा

समजुतीच्या टिपा व मुंबई, कलकत्ता, मद्रास व अलाहाबाद हायकोर्टाचे निवाड्यां सुद्धां

किंमत रु० २॥ व टपाल खर्च ०६ आ.

ही पुस्तकें आमचे छापखान्यांत व सदाशिव काशीनाथ आणि कंपनी यांचे दुकानीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार.

मिती कार्तिक वद्य ३० शके १८१०

## सर आकलंड कॉलव्हीन आणि नॅशनल कांग्रेस.

सध्यां लोकांच्या मनांत चळवळ उत्पन्न करणारा विषय राष्ट्रीय सभेसारखा दुसरा कोणता ही नाहीं. जिकडे पहावें तिकडे याच विषयावर गडबड चाललेली दिसते. कोठें व्याख्यानें, कोठें पॅम्फलेटस, कोठें वर्तमानपत्रांत मोठमोठाले लेख यांची सध्यां गर्दी उडून गेलेली आहे. राष्ट्रीय सभेचे संस्थापक व त्यांचे प्रतिपक्षी यांचे पूर्वपक्ष उत्तरपक्ष एक सारखे चालले आहेत. यांत विशेष नवल वाटण्या जोगी गोष्ट ही. या झगड्यांत मोठमोठे सरकारी अधिकारी, कीं ज्यांचा या गोष्टीशीं संबंध असेल असें स्वप्नीं देखील यावयाचें नाहीं, अशांचा संबंध येऊं लागला आहे. कांहीं दिवसांपूर्वीं मुंबईचे गव्हरनर लार्ड रे साहेब हे राष्ट्रीय सभेच्या अगदीं विरुद्ध आहेत इत्यादि मजकुराची कार्ड कोणी प्रतिपक्ष्यांनीं उठविली होती परंतु त्या थोर मनाच्या पुरुषानें वर्तमान पत्रद्वारें आपलें खरें मत प्रसिद्ध करून उलटें राष्ट्रीय सभेस अनुकूळ असें आपलें मत आहे हें जाहीर केलें तेव्हां त्यांचे दात पडले. हें प्रकरण होत आहे. तोंच वायव्य प्रांताचे लेफ्टनंट गव्हरनर सर आकलंड कालव्हीन हे राष्ट्रीय सभेच्या विरुद्ध आहेत व आपल्या हाताखालचे जे अधिकारी या सभेला मदत करितात त्यांवर यांची गैरमर्जी होत असते वगैरे मजकूर कोणी प्रसिद्ध केला. त्यावरून मशारानिल्हे साहेब यांनीं सभे संबंधानें आपली मतें पत्रद्वारें प्रगट केली. सध्यां याच पत्रा संबंधानें चर्चा जिकडे तिकडे सुरू आहे.

सर आकलंड कालव्हिन साहेबांच्या हातून आजपर्यंत जीं जीं कामें झालीं आहेत त्यांवरून ते हिंदुस्थानचे एक मित्र आहेत असा लोकांचा समज झाला होता, व अझून ही हा समज खोटा असेल असें आह्मांस वाटत नाहीं. आतां राष्ट्रीय सभे संबंधानें साहेब बहादूर यांनीं जें पत्र लिहिलें आहे त्या वरून त्यांची प्रकृती फार नाजूक आहे असें दिसतें. गुदस्त साली मद्रास येथें भरलेल्या राष्ट्रीय सभेचा रिपोर्ट प्रसिद्ध होईपर्यंत साहेब बाहादूर या सभेच्या तर्फेचे होते ते इतके कीं त्यांनीं प्रसिद्ध ह्यूम साहेब यांस बोलून ही दाखविलें कीं कलकत्ता येथें लार्ड डफरिन साहेब व मद्रास येथें लार्ड कॉनिमारा साहेब यांनीं सभेस जी मदत दिली व सभेचा जो परामर्ष घेतला तसाच यंदा अलाहाबादेस लोकांनीं व सरकारी अधिकाऱ्यांनीं घ्यावा. साहेब बहादुर यांचें मत सभेविषयीं इतकें अनुकूळ असतां एकाएकीं इतकें कां बदललें हें समजत नाहीं. या सभेंतील ठरावांत साहेबांस वाईट वाटण्या जोगें कांहीं होतें असें मानावें तर रिपोर्ट प्रसिद्ध होण्यापूर्वीं कित्येक दिवस अगोदर ठराव प्रसिद्ध झाले होते. बरें त्या सभेतील भाषणांत कांहीं असेल असें म्हणावें तर तीं ही पुष्कळ दिवस अगोदर सार्यंत बाहेर कळलीं होतीं. असें असतां एकदम असें मतांतर कां आलें!

कालव्हीन साहेब यांचे मुख्यअपवाद सभेनें आपले उद्देश सिद्धीस नेण्या करितां ज्या रिती योजिल्या आहेत व ज्या साधनांचा उपयोग केला आहे त्यांवर आहे. मि. ह्यूम यांनीं अलाहाबादेस व्याख्यान दिलें त्यांत या रीती दोन प्रकारच्या सांगितल्या आहेत. पहिला प्रकार हा कीं राज्यप्रकरणीं तत्वांची माहिती लोकांस सुलभ रीतीनें होईल अशा रीतीचीं व्याख्यानें वगैरे द्यावींत व दुसरा, प्रजेचे हक्क काय आहेत व त्यांचीं कर्तव्य कर्में काय आहेत त्यांची माहिती होण्या करितां लोकांस सोप्या रीतीनें देशभाषेंत लिहिलेलीं पुस्तकें वगैरे वाटावींत. कालव्हीन साहेब ह्मणतात कीं या रीतीने गुदस्ता मद्रास ईलाख्यांत तेथील देश भाषेंत जीं पुस्तकें वाटण्यात आलीं त्यांत ब्रिटिश राज्या पासून हिंदुस्थानास जे फायदे झाले आहेत त्याचा कोठेंहीं उल्लेख केलेला नाहीं. उलट ब्रिटिश सरकार आपल्या वर जुलूम करित आहे असें लोकांच्या मनावर ठसावें अशा रीतीची रचना त्या पुस्तकाची केलेली आहे. यात आकलंड साहेबास राजद्रोहाचीं काय चिन्हें वाटलीं असतील तीं त्याचीं त्यांसच ठाऊक. येवढ्यावरूनच राष्ट्रीय सभा म्हणजे राजद्रोहाचें भांडार असा तर्क त्यांनीं सर सय्यद प्रमाणें काढिला हे मोठें आश्चर्य आहे. या पुस्तकाचा उद्देश फक्त प्रजेला आपले हक्क व कर्तव्य कर्में समजाऊन देण्याचा होता. इंग्रज सरकारच्या राज्याचें सर्व वर्णन त्यांत करावयाचें नव्हतें. असें असल्यामुळें तसले उल्लेख त्या पुस्तकांत अप्रासंगिक झाले असते. परंतु येवढ्यावरून प्रजेनें आजपर्यंत दाखविलेली राजनिष्ठा लयास गेली काय? इंग्रज सरकारच्या राज्यापासून हिंदुस्थानास किती हीत झालें आहे हें हिंदुस्थानची प्रजा विसरत नाहीं यास किती पुरावे देतां येतील. महाराणीचा जन्मदिवस, ज्युबिली किंवा यासारखेच नेहमी येणार प्रसंग यावेळीं हिंदुस्थानवाशी जनांच्या अंतःकरणाचे कसे उद्गार निघतात हें आकलंड साहेब विसरले काय? गुदस्त सालच्या राष्ट्रीय सभेस सुरुवात करितांना सरटी माधवराव, व तय्यबजी यांनीं भाषणें केलीं त्यांचें स्मरण साहेब बहादुरास राहिलें नाहींसें वाटतें. ज्युबिलीच्या वेळां तर आमच्या हिंदुस्थान वाशी जनांनीं राजनिष्ठेत खुद्द इंग्लंडवर तार केली असें असतांही राजद्रोहाचा आरोप त्यांच्या माथीं पडतो हें नवलच आहे.

# The Berar Samachar

MONDAY DECEMBER 3, 1888.

## THE LAST WEEK AT AMRAOTI

(From a correspondent)

On Sunday 25th November Amraoti witnessed a grand meeting on account of the election of delegates for the coming National Congress at Allahabad. A vast Mandup had been erected on the open site near the Gamdapur Maruti's temple not far from the place where the cattle show Mundup was erected Some four thousand people from the town and from various parts of the District had come together for the elections. Mr. Dorabji the Special Magistrate at Murtizapur was called to the chair and when he had taken his seat on the *dais* the meeting was formally opened by him. Mr. P. N. Jog of the local bar then made a speech dwelling on the infinite blessings conferred upon this country by British rule and the necessity of making loyal and constitutional representation through an elected

body like the Congress. Some of the Tahsildars of the Talooks and Mr. Priestley of the Amroti Police were mere spectators of the scene. The whole was a splendid gathering of Hindus and Mohamedans, and a rather curious feature of the whole meeting was the address of a Mohamedan gentleman who volunteered to speak in favor of the Congress. Mr. R. N. Mudholker also of the local Bar, made a short speech regarding the Congress. It was then resolved to send delegates to the coming Congress on behalf of the Amraoti District. Mr. Mudholker, Mr. Katkar and three others were elected to represent the district and the meeting concluded with the singing, of the National authem in Marathi and three cheers for the Queen—Empress.

The next scene was a 'Go—Rakshine Sabha' or a meeting for preservation of cows. This took place in the same *Mándap* and Mr. Yeshwant Govind editor of the 'Pramod Sindhu' dwelt on the utility of the cow as a factor in the domestic economy and asked the meeting to appoint a committee to collect funds and to take measures to preserve the cows. A Marwadi gentleman from Nagpur also addressed the meeting in Hindustani and his speech deliverud with great warmth of expression was met with applauses from the meeting. A committee of influential sowcars was appointed to do the needful in the mattor. Great pains had been taken by Mr. Eknath Laxman and Keval Chand Sett to get up the *Mandap* and other arrangements concering it. Handsome donations were offered by 3 leading sowcars of Amraoti and a list of others is being made out. The vast assemblage of people was attributable to the occurrence of this meeting and the Congress meeting at the same time.

The cattle show at Amraoti opened here on 23rd November. The cattle are very poor indeed; and considering the small prizes offered no very good animals could be expected at the show. There were als sports and races here in connection with the show and on the camp side there were horse races also. The show ended with the distribution of prizes on 30th November.

It may not be amiss to bring to the notice of the authorities that be, the great hardship caused to outsiders by the time over which the show was extended. It is absurd to detain people at harvest time for 8 days together. The grass supplied to them gratis was also of a doubtful kind. Many of the animals rejected it and people had to feed them at their own cost. The state of things may, it is hoped, be remedied at the next show.

The library has been opened on Wednesday 28th November. The Commissioner and other officers were present besides the native gentry. Mr. Purushotamrao Judge Small Cause Court Amraoti gave the history of the city Library and the usual Pan Supari followed. The building is really a grand one and the labours of two gentlemen Mr. B. L. Bapat and Mr. Janardhan Shastri have been ceaselessly bestowed upon the building for one year and more. Under their personal superintendence the city has been adorned by a capital library.

---

For a number of years we have been receiving, and acknowledging the receipts of, the different departmental reports in the same unvarying mode and fashion. Therein we did our duty and duly as such. But this year the task has become a pleasure and we shall earnestly pray to Government to make it stable and permanent. To do so the government must confirm our popular officiating Resident and we shall bless ourselves if this suggestion proves a fact. This year's reports have a different aspect and a new tone from those of the previous ones. They may well serve as manuals for reporters, reviewers and critics. The former may find in them lessons and directions for future guidance and the latter may learn where to touch and where to strike.

Why we find a separate chord struck in our associations and why we are drawn away from the trodden path of presenting short abstracts of the different reports with their reviews by the Resident would perhaps appear a puzzle to our readers. But the mystery is an open secret. Even the unimportant report—we name it so because it is treated so long as such—on arboriculture in our province for the year 1887-88 is reviewed by the officiating Resident in a manner laudable and peculiar to himself. The report extends over some four pages with its official formulœ and statistical tables, and the valuable review upon it comes nearer to the same length.

The first world—wide contrast that may occur even to the mind of a chance-reader is involved in the divergent opinions of the reporter and the reviewer. Colonel Szczepanski writes a new para to remark that 'the results of the year under report have been more *satisfactory* than those of the previous year' while Mr. Howell begins his resolution with 'this report is a mass of confused *inconsistencies* which cannot be explained by any possible variation in the soil climate, or facilities for arboriculture in a small province like Berar, though they may possibly be due to the varying amount of attention which different Deputy Commissioners give to the subject.' The Commissioner is indeed confused in his inconsistencies and still sails lightly over them with a touch here and a remark there on the general work of the Deputy Commissioners of the six Districts while the officiating Resident explains his comment in his remarkable way based on vast general information that runs thus:—

'Arboriculture is an important matter, and if it is worth while to spend about Rs. 17000 a year upon it, the present system should, if possible, be reformed. The best reform would probably be to secure the co-operation of the officers in the Forest Department, who know or ought to know, all about trees, and who perhaps would not think it beneath their dignity to utilize their knowledge to the benefit of the roads and for the enrichment of the province generally.'

After having substantiated his argument on the facts in the report the Resident does not seem to lay the charge of inconsistency to any individual officer but searchingly finds out where the evil lies and takes steps to remedy it. In order to secure the progress of arboriculture in a more promising and more uniform result he grounds the basis of the system in the following manner:—

The co-operation of the Public Works Department will also be secured, for hitherto the planting and maintenance of trees along Public Works roads seems to have been confined to small lengths here and there instead of being continuous throughout the entire length. If no rules or system exist on this point, rules will now be laid down in the Public Works Department, and no road should be considered completed until an avenue has been planted along its entire length. If this is done continuously as the road is made, the additional expense will be inconsiderable. When the annual report is submitted by the Conservator, it is probable that some simple rules will be suggested for the guidance of district officers so as to ensure some uniformity of result and some real steady progress in a matter of considerable importance to the province. The Conservator will therefore be informed that, with the permission of the Government of India, which will now be solicited, the Report on Arboriculture for the current year will be written by him and submitted to the Commissioner, who will forward it with his review to the Resident.

---


विक्रीस तयार.

*SAPKAR'S DIARY*

*FOR* 1889

WITH A CALENDAR FOR 1890.

सापकराची रोजनिशी

## सन १८८९ सालाकरितां

यांत मराठी तिथी, वार, महिने, सूर्योदयास्त विशेष उपवास, ग्रहणें, सण, सरकारी आफिसांस व दिवाणी कोर्टास असणाऱ्या सुट्या, मौंजी विवाहाचें मुहूर्त, इंग्रजी व मुसलमानी महिने, तारखा, रेल्वे, तारायंत्र, स्टांप, मनीआडर्स, पोस्ट, मुंबई, बंकांच्या रुळी, सिव्हील प्रोसिजर, मुदतीचा, विशेष न्यायाचा, दस्तऐवज नोंदण्याचा, जनरल स्टांप, कोर्ट फी, पोलिस गाईड, डिस्ट्रिक्ट आणि गांवचे पोलिस, क्रिमिनल प्रोसिजर इत्यादि नेहमी जरूर लागणाऱ्या विषयांची माहिती दिली आहे. व रोजमुरा चुकता करण्याचे माहितीचे कोष्टक दिलें आहे. अखेरीस जमाखर्चाच्या सदरांची व कांहीं कोरीं पृष्ठें जोडलीं आहेत.

| रोजनिशीची किंमत. | रु. हां. | टपाल |
| --- | --- | --- |
| प्रत नंबर १ | ०।२ | ०२ |
| प्रत नंबर २ | ०।८ | ०॥ |
| प्रत नंबर ३ | ०।० | ०॥ |

किमती बद्दल रोख पैसे आह्माकडे पाठविले असतां रोजनिशी रवाना करण्यांत येईल.

भाऊ गोविंद सापकर,

'ज्ञानचक्षू चे' मालक,

पुणें.


---

## वऱ्हाड.

हवामानः— मधून मधून आकाश आभ्राच्छादित असतें. गेल्या आठवड्यांत थोडासा पाऊस पडला. हवा थंड आहे. पिकें बरीं आहेत. पण ईश्वरकृपेनें पाऊस चांगला तरी पडो, नाहीं तर मुदलीच नसल्यास बरें असें शेतकरी लोक बोलतात.

यंदाच्या फर्स्ट बी. ए. च्या परीक्षेंत वऱ्हाड हायस्कुलांमधील खालीं पांचजण पसार झालें:—

भट कृष्णराव पुरुषोत्तम, रहाळकर नारायण मोरेश्वर, डांगे शंकर नारायण, गुर्जर मुकुंद बाळकृष्ण, फडके नारायण खंडेराव

उमरावती येथील लायब्ररीच्या इमारतीचें काम पुरें होऊन गेल्या आठवड्यांत मे. कमिशनर साहेब यांनकडून त्या लायब्ररीच्या सुरुवातीचा समारंभ झाला. ही इमारत चांगली भव्य आहे व तीस सुमारें ८००० रु. खर्च लागला असें ह्मणतात उमरावती येथील कित्येक पुढारी गृहस्थ हें पुस्तकालय उत्तम दशेस आणण्याची खटपट करीत आहेत हें त्यांस भूषणावह आहे.

कर्नल बुलक सा० हे० कामिशनर, उमरावती यांनीं उमरावती येथील लायब्ररीस १०० रु. देणगी दिली. त्याचप्रमाणें मि. गाडफ्री सा० यांनीं १५ रुपयाची देणगी दिली.

मे० कर्नल मेकेंझी सा० यांची ज्यु० कामिशनरचे जागीं नेमणूक झाल्याप्रमाणें ते गेल्या २३ तारखेस उमरावतीस येऊन आपल्या कामीं रुजूं झाले.

कर्नल स्पान्स्की सा० यांची बुलढाण्यास डे० कमि० चे जागीं नेमणूक झाली. व त्याप्रमाणें ते गेल्या आठवड्यांत तिकडे गेले.

मि. निकोलेट सा० यांची यवतमाळास व कर्नल रेनिक यांची एलिचपुरास बदली झाली.

कर्नल ग्रांट साहेब डे० क० मध्यां येथें आले आहेत पण पुन्हा एक दोन दिवसात जिल्ह्यांत फिरावयास जाणार आहेत.

---

## वर्तमानसार.

हिंदुस्थाना विषयीं उपयुक्त माहिती—सर्वे खात्याच्या रिपोर्टावरून सगळ्या हिंदुस्थानांत ४८०६६७०९४ एकर जमीन आहे. ती पैकीं हिंदुस्थानांतील राजे रजवाडे, संस्थानिक, यांच्या ताब्यांत १२६६१४८३ एकर जमीन आहे. ती वजा जातां खास ब्रिटिश अमलांत ३६४०५१६११ एकर जमीन आहे या पैकीं निमे ह्मणजे १५१८३४६४० एकर जमीन शेती खालीं आहे शेती खालीं नाहीं अशी जमिन १६६१९२४९८ एकर आहे. ही पैकीं निमे म्हणजे तेवढ एकर जमीन लागवडीस आणण्या सारखी आहे. शिवाय जंगला खालीं अशी ४०१८५७२२ एकर जमीन आहे. ती कहित किंवा पडीत जमिनी खालीं गणली जात नाहीं. पिकाऊ जमिनींत जीं पिकें होतात त्यांचा तपशीलः—

| पीक | एकर |
| --- | --- |
| तांदूळ. | २३११४६६२ |
| गहू. | १९८८३०४० |
| चहा. | २१२४१२ |
| कापूर. | ९८५२६५४ |
| तेल,बीद्रव्य. | ७६७८३८२ |
| नीळ. | १०३१८८९ |
| इतर धान्य आणिडाळी. | ७१४३९२१८. |

ज्ञा० सू०

असें समजण्यांत येतें कीं, मि. धुरंधर यांस इंदूर येथें चीफ जस्टीस नेमिलें आहे. व मि० किर्लोसकर मुंबई हायकोर्टांचे वकील यांस तेथें सेकंड जज्ज नेमिलें आहे.

अशी वदंता उठली आहे कीं, नवीन येणारे गव्हरनर जनरल साहेब लार्ड ल्यांडसडौन यांनीं कलकत्यास जाऊन अधिकार हातीं घेतल्यावर ते लवकरच ब्रह्मदेशांत जाणार आहेत. व तेथें बहुत करून रंगून मंडाले रेल्वे सुरूं करण्याचा समारंभ त्यांचे हातून होईल.

सौडन प्रांतांत वाडाई गांवीं आमची व शत्रूंची चकमक उडाली. शत्रूंची फौज ७०,००० होती. परंतु आमच्या फौजेनें त्यांचा मोड करून ३००० शत्रूचे लोक जाया केले. नंतर पुन्हा आमच्यावर एक हल्ला झाला. त्यांत आमचा मोड होऊन शत्रूंनीं शहर स्वाधीन करून घेतलें. यावेळीं सुलतान पळून गेला!

चमत्कार— कोंकणांत एके खेडेगांवीं एक मनुष्य फार दिवस आजारी पडला होता. त्याचें या अशा आजारांत पुरणाची पोळी व साखर यांजवर मन गेलें होतें. हें त्यानें आपल्या प्रिय भगिनीस सांगून पाठविलें होतें. पण दुर्दैवानें ती येण्याचे पूर्वींच तो मृत होऊन त्यास दहनार्थ स्मशानांत नेलें होतें. इतक्यांत वरील जिन्नस घेऊन त्याची बहीण त्याचे घरीं गेली पण तिला हें दुःखदायक वर्तमान समजतांच, ती स्मशांनाकडे धांवत जाऊन ओरडून ह्मणाली. भाऊ, भाऊ उठ ही घे तुझी पुरणपोळी व साखर. असें ह्मणून तिनें थोडी साखर त्याचें तोंडांत घातली, तोंच तो जिवंत होऊन चोहोंकडे पाहूं लागला, हल्लीं तो खुशाल असून गृहप्रपंचाचें काम करीत आहे.

बेलगम देशांत भुयारी किल्ले आहेत. ते दुरून मुळींच दिसत नाहींत. त्यांत दारूगोळा वगैरेची व्यवस्था असून त्याची राखण करण्यास तीस चाळीस माणसें बस होतात. यापैकीं प्रत्येकास सुमारें दहा लाख रुपये खर्च लागतो. न्या० सिं०

पडीक जमीन—हिंदुस्थानांत हल्लीं जी पडीक जमीन आहे, हिची जर लागवड केली तर सुमारें ४० कोट लोक पोसले जातील असें अनुमान मि. जाडचीक नांवाचे एका इंग्रजानें केलें आहे. हें अनुमान काहीं खोटें नाहीं. सरकारानें मात्र शेतकरी लोकांस सज्ञान दशेंत आणून त्यांस लागणाऱ्या सवलती दिल्या पाहिजेत ह्मणजे झालें. ज०

आस्ट्रेलिया मध्यें दुष्काळ असून गव्हाचें पीकही यंदा कमी आहे असें ह्मणतात.

म्हैसूरच्या शहरांत एकंदर लोकवस्ती ६०३९२ आहे; त्यांत २८,९७६ पुरुष व ३१००० वर बायका आहेत असें समजतें. सु० प०

मधुमेहावर उत्तम औषध— जांभळाच्या बिया हें मधुमेहावर मोठें रामबाण औषध आहे. या औषधानें साखर होण्याचें प्रमाण बंद होतें आणि तें बंद झालें म्हणजे शक्तिवर्धक रसाचा नाश होत नाहीं.


## इकडे पाहूं नका!

## फारच दुर्मिळ संधि!!

कायदेशीर रीतीनें

## थोड्या खर्चात मोठा लाभ!!!

## रुपये ३५,०००

## वाटून द्यावयाचे आहेत!!!

विशेष माहितीसाठीं एका कार्डावर आपला पत्ता कळवा, ह्मणजे प्रॉस्पेक्टस फुकट पाठविण्यांत येईल.

## मेसर्स.जे. भरतिया अँड ब्रदर्स,

जनरल मर्चन्टस अँड कमिशन एजन्टस, फाकलंड रोड, भायखळा पोस्ट, मुंबई.



## दामोदर काशिनाथ काळे आणि कंपनी यांचा दवाखाना.

या ठिकाणीं मनुष्यांचे व गुरांचे सर्व रोगांवर औषधें मिळतात.

औषधें घेण्यास फार सुलभ आहेत. कोणत्याही रोगांवर वैद्य व डाक्टर होमिओपाथिक डाक्तर जीं औषधें देतात त्याहून आमचे जवळ असलेल्या औषधांनीं फार लौकर चांगला व फार वेळ टिकणारा गुण येतो.

पटकी, मुळव्याध, परमा, आम्लपित्त खरून, पैण, नायटे, खवडे, हिवताप, संधिवायू, दमा व खोकला, भगंदर, लहान मुलांचें अंगांत येणें, मुलांचे पोटांतील डबा, गरोदर अवस्थेंतील ओकारी, बाळंतरोग व इतर प्रकारचे माणसांचे सर्व रोग यांजवर उत्तम गुण देणारीं औषधें आह्मीं आमचे दवाखान्यांत ठेविलीं आहेत.

गुरांचे रोग—पटकी, लाळ, खेसणें, पाठीला लागणें, पोट फुगणें, गळा सुजणें, आवरक, आंचळांतून रक्त येणें, क्षते, पोटांतील कृमी, ज्वर व इतर सर्व रोग यांजवर या दवाखान्यांत औषधें ठेविलीं आहेत. गाई, बैल ह्मशी, हेले, घोडे, कुत्रीं, मांजरें, बकरीं, यजनावरांचे सर्व रोगांवर आह्मीं औषधें ठेविलीं आहेत.

या दवाखान्यांत रोग्यांना औषधाबद्दल थोडी किंमत द्यावयास लागेल.

बाहेर गांवीं राहणारे लोकांना आपआपले रोगाची हकिकत लिहून कळविली असतां माफकदरानें त्यांस अभिप्राय मिळेल. औषधें मागविली असतां जीं औषधें आह्मीं पाठवूं त्यांजबरोबर औषध घेण्याचें माहितीचा कागद पाठवूं.

वर लिहिलेल्या कित्येक रोगांवरील औषधाचे एका कुपींत पांच मनुष्यांस पुरण्याइतकें औषध असतें.

जुने रोग व ज्या रोगांना बरें करण्यास वेळ लागतो अशा रोगांनीं पिडलेल्या लोकांस त्यांची मर्जी असेल तर ठराव करूं. ठरावाची जी रकम ठरेल त्यांपैकीं कांहीं आगाऊ द्यावी लागेल.

"हा दवाखाना उमरावती येथें भुसार दरवाज्या बाहेर मिस्टर प्रल्हाद नारायण जोग वकील यांचे वाड्यांत खालचे दिवाणखान्यांत आहे"

उमरावती मेडिकल हॉल.

ता० २४–१०–८८

दामोदर काशिनाथ काळे आणि कंपनी.



## K. B. RELE AND CO.'S MOST EFFICACIOUS.

## PREPARATONS

१ धातु पौष्टिक शक्तिवर्धक गोळ्या.

शरीर निरोगी सदृढ करणाऱ्या गोळ्या ह्या आहेत अति श्रमानें व हरएक दुसऱ्या कारणांनीं झालेली क्षीणता, मुखावरची निस्तेजता, पांडुरता, मनाची उदासीनता, जीर्णज्वरानें, हगवणीमें खोकल्यानें झालेली क्षीणता, स्वप्नावस्था, मस्तकशूळ, कटीशूळ, निद्रानाश, गंडमाळा, क्षयरोग, रक्तस्त्राव... मध्यें पोटांत दुखणें, धातु जाणें, वाईट स्वप्नें पडणें, हीं ह्यांच्या सेवनानें, शरीरांत होऊन तोंडावर टवटवी येते मज्जातंतूस तीव्रता येऊन स्मरण शक्ति वाढते काम व अभ्यास करण्यास उल्हास येतो. तोंडास रुचि येऊन भूक लागते. पाचनशक्ति वाढते. ते प्रत्यक्ष ह्याचा अवश्य अनुभव घ्यावा. किं० १२ आणे

२परम्यावर खात्रीचें वस्ताद औषध.

हें बिनधोक अत्युत्तम त्वरित गुणकारी आहे. लघवीची जळजळ, तिडिक, धातु जाणें ही तात्काळ बंद होतात परमा किती हीजुना व हट्टी असला तरी निश्चयात्मक बरें होतो. किं० १ रु०

३ परम्यावर पिचकारीचें औषध.

हें ही परम्यावर रामबाण आहे. किं० ८ आणे.

४ धुपणी ( प्रदर ) वर अमोलिक औषध

सर्व प्रकारच्या नव्या व जुन्या धुपण्या यानें हटकून जलद बऱ्या होतात. भूक फार लागते. रक्तवृद्धि होऊन शक्ति येते. किंमत १ रुपया.

५ धुपणीवर पिचकारीचें औषध

वरील औषधा बरोबर हे वापरल्यानें रोगी रोगमुक्त झाला नाहीं हें क्वचित. किंमत ८ आणे.

६ सर्व प्रकारच्या जखमांवर मलम

चट्टा, चांदी, सर्व नव्या व जुन्या जखमा घाय इ० मारणारे मलम कायतें हेंच किं० ८ आणे.

७ खोकल्यावर अचूक औषध.

यानें कफ सुटा पडतो, पडसें, दमा जातो, शयाचा, ढास, घशांत गुदगुली होऊन येणारी इ० खोकले अचूक बरें होतात. किं. १२ आणे

८ तापावर रामबाण औषध.

हिंवताप, पाळीचाताप, अंतरताप, जीर्णज्वर, यांवर तर हें रामबाण आहे. जंगल किंवा म्यालेरियाच नांवाच्या तापावर हें वस्ताद आहे. यानें भूक लागते व पचते. किंमत १२ आणे.

९ अजीर्ण, अतिसार, यांवर औषध.

अजीर्ण, अतिसार, संग्रही, अभिसार, आममरकाची व साधी हगवण इ० बंद करण्यांत हें कधीच मागें हटलें नाहीं. किंमत १२ आणे.

ह्या औषधांच्या गुणाविषयीं ज्या अनेक सर्टिफिकीट मिळाल्या आहेत त्यांपैकीं एकाचा सारांशः—

"के. बी. रेळे यांस लिहावयास अत्या हें वाटतें कीं, मजकडे पाठविलेलीं सर्व (वराल) औषधीं मी उत्तम पुर्वक तपासून पाहिलीं. तीं फार गुणकारी असून निर्धोक आहेत.

( सही ) डाक्टर वि. वि. गोखले, एम. ए. एल. डी."

सूचना--अनुपानाचा कागद औषधा बरोबर असतो धाऊक घेणारास चांगलें कमिशन मिळेल. प्यकिंग व पोस्टेज शिवाय पडेल.

विशेष सूचना--आमच्या वरील औषधां शिवाय सर्व प्रकारचीं दुसरीं इंग्रजी औषधें जसें, पेनकिलर, क्लोरोडाइन, पेपरमिंट, काडलिव्हर आईल, वान्याचीं तेलें, मलमें, साबू, पोट्याश, टिंकचर्स, सल्फाईट्स इनोज फ्रुट साल्ट, वैद्यांस दवाखान्या करितां लागणारीं औषधें व शस्त्रें, वगैरे व तरुण व वृद्ध ह्यांस लागणारे उत्तम गारेचे चष्मे, मुक्कईत असल्या शिवाय, लाग या योग्य नवराचें पाठविण्यांत येतील त्याच प्रमाणें औषधांचीं व इतर पुस्तकें हीं पाठविण्यांत येतील.

पैसे आल्यास किंवा व्ह्याल्युपेएबल पार्सलनें औषधें व इतर सामान पाठवूं. नाटपेड पत्रें पाठवूं नयेत. पत्रव्यवहार उपलील पत्यावर करावा.

पत्ता. के. बी. रेळे कंपनी, ज्युबिली मेडिकल हॉल काळबादेवी- पटेल व्यांकरोड मुंबई

हीं औषधें सर्व इंग्रजी औषध विकणाराकडे व मालकाकडे मिळतील.



D'ONT LOOK AT THIS!

**RARE OPPORTUNITY!!**

PROFITABLE LAGAL INVESTMENT!!!

**RS. 35000**

**TO BE GIVEN AWAY!!!**

*For particulars— apply, for prospectus ( to be posted gratis ) to*

MESSRS. J. BHARTIA & BROTHERS.

*General Merchants and Commission Agents.*

FALKLAND ROAD, BYCULLA POST, BOMBAY.



"TO THE DEAF."

A person cured of Deafness and Noises in the Head of 23 years, standing by a Simple Remedy, will send a description of it free to any Person who applies to J. H. Nicholson, 5 Old Court House Street, Calcutta.



बहिऱ्यांस

बहिरेपणा आणि २३ वर्षांचा कर्णनाद यांस गुण आणणारे सोपें औषध.

जे. एच्. निकलसन, ५ वी ओल्ड कोर्ट हौस स्ट्रीट कलकत्ता, यांस पोस्टपेड पत्र पाठविलें असतां औषधाबद्दलची माहिती फुकट पाठविली जाईल.



☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

Per annum in arrears 7 Rs. 8
Six monthly............3 " 8 as
Single copy.............................4

सोळ अखेर " ७ " १८

किरकोळ अंकास.........................४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस.........०।१

Advertisements
Below 10 lines...2Rs
Per line over 10..4as
Repetition perline 3as.

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOLXXII AKOLA MONDAY 10 DECEMBER 1888 NO.48

वर्ष२२ अकोला सोमवार तारीख १० माहे दिसेंबर सन १८८८ इ० अंक४८

### नोटीस.

रा. रा. मुकुंद बाळकृष्ण वकील मुक्काम अकोलें यांस खालीं सही करणार इजकडून या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं, अगर वेशी जवळ आमचें घर आहे. ह्या आमच्या घराचे कंपौंडची जागा पूर्वेस आहे. हल्लीं तुमच्या असलेल्या जागेच्या दक्षण बाजूस रा. रा. नारो अमृत यांचे पक्के घराच्या जागेवर हल्लीं तुह्मी इमारत दुमजली केली आहे. ह्या इमारतीचा दुसरा मजला आपण बांधूं लागल्या पासून आपणास हिजबानीनें सांगितलें कीं, तुह्मी आमच्या हद्दींत पाणी पडेल अशी मोरी ठेऊं नये. असें वारंवार सांगत असतां मोरी केली. हल्लीं ठविलेले बिऱ्हाडकरू ठविलेले मोरींत पाणी टाकूं लागले आहेत. हें पाणी आमचे सर्व जागेंत वाहत आहे. ही मोरी आपण नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत बंद करावी न केल्यास तुमचेवर दिवाणींत फिर्याद केली जाईल. हल्लीं तुमचे घराचे उत्तर बाजूस ज्या ठिकाणीं मोरी केली आहे त्याचे खालीं आमचे खपरेल बांधलेलें होतें. व तुह्मी बांधलेल्या घरास आमचे बाजूस पूर्वींची मोरी नव्हती. या नोटीशीचा खर्च नोटीशीच्या आधारें विनाकारण त्रास दिल्या बद्दल तुमचे जवळून घेतला जाईल. कळावें. तारीख ८ माहे डिसेंबर सन १८८८ इ०

(सही)
आनंदीबाई भ्रतार चिंतो परशराम परचुरे.

---

राजमाचीकर व साठे न्यायाश्रयकर्ते पुणें यांनीं नवीन तयार केलेला.
हिंदुस्थानचा कराराचा आक्ट.

सन १८७२ चा ९ वा
समजुतीच्या टिपा व मुंबई, कलकत्ता, मद्रास व अलाहाबाद हायकोर्टाचे निवाड्यां सुद्धां
किंमत रु० २॥ व टपाल खर्च ०।६ आ.
ही पुस्तकें आमचे छापखान्यांत व सदाशिव काशीनाथ आणि कंपनी यांचे दुकानीं विकत मिळतील.

---

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

मुकाम वाशिम ३।१२।८८

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस.

कृतानेक सा० नमस्कार विशेष या आठवड्यांत येथें दोन तिन दिवस फार पाऊस पडला. या मावसानें हित होणें तें पुढें होणार परंतु सध्यां कपासीचे व ज्वारीचे फार नुकसान झालें. कोणी कडून हमेश तोटा होण्या कडेसच कल असतो. ज्या वेळीं पाहिजे त्या वेळीं पावसानें ओढून धरील होतें व आतां नको आहे म्हणून पडतो कोणी कडून तरी मनुष्याला सुखोत्पत्ती म्हणून नाहीं. या कलीयुगांत सर्व गोष्ठी विपरीत व्हावयाच्या असें व्यासादिक महा ऋषींनीं अगोदर भविष्य कथन करून ठविलें आहे. तेव्हां तसें होतें यांत नविन तें कोणतें.

काल रात्रीं येथें एक मोठा अपघात झाला तो असा; येथें प्रसिद्ध वकील रा. रा. शेषराव यांनी माडी बांधली होती. तिचे खालीं दुकान होतें, तेथें दाळ तांदुळ वगैरे बाजारू पदार्थ सर्व विकत असत. ते घेण्या करितां गिऱ्हाईक ही येत असत काल रात्रीं प्रातःकाळीं नित्या प्रमाणें दुकानदार आपल्या दुकानांत बसले होते. त्यांचे पासून सामान घेण्याकरितां कोणी हवालदार आला होता. इतक्यांत भवीतव्याच्या योगानें ती माडी एकाएकीं खालीं पडून ते दोघे ही खालीं दबले. यामुळें लोकांत मोठा गवगवा झाला. शेकडा लोक जमा झाले. पुढें पोलीस ही आले. व लोक कामावर लावून खालीं दबलेल्या लोकांना बाहेर काढण्याचा शोध चालला. कोणी ह्मणत तीन दबले. कोणी ह्मणत दोन याप्रमाणें विचार होतां होतां शेवटीं पहिल्यानें दुकानदार सांपडला. त्या वेळीं त्याच्या पायांचा जीव जाऊन बहुतेक अंग गार झालें होतें थोडी धुकधुकी मात्र राहिली होती. पुढें तासा भऱ्यानें त्याचा प्राण गेला. दुसरा हवालदार जो कांहीं दुकानावर घेत होता. त्यांचे शोधतां शोधतां प्रेत सांपडलें. त्याच्या कपाळावर कांहीं रक्त निघालें होतें. त्याजवरून त्याला जबर नाटेचा वगैरे घाव लागला असावा व तेणें करून प्राण गेला असावा. तिसरा जो दबला ह्मणत तो शांधांती खोटें ठरला सदरहू एका क्षणांत घडून आलेल्या गोष्ठीवरून मनुष्याचें जिणें किती क्षणभंगुर आहे हे ठरतें. असें असतां मनुष्या मध्यें ताठा किती असतो. एखाद्यास दैवयोगानें आश्रय मिळाला मगतो कोणत्या कां तऱ्हेनें मिळेना त्याचा विचार बहुधां नसतोच त्याला असें वाटतें कीं काय तो मी! मजला सर्वांनीं शरण जावें आपल्या जातीची विद्येची, आपली स्थिति कोणत्या प्रकारची याचा त्याला विसर पडतो. व आकाश पाताळ एक होऊन जातें. दैवयोगानें एखाद्याच्या हाताखालीं सेव्य सेवकभाव संबंधानें अगर कामा काजाच्या संबंधें कांहीं माणसें आलीं व तीं बाहेरच्या गांवांहून येत असलीं तर हे महत्वा कांक्षी राजश्री जेथें असतात त्या ठिकाणीं आलीं व त्यानां त्या राजश्रीला भेटण्याचे स्मरण राहिलें नाहीं अगर जरा उशीर लागला तर त्या राजेश्रीचे चित्त खवळून जाऊन त्या इसमाचा शोध करूं लागतात त्याची व राजेश्रीची गांठ पडल्यावर "काय रे तुला येथें येऊन किती वेळ झाला! माझी भेट घेण्यास विसरलास होय? अजून तुला माझा ह्मपाटा नाहीं कां समजला. पण संभाळ आतां. तुला दाखवितोच आतां; असो. अशा प्रकारच्या मनुष्याच्या गांठी पडल्यास ह्मणजे काय करावें. तर मौनं सर्व साधनें वर प्रकारचा मनुष्य कोण. त्याचा हुद्दा कोण हे सवडीनुसार विचार करण्यांत येईल. मात्र सध्यां आश्रय मिळाल्यामुळें उडणाऱ्या मनुष्यानें आपल्या स्थितीचा विचार करून लोकांशीं वर्तावें ईश्वराला स्मरावें. तो सर्वसाक्षी परमेश्वर पाहील व सर्व गोष्टींचे उट्टें एकदम काढील.

मे. कमिशनर साहेब बाहदूर यांची स्वारी या जिल्ह्यांत ता० ७-१२-८८ इसवी येणार असें समजतें. येथें स्वारी ता० ९ रोजीं येईल असें ह्मणतात. व ता० १० पासून ता० ११ पर्यंत येथें राहून शेरपूर मार्गानें डोंगांवांवरून बुलडाणें जिल्ह्यांत जाणार असें ह्मणतात. साहेब बाहादरांना येऊन थोडे दिवस झाले नाहीं तोंच रयतचीं दुःखें काय आहेत ज्याजवर आपण अमल करणार त्या प्रांताची स्थिती काय आहे आहे हे समजून घेण्याकरितां साहेबांची स्वारी फिरावयास निघाली हे पाहून रयतची त्यांना फार कळकळ आहे असें समजतें. स्वारी नवीनच असल्यामुळें लोकांना आपलीं काय दुःखें आहेत अगर सुखें आहेत. तें सर्व कळविण्याची तजवीज ठेवावी साहेबस्वारी आल्यावर पुढील मजकूर जो होईल तो मागाहून कळविण्यांत येईल.

राष्ट्रीय सभेचे अगर गोरक्षक सभेचे बाबतींत येथें कांहींच हालचाल नाहीं. इतकी पुढारी लोकांत शिथिलता कां उत्पन्न व्हावी. परंतु लिहिण्यास फार आनंद वाटतो कीं आमचे गांवचे नूतन होतकरू विद्वान वकील रा. रा. रावसाहेब यशवंतराव यांनीं मंगरूळपीर येथें जाऊन तेथें लोकांना आद्यंत समजावून व त्या पासून पुढें होणारे फायदे काय आहेत ते कळवून आले ही मोठी बाहदरीची सदरहु वकील साहेबांनीं गोष्ट केली. व मागें ही हे गृहस्थ सिरपुरास जाऊन तेथें एक मोठी सभा भरवून त्याना ही सर्व हकीकत कळविली व त्यांचीं मनें या कामीं वळविलीं. असो हे वकील साहेबच कायती हालचाल करितात व ह्या जिल्ह्यांतील लोक स्तुतीस आपल्याला पात्र करून घेतात. ही किती आनंद मानण्या सारखी गोष्ट आहे. बरें. अशीच येथें त्यांनीं कांहीं खटपट केली तर येथेंही त्यांना यश मिळणार नाहीं असें होणार नाहीं. मात्र मार्ग दाखविणारा कोणी तरी पाहिजे. व तो वाटा ज्या शहाणा लोकहित करणारा असला पाहिजे त्याला सर्व अनुसरतात. कोणतीही गोष्ट नवीन असली ह्मणजे तिच्या मार्गें येणाऱ्या अडचणी असतातच परंतु शहाण्यानें त्या युक्ति प्रयुक्तीनें दूर करून आपले कार्य साधलें तर यश येतेंच बाबा यशवंता, तुला यश येवो. व तुह्मी, कीर्ति राष्ट्रीय सभेच्या संबंधें अजरामर होवो ज्याला सुलभ मार्गानें घरांत आलेली कीर्ति नको. त्यांनीं पहावीं लोकांची तोंडें. बाकीच्यांनीं ज्यावी परवणी साधून नी काय?

येथें गांवांत दुसरे दर्जाचे पोष्ट ऑफिस आहे तें इतक्या दिवस ज्या इमारतींत होतें ती इमारत अगदीं गांवच्या मध्यभागीं होती असें कित्येकांचें ह्मणणें आहे. परंतु तें आफीस तेथून काढून दुसरी कडे नेलें ती ही जागा वाईट नसून चांगली आहे असें ह्मणतात. परंतु व्यापाराच्या वहिवाटीच्या जाग्यापासून दूर आहे असें ह्मणतात. येथें खरा व्यापार शुक्रवारांत व देव पेठेंत या दोन ठिकाणीं आहे. पांहिलें पोष्टचें ठिकाण देवपेठेला जवळ होतें. हल्लींचें लांब आहे. असें म्हणतात शुक्रवार दोन्ही पासून दुर परंतु तेथें पत्रा करितां पेटी ठेविलेली आहे. तेव्हां तपील लोकांची मुळींच अडचण नाहीं. असो.

येथें एकानें एक इमारत बांधली आहे. ती इतकी तखलती आहे कीं तिच्या पासून कधींना कधीं तरी लोकांना इजा होईल ही इमारत अशी आहे कीं पाय बारीक व शरीर मोठ या प्रमाणें बांधली गेली आहे ही कोणा कच्छानें बांधली आहे असें म्हणतात तीच्या कडे गांवाचे अधिकारी लक्ष देऊन ती टिकाऊ मजबुत आहे किंवा कसें तें पहातील तर बरें नाहीतर एखादे वेळेस न जाणो पडल्यास परवां अपघात झाला तसा कदाचित होईल करीतां सूचना केली आहे. कळावें. हे विनंती.

आपला
"क्ष"

---

## राष्ट्रीय सभेचे हित शत्रु

(लिहून आलेला मजकूर.)

मनुष्याच्या मानी स्वभावापुढें तर हद्द आहे बाबा! एकदां कां माझी जात व मी चांगला अशा प्रकारचें वेड त्याच्या मनात भरून गेलें ह्मणजे त्यास प्रत्यक्ष घडून येणाऱ्या व डोळ्यांपुढें दिसणाऱ्या गोष्टी कळून च येत नाहींत कधींही आणि माझ्या वर्गीयांचें करणें न्यायस अनुसरूनच असलें पाहिजे असें प्रतिपादन करण्यास तो सदा तत्पर असतो; ह्या त्याच्या मानी स्वभावा पुढें त्याच्या स्वभाविक सद्गुणांची मुद्दां दाद लागत नाहीं. न्यायाची आवड उदार बुद्धि इ० सद्गुणांची छाप त्याच्या मानी स्वभावावर व हट्टवादीपणावर बिलकूल बसत नाहीं ह्या सारखीच आमच्या सर ऑकलंद कालव्हीन साहेबांची स्थिती आहे असें ह्मणण्यास हरकत दिसत नाहीं.

आह्मी कितीही अन्यायानें वागलों व आमचीं कृत्यें कितीही वाईट प्रकारचीं असलीं तरी आह्मास वाईट ह्मणणार तुह्मी कोण?

अकोला वऱ्हाडसमाचार तारीख १० माहे दिसेंबर सन १८८८ इ०



आह्मी तुह्मास स्वस्थ बसवून ओली कोरडी भाकर खावयास देतों याच्या बद्दल आमचे उपकार न मानतां आमच्या कृष्ण कारस्थानावर टिका कां करीत असतां! असें व अशाच प्रकारचे बहुतेक गौरकायी यांचे आक्षेप आमच्यावर असतात.

आमचे सर कॉलव्हीन साहेब दोन वर्षें पर्यंत राष्ट्रीय सभेचे हितचिंतक होते परंतु तिसऱ्या सभेची हकीगत छापून निघतां क्षणींच—माशी शिंकली कीं काय कोणजाणे त्यांच्या मताचें पारडें एकदम फिरलें व राष्ट्रीय सभेचें अभिनंदन करण्यास ते जितके प्रवृत्त होते तितकांचें द्वेष करण्याचे त्यांनीं आतां मनावर घेतलें आहेसें दिसतें. असें एकाएकी मत बदलण्याचीं कारणें त्या हकीगतीच्या शेवटीं जोडलेला संवाद व प्रश्नोत्तरावली हीं होतें परंतु चमत्कार हा कीं, हींच प्रश्नोत्तरावली व हाच संवाद दोन वर्षांच्या मागेंच प्रसिद्ध झालेला असून आसाहेबांचे त्यांच्याकडे आतां लक्ष जात आहे.

साहेबांचे म्हणणें असें आहे कीं राष्ट्रीय सभा ही अडाणी, अज्ञानी व अविचारी लोकांस इंग्रजी राज्या पासून काय काय तोटे आहेत हेंच फक्त समजावून सांगते. व त्य योगानें त्यांचा ग्रह या राज्या विषयीं विपरीत होतो. या वरून आसाहेबांस लोकांचीं मतें इंग्रजी राज्या विषयीं काय आहेत हें अजून समजलें नाहीं असें दिसतें. परंतु साहेब बहादुरांनीं हें पक्कें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, विद्वान लोकां पासून तों तहत एखाद्या अज्ञान शेतकऱ्या पर्यंत बहुतेक सर्व लोकांचे ग्रह साहेब बहादुर समजतात त्या पेक्षां फारच उलट प्रकारचे झालेले आहेत. इंग्रज सरकार मुर्तीमंत दयाळु, न्यायी, उदार इ. प्रकारचे समज आतां लोकांचे मनांतून नाहींसे होत चालले आहेत व याचीं कारणें कांहीं सरकारचे अधिकारीच होत. जो पर्यंत पोटभर अन्न आंगभर वस्त्र याची आम्हांस दाण नव्हती तों पर्यंत आमच्या सरकारची राज्य पद्धत आम्हास कधीं ही कळून आली नाहीं व आमच्या स्वाभाविक आळशी स्वभावामुळें आम्ही ती समजून घेण्याची कधीं ही खटपट केली नाहीं. पिढ्यान पिढ्या आम्हीं आपले दिवस लढाया व दंगे धोपे यांतच घालावले असल्या कारणानें व शांततेचे दिवस या राज्यांतच प्राप्त झाले असल्या कारणानें आम्हीं जें सर्व चकाकतें तें सोनेंच आहे असें समजून स्वस्थ बसून राहिलों; व पुढें पुढें जेव्हां अन्न वस्त्र याची सुद्धां पंचाइत पडत चालली तेव्हां कोठें आम्ही कांहीं वर्षांमागें जागे झालों व हल्लींची स्थिति अपाय कारक आहे असें आम्हास वाटूं लागलें व अशी स्थिती कां झाली व अशा स्थितीपासून सुटका करून घेण्यास उपाय आहेत किंवा नाहींत हे समजून घेण्याची इच्छा साहजिकच उत्पन्न झाली. एखाद्या सोम्या पाटलास सुद्धां इंग्रजी राज्य झाल्यापासून आपले तोटेच होत चालले आहेत असें आता वाटूं लागलें आहे. पहिल्या सारखी आपली आतांची स्थिती नाहीं आहे हे त्यास पूर्णपणें कळून चुकलें आहे मात्र त्यांच्या अज्ञानत्वामुळें अशी आपली स्थिती कां व्हावी याचा उमज त्यांस [illegible] नाहीं व आमच्या शिकलेल्या लोकांस ते बऱ्याच अंशानें कळूं लागलें आहे.

साहेबबहादूर ह्मणतात कीं सरकारी अधिकारी लोकांस व राज्य पद्धतीस दोष देऊं नका; कारण इंग्रज सरकारच्या राज्यापासून हिंदुस्थानास पुष्कळ फायदे झालेले आहेत. गोष्ट कबूल! परंतु फायद्या बरोबर तोट्यांचा ही विचार करणें नको काय? आगगाड्या तारायंत्रें इ० सुखकारक गोष्टींची योजना करून आमचे पैसे व आमचे शौर्य यांचें हरण केलें नाहीं काय? या सरकारनें दिलेल्या विद्येपासून फायदा होण्याची बरीच आशा आहे परंतु ही विद्या आह्मांस जशी पाहिजे आहे तशी मुळींच मिळत नाहीं व जी कांहीं थोडीशीं मिळते तीस सुद्धां अंचवण्याचा लवकरच बेत येईल. आह्मांस आमच्या सरकारचा विद्या देण्याचा उद्देश आमचें अज्ञानत्व दूर करण्याचा व आह्मास आपले बरें वाईट कळवून देण्याचाच होता, त्याप्रमाणें आमचें बरेंवाईट हित आहित हें आह्मांस कांहीं अंशानें तरी कळूं लागलें आहे व आमच्या सुधारणेचे व आमच्या कल्याणाचे उपाय आह्मी आपल्या उद्धार ह्मणवून घेणाऱ्या व आमचा पूर्ण उत्कर्ष इच्छिणाऱ्या सरकारास आह्मी सुचविणें हे आमचे कर्तव्यकर्म आहे. आपचे सरकारची आमचा उदय व्हावा अशी पूर्ण इच्छा आहे ते आपल्या कडून उपाय ही योजीत आहेत परंतु फरक इतकाच कीं, ते आपल्या इच्छेनुरूप आमची सुधारणा करूं इच्छीत आहेत आणि त्या योगानें आमच्या खऱ्या गरजा काय आहेत याच्याकडे दुर्लक्ष होऊन आमचे हित न होतां अहितच होत आहे. आमचे मशागतिल्हे साहेबच कां घ्याना! हे साहेब आमची सुधारणा व्हावी असें पूर्णपणें इच्छितात खरें! परंतु बंगाल्याच्या दिवाणखान्यांतील खुर्चीवर बसून विचार केले असतां कां आमची सुधारणा होणार आहे. आमचीं दुःखें काय आहेत आह्मांस कशाची उणीव आहे हे समजावुन घेण्या करितां आमच्या सरकारच्या अधिकाऱ्यांनीं आंगझीज दावयास नको काय! उंटावरून शेळ्या राखण्याप्रमाणें वर्तन ठेविलें असतां आमच्या सुखदुःखाचा अनुभव आमच्या सरकारास या जन्मांत तरी येणें कठिण.

हल्लींची धर सोडपणाची राज्य शटक चालवण्याची पद्धत आह्मांस व आमच्या न्यायी व दूरदर्शी युरोपियन कामगारांस सुद्धां मान्य नाहीं व तिच्यांत काय सुधारणा केली पाहिजे हें सरकारास समजावून देण्याकरितां राष्ट्रीय सभे सारखें एखादें साधन आह्मांस अवश्य पाहिजे आहे.

वऱ्हाडसमाचार.

मिती मार्गशीर्ष शुद्ध ८ शके १८१०

## स्वागतम्

आह्मांस लिहिण्यास परम संतोष वाटतो कीं हिंदुस्थानचे नवे व्हाईसराय लार्ड लान्सडाऊन सकुटुंब सपरिवार गेल्या सोमवतीस मुंबईस सुखरूप येऊन पोचले. राजदरबारच्या मामुल वहिवाटीप्रमाणें लाट साहेबांचें योग्य रितीनें मानपानासह आगतस्वागत झाल्यावर निरानिराळी खातीं पाहणें, कांहीं शिक्षणाच्या संस्था पाहणें, एक नवीन पांजरपोळ लोकोपयोगासाठीं सुरू करणें, मुनासिपालिटीचें मानपत्र स्वीकारणें, किंवा साहेबांचें आदरातिथ्य करण्यासाठीं उभारलेल्या नवीन नवीन गोष्टींची प्रशंसा करणें, व बड्या मंडळीच्या भेटी घेणें इ० कामांत साहेबांनीं चार दिवस मुंबईस घालविले. इंडिया ग्याझेटच्या ताजा पत्रका प्रमाणें लार्ड लान्सडाऊन साहेबांनीं लार्ड डफरिन साहेबाकडून आपले कामाचा च्यार्ज शनिवारीं कलकत्यास घेण्याचें ठरलेलें आहे. सध्यां नव्या व्हाईसराय साहेबांस पाहुणचार करण्यांत आणि जुन्या व्हाईसराय साहेबांस अखेरची सलामी देण्यांत सर्व हिंदुस्थानभर गडबड व धांदल उडून गेली आहे व मेजवान्या, नाच, बॉल वगैरे कर्मणुकींत लाट साहेब व त्यांचे अनुयायी निमग्न आहेत तेव्हां अशा आनंदाच्या वेळीं त्यांस आम्ही कांहीं एक सुचवूं इच्छित नाहीं.

हिंदुस्थानांत एक सूर्य मावळत आहे आणि दुसरा तेजस्वी उगवत आहे अशा अस्त उदयाच्या समयीं जुने व्हाइसराय असे असे होऊन गेले आणि नवे व्हाइसराय कसे निघतील इत्यादि नाना प्रकारचे विचार लोकांच्या मनांत घोळत आहेत. सध्यां नवीन व्हाइसराय सिंहासनरूढ होऊन आपलें काम पाहूं लागतील तो पर्यंत लोक बोलतात हें पहाणें मोठ्या मौजेचें आहे. ही नव्या जुन्याची जमाची राहटी चालूंच आहे त्या प्रमाणें चार पांच वर्षांनीं हिंदुस्थानच्या इतिहासांत एक काण्डास आरंभ होऊन पहिला अध्याय सुरू होतो. सदर्हु प्रमाणें हिंदुस्थानांतील डफरिन शिरजोरशाई समाप्त झाली आणि लान्सडाऊनच्या शिरजोरीस सुरवात झाली आहे.

लार्ड लान्सडाऊन साहेब कानडा देशांत लोकप्रिय होऊन आले आहेत तेव्हां ते 'यत्तु श्रेयस्तदेवतत्' या न्यायानें इकडे ही लोकप्रिय होवोत. चक्रवर्तिनी महाराणी सरकारच्या या नव्या प्रतिनिधीस हिंदुस्थानदेश चांगला लाभो आणि त्यांची कारकीर्द हिंदुस्थान देशास चांगली लाभो म्हणून ईश्वरापाशीं आमची सविनय प्रार्थना आहे. प्रस्तुत आम्हीं लाट साहेबांस आगतस्वागतपूर्वक सप्रेम मुजरा करून साहेबांची रजा घेतों.

॥ शांतानुकुलपवनश्च शिवश्च पंथाः ॥

लार्ड डफरिन साहेब गेल्या शनिवारीं आपले कामाचा चार्ज देऊन येत्या चौदावे तारखेस मुंबईहून स्वदेशीं प्रयाण करतील. हे लाट साहेब ही नूतन व्हाइसराया प्रमाणें कानड्यांतून विजयी होऊन आल्या नंतर हिंदुस्थानचे गव्हरनर जनरल झाले असून साहेबांची कारकीर्द एकंदरीनें हिंदुस्थानास लाभली नाहीं असें ह्मणण्यास कांहीं प्रत्यवाय येणार नाहीं. आपला दैवयोगच उलटा खरा! खरोखर लाट साहेब व्यवहारदक्ष आहेत, राजकार्यधुरंधर आहेत सर्व कांहीं आहेत. फक्त त्यांनीं एकटी राजनीति ठेविली होती. त्या मुळें सरकारचें हित होऊन प्रजेची दुष्कळ प्रकारें नागवणूक झाली आहे. ब्रह्मदेश जिंकिला, उत्पन्नावर नवीन कर बसाविले, मिठाचा कर वाढविला, इत्यादि शेकडों प्रकरणें रयतेस प्रतिकूळ घडून आलीं आहेत त्यांस लाट साहेबांचा नाइलाज झाला. लार्ड डफरिन साहेबांचे गुण लोकोत्तर आहेत, त्यांची वक्तृत्वशक्ति अनुपम आहे, त्यांचे विचार दूरवरचे असून सामाजिक आणि राजकीय उन्नतीस अनुकूल असत पण त्या सर्वांची दिशा हिंदुस्थानास हितावह अशी नव्हती. असो. 'गतं न शोच्यं' या म्हणीप्रमाणें गुणदोषाचें पृथक्करण करण्यांत आतां हांशिल राहिलें नाहीं ह्मणून यावर आह्मी विशेष लिहीत नाहीं. गेल्या आठवड्यांत लार्ड डफरिन साहेबांनीं प्रांजळपणें सप्रमाण आपल्या कारकीर्दीचा इतिहास लोकांस सांगितला; तो त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें न्याय्य आहे, आणि आह्मी ही त्या इतिहासाचें तात्पर्य प्रसंगानुसार देणार आहों. लवकरच लाट साहेब स्वदेशीं जाण्या करितां निघणार आहेत तेव्हां त्यांनीं हिंदुस्थानच्या प्रजेच्या कल्याणा कडे लक्ष्य पुरवावें अशी विज्ञापी करून आह्मी राजनिष्ठापूर्वक त्यांस अखेरची सलामी देतों.

The Berar Samachar

MONDAY DECEMBER 10, 1888.

## THE VICEROY'S SPEECH AT ST. ANDREW'S DINNER.

The Anglo-Indian papers will heartily rejoice over the post prandium speech of the retiring Viceroy at St. Andrew's dinner at Calcutta. The torrent of the anti-Congress tide has at last discharged itself against the Congress, its doings and its Secretary and sympathisers. The whole lot has been accused of taking a 'big jump into the unknown' It is one good thing that the retiring Viceroy has freely given out his mind about the Congress business and has unmistakably identified himself with those that do not conceal their disapprobation of the Congress movement. To the chapter of dislike of the present Viceroy constituted by the Burmah War, the income tax and the increase in the salt tax, will be added a fresh page on account of his unfeigned denunciation of the Congress and its supporters. But it will be a mistake to suppose that with all the influence which a Viceroy of India necessarily possesses the congress will suffer in any way. The retiring Viceroy will stand out as an example of a mind liberalized by education and possessing the best opportunities of gauging the political aspirations of a rising generation, chilled by the baneful influence of the anglo-Indian bureaucracy.

The first count of the indictment is the distorted idea of the congressionists asking for a Parliament or an equivalent assembly. No responsible congressionist has asked for

any such unreasonable thing at this stage of Indian political life. Such an absurd and exaggrated demand has an existence only in the imagination of such as are either honestly ignorant of the true aims and objects of the Congress or who deliberately mean to take only a perverted view of matters. If admittedly, the Viceroy found such an unreasonable demand not supported by any wise man he came across in this country it must really be a phenomenon to find a combination of all such wise men joining together to make an extravagent demand as a Parliement for India. But, as a matter of fact, do the congressionists make any such demand. An emphatic denial must be given to any such allegation. What they want is an elective element in the Legislative Councils and they have been pressing the government to have elected members in the Legislative Councils, and is this an unreasonabl demand? The system of government nominations to the Councils heretofore in vogue has produced unsatisfactory results and the poeple do not find their interests propetly represented in the Councils. It is only just that the people should be well represented in the Councils, if at all they are to have any voice in the public councils. Outward appearances only are useless, and people are no longer satisfied with mere forms but want the spirit of the thing.

Again it is urged that there are very few people who have received education and a still smaller number who have received English education proportionately to the population of the country, and even these few do not represent the masses at all; they only represent themselves. The first part of this proposition must be admitted. The educated portion of the population bears undoubtedly a small proportion to the total population of the country. But few as they are they *do* represent the masses. Political science is about the most complicated of all social sciences. No person who has not devoted a good deal of attention to politics cannot form a reasonably accurate opinion in matters political. It requires therefore men who can afford to devote and who have devoted their leisure to thinking on political topics. As the professions of Law and Medicine require men of a particular culture so also politics also requires persons who perticularly study that subject. In fact the principle of division of labour applies in this case as in others. There are cultivators in the land, and merchants and artizans; but it is hardly possible for them to give thought to such a subject as politics. In the primary stage of political activity, therefore, there must naturally be a class which takes upon itself the duty of thinking out political problems concerning the nation; and it is the educated class that is doing it at present. Speaking of this class as *not* representing the masses, the expression is only true in this sense that the members of the Congress have not been very systematically elected as in England and other countries. Attempts are already being made to secure get representatives to the Congress on the elective principles but of course, it must take some time before the people get used to such a method of representation. In a few years to come the opponents of the Congress will have no room to urge this argument but this year's Congress will be a body duly elected by people of the respective places to which the members belong.

It has been further stated that the Congress ought to have engaged itself legitimately in social problems. That instead of arrogating to itself the dignity of advising Government on matters which they hardly understand, the Congress should have busied itself in curtailing the expenditure on marriages and in saving the indebted ryot from the clutches of money-lenders. This would appear hardly fair on consideration. The development of a country can never be one-sided; it must be in all departments, social, moral and political. It is no doubt true that there are many things in Hindu society which can bear improvement and there are others which deserve utter eradication; but at the same time there is also amplescope for improvement. The Anglo-Indian official world might look upon the Govt. of the country as a model Govt.; but the people who have to pay for a costly machinery as the present one, and the thousands that are dying of hunger bear testimony to the other side of the picture. The advantages of British Government are patent; and they are acknowledged with gratitude by the people and especially by the educated classes; but to belaud that Government to the skies as having no flaw is to say something that is not true of that Government. If the educated classes do not suggest improvements in the existing defects of the present system, the question is who else can? The men who best understand and appreciate the blessings of British rule, are presumably the best men also to advise government in political matters And it is not to be forgotten that persons like Dewan Raghunathrao are trying their utmost to do away with or to mitigate existing social evils in Hindu society. The energies of the educated classes must in the present state of things be directed to all matters concerning the improvement of the nation on all sides, and it is being so directed.

The last thing in the Viceroy's speech was a construction put upon a certain metaphorical passage in a newspaper article from the pen of Mr, Hume the secretary of the Congress. The Viceroy considered the expression used by Mr, Hume as a threat by the Congress party to use physical force against the established government, if the Congress were so minded. Mr, Hume has of course hastened to contradict the interpretation put upon his speech by the Viceroy; but that a Viceroy should have thought it necessary to put a construction upon a portion of Mr, Hume's writing in itself makes apparent the weakness of the cause he intended to support The Congress has elicited from the retiring Viceroy an expression of feeling opposed to it, and it is to be seen in what spirit the coming Congress takes it all.

---

The Governor-General in Council has received with much satisfaction the intelligence that His Highness Maharaja Holkar has abolished the export duty hitherto levied on salt in the Indore State.

---

Her Majesty's Secretary of State for India has sanctioned the construction, by the agency of the South Indian Railway Company, of a railway from Tirupati to Dharmavaram and from Pakal to Villupuram. This railway will in future be called the Villupuram-Dharmavaram Railway.

The existing open line from Tirupati to Nellore will be known as the Nellore Branch of the above railway.

G I.

## वऱ्हाड.

हामान— हिंवळा अलिकडे चांगला भासूं लागला आहे आणि आकाश ही बरेंच निरभ्र असतें त्या मुळें पाऊस थोडा झाला आहे तरी रब्बीच्या पिकास सध्यां चांगला जोर येत आहे. खरीपाच्या पिकाच्या कापण्या, खळ्यांचीं कामें वगैरे जारीनें चालूं, आहेत. रोगराई म्हणण्या सारखी विशेष नाहीं.

कर्नल मेकंझी जुडिशिअल कमिशनर यांची स्वरी बुलढाण्याकडे गेली आहे.

मि. काटमेव्ह डिस्ट्रिक्ट पोलीस सुपरींटेंडेंट आफ पोलीस यांची बुलढाण्याहून इलिचपुरास बदली होत आहे असें म्हणतात.

वऱ्हाडांतल्या वऱ्हाडांत हाय कोर्टा सारखी न्याय खात्याची व्यवस्था होणार असल्याचें वर्षानुवर्षे घाटत होतें त्यास हिंदुस्थान सरकारची मंजुरात मिळाली व आतां स्थानिक सरकारा कडून त्या प्रमाणें व्यवस्था होईल तेव्हां खरें.

गेल्या आठवड्यांत पूर्व संकेता प्रमाणें मि. फ्रौडन कमिशनर साहेब येथें येऊन म्युनिसिपालिटीची व्यवस्था, कांहीं आफिसें, शाळा, दवाखाने वगैरे पाहून तीन दिवसां नंतर वाशिमा कडे रवाना झाले.

आह्मी मागील अंकीं इच्छा प्रदर्शित केल्याप्रमाणें मि. ए. पी. हॉवेल आफिशिएटिंग रेसिडेंट साहेब यांस त्यांच्या कामीं कायम करणारे आहेत अशी बातमी या आठवड्यांत प्रसिद्ध झाली आहे. काकतालीय न्यायानें कां होईना आमचा हेतु सफळ झाला ह्मणजे मिळालें.

येथें नवीन आलेले सिव्हिल सर्जन मि. रेली साहेब हे गेल्या आठवड्यांत आपल्या कामावर रुजूं झाले.

येथील तुरुंगांतून एक कैदी फरारी झाल्या मुळें जेलर मि. सिंक्लेर साहेब यांस १० रुपये दंड झाला आहे.

वाशिमाहून 'अडगांवस्थ' लिहितो कीं तेथील कंपनींत कोणी अण्णा आप्पानीं बेबंद नगरी चालविली आहे. अशा मर्यांचें पत्र छापणें उशिरां आल्या मुळें लांबणीवर पडलें आहे तें असयीं तसेंच पडो असें आह्मी इच्छितों.

---

पंजाब नादारी मुकद्दमा नंबर४१

नादाराच्या ठरावाची सावकारास नोटीस देणें तिचा नमुना

विद्यमान नादारी कोर्टाचे मज्य

जिल्हा आकोला

सर्वत्रांस कळविण्यासाठीं प्रसिद्ध केलें जातें कीं रामधनसा वल्लद लालचंद मारवाडी राहणार इन्द्राईत तालुके आकोलें हा नादार आहे असा आज ता० २२ माहे दिसेंबर सन १८८८ इसवी रोजी ठराव झाला असे आणि हा दिवस नादाराच्या सावकारानीं नेमण्याकरितां आणि सावकारांनीं आपल्या तर्फे आसामी नेमून देण्या करिता व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा विचार करण्याकरितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्यानें वरी यावद्दल आठ आण्याचे स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी त्या नोटीशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते आणि त्याबद्दल साक्षीस समन्सें करावयाची इच्छा असेल त्या साक्षीदारांची नांव नमूद करावी. ही नोटीस नेमण्याकरितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवसांपूर्वी तरी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करितां नादारांनीं दाखल केलेल्या यादी उघड रीतीनें ठेविल्या आहेत. ज्या नादारावर दावे नोंदविणे असतील त्यांनीं ०८ आण्याचे स्टांप कागदावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून यादी व ते दावे खरे अशा मतलबा प्रतिज्ञा लेख लिहून त्यावर अर्जदारांनी सही केली असावी.

२ जे सावकार दूरचे रहाणारे असती त्यांनीं ०८ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या ज्युडिशियल आफिसरा पुढें तिच्या खरेपणा विषयीं सत्य लिहावी. आणि ती यादी टपालांतून कोर्टाकडे पाठवावी ह्मणजे ते दावे रजिस्टरी दाखल होतील.

तारिख ८।१२।८८

सावकार रहाणार उमरावती.

१५१९०१०१ रामनारायण वल्लद भवानी

म वस्ती उमरावती.

W. K. Paranjap

क्लार्क आफ कों.

---

## वर्तमानसार.

मद्रासचे गव्हरनर लार्ड कानेमारा यांणीं स्वतःह्याच्या उपयोगाकरितां एक स्नानालय ( Swinming bath ) बांधून तत्प्रीत्यर्थ १२००० रुपये सरकारावर लादले, ह्मणून हिंदुस्थान सरकारानें ती रकम आपल्या खाजगींतून द्या, कारण असला खर्च करणें रास्त नव्हे असें मद्रासससरकारास लिहिलें होतें. पण लार्ड कानेमारा साहेबांनीं ही आपली चूक कायद्याची माहिती नसल्यामुळें झाली स बब माफी असावी, ह्मणून लार्ड डफरिनकडे अपील केलें होतें. तें मंजूर होऊन पुन्हा अशी चूक न होण्याबद्दल सावधगिरी ठेवा अशीं सक्त ताकीद देण्यांत आली. झाला हा प्रकार ठीक झाला त्याबद्दल आमचें कांहीं ह्मणणें नाहीं. मात्र शंका एवढीच कीं, मद्रास सरकाराला फाजील खर्च करण्याबद्दल जसें लार्ड डफरिन यांणीं हटकलें, तसें त्यांस कोणी हटकणार आहेत किंवा नाहीं? आणि असतील तर नुकेंच सिमला येथें बांधलेल्या जंगी इमारतीची अवश्यकता होती किंवा नाहीं याचा विचार कोणीच कां केला नाहीं? एकंदरींत दुसऱ्याचे डोळ्यांतील कुसळ दिसतें पण आपल्या डोळ्यांतील मुसळ दिसत नाहीं ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं.

कागळी आहेत कीं, सर्व... असें सांगूना इंग्रजी बिलकूल येत नाहीं. पण आह्मी असें विचारतो कीं, आजपर्यंत या सरसय्यद अहमदाच्या सहीनिशीं जीं एवढालीं काँग्रेसविरुद्ध पत्रें इंग्रजी पत्रांतून आलीं तीं कशीं? एक पत्रकर्ता तर असें सांगतो कीं, कोणी मि. बेक नांवाचे इंग्रजी गृहस्थ ह्या खान साहेबांच्या नांवानें सही करून पत्रें पाठवीत असतात. कमाल झाली ह्या कारस्थानांची आणि आमच्या वेड्या मुसलमान भाईंची!

डेपुटी कलेक्टरची जागा मिळण्याकरितां आपण जी खटपट केली व ज्या खटपटींवरून क्राफर्ड साहेबांनीं आपली शिफारस केली, त्या संबंधाचा पुरावा क्राफर्ड कामिशनपुढें देण्याविषयीं आतां हणमंतराव तयार झाले आहेत असें ह्मणतात.

अक्कलकोट, जंजिरा वगैरे जाहागिरदारांच्या संबंधांतील खटले दुसरें कामिशन नेमून त्याजपुढें आणण्याची कोशीट तयारी चालू आहे. मे. क्लिवारनर, मे. न्युजंट, व मे. मूर या त्रिवर्गाचें कामिशन दुसरें नेमण्याचा घाट दिसत आहे.

पुणें म्युनिसिपालिटीनें तेथील गायनसमाजास १००७ रुपये दिले.

भयंकर धाडस— बडोदा येथील रस्त्यावरील चौकींतील एका पोलीस शिपायानें परवा रात्रीं ९ वाजतां सरकार वाड्यांतील एका ३० वर्षांच्या स्वयपाक्यास एकांत गांठून त्याचे आंगावरील डागदागिने काढून घेतले व ही बातमी कदाचित तो बाहेर फोडील या भितीनें त्याचा गळा कापण्यास लागला होता. इतक्यांत हें सर्व कृत्य एका स्वारानें पाहिल्यावरून त्याच्या साह्यार्थ तो गेला, तेव्हां तो पोलीस शिपाई आपली टोपी व हातांतील बंदुक तेथेंच टाकून पळून गेला तो अद्याप मिळाला नाहीं. तो स्वयपाकी हल्लीं इस्पीतळांत आहे.

रत्नागिरीकडे सालमणकुरी पीक यावें तसें न आल्यामुळें तिकडील कुणबी लोकांच्या झुंडीच्या झुंडी मुंबईकडे येऊं लागल्या आहेत

गेले कार्तिक स्वामीचे यात्रेंत अव्यवस्था फार असल्यामुळें यात्रेच्या गर्दीत २१४ मनुष्यें चेंगरून मेलीं गेलीं.

अहमदनगरः- खा. ब. फ्रामजी अरदेसर यांस निजामच्या हैदराबादेस घोड्यांच्या शर्यतीमध्यें २७००० हजार रुपयांचें बक्षीस मिळालें.

समाधानाची गोष्ट—मुंबईंत पुढील १।२ वर्षांत १५।१६ कापडाच्या गिरण्या सुरू होणार अशी आनंदकारक बातमी कानीं आली आहे. ज्या प्रकारचा माल आजपर्यंत विलायतेहून येत होता तसा माल इकडे तयार करण्याकरितां कित्येक नेटीव पेढीवाले त्यांचीं यंत्रें विलायतेहून आणवीत आहेत.

नेटिवांची बहादुरी—जयपुर जिल्ह्यांत पांगीनों किरासाजी गांवाच्या एतद्देशीय मनुष्यानें चार बाया नदीस आलेल्या पुरांत पडून वाहून जात आहेत असे पाहतांच एकदम उडी घालून त्यांपैकीं तिघींचे प्राण मोठ्या शिताफीनें वांचविले त्या बद्दल सदर्हू मनुष्यास ६० रुपयांचें इनाम देण्याचें मद्रास सरकारानें ठरवून शिवाय हें बहादुरीचें कृत्य इंग्लंडांतील रायल ह्युमन सोसैटीच्या कानीं जाण्यासाठीं नाम० स्टेट सेक्रेटरी साहेबांकडें सर्व हकीकत लिहून पाठविण्याचा ठराव केला आहे.

भाताची लागवड.– गेल्या वर्षांत ३,१०२७६६ एकर जमिनींत लागवड झाली; म्हणजे १८८७ पेक्षां १२७१९९ एकर जास्त लागवड झाली.

अपराधी मनुष्याचा तारेतून फोटोग्राफ पाठविणें, ही युक्ति साधी आहे. ज्या अपराधी मनुष्याचा फोटोग्राफ पाठवावयाचा असेल त्याचा अप्रोहर फोटो काढावा. एक पारदर्शक कांचाचा तुकडा घ्यावा. व त्यावर आडव्या उभ्या समांतर व काटकोनांत अशा रेघा माराव्या. म्हणजे ज्या प्रमाणें नकाशावर अक्षांश रेखांशाच्या रेघा मारलेल्या असतात, त्या प्रमाणें रेघा आंखून कागद तयार करावा. नंतर कागदा वरील सर्व चौरसांत १,२,३ असें आंकडे टाकावे, किंवा अ, इ, क, अशा अक्षरें काढावीं. या प्रमाणें कागद तयार झाल्यावर तो फोटोवर ठेवावा. ज्या आंकड्या वरून फोटोच्या मुख्य रेघा जात असतील तें आंतडे कळवावे ज्या ठिकाणीं फोटो पाठवावयाचा येथें वर प्रमाणेंच एक कागद तयार करावा, व तारेंतून जसें आकडे येतील त्या प्रमाणें प्रत्येक कोष्टकावरून नेहऱ्याच्या रेघा काढाव्या. या रीतीनें तारेंतून पाहिजे त्या ठिकाणीं मिळू शकेल.

गव्हरनरच्या जागेंत काटकसर.– सरकारच्या मनांत जर योग्य काटकसर करावयाची असेल, तर मुंबई व मद्रास या जागीं गव्हरनर न नेमता लेफ्टनेन्ट गव्हरनर नेमावेत अशी 'स्टेट्समन' पत्र सूचना करते बंगाल व पंजाब या प्रांतांपेक्षां मुंबई व मद्रास या इलाख्यांची लोकसंख्या, उत्पन्न व क्षेत्रफळ कमी आहे; व ज्या अर्थी बंगाल व पंजाब इलाख्यांचें लेफ्टनेन्ट गव्हरनरां कडून काम चांगलें होकले जातें. तर मुंबई व मद्रास येथें लेफ्टनेट गव्हरनर नेमण्यास कोणत्याही प्रकारें हरकत नाहीं असें त्या पत्रकारांचें म्हणणें आहे. परंतु सरकारास ही गोष्ट रुचावी कशी? सन्मानाच्या व किफायतीच्या जागीं दोन श्वेतकायांचो वर्णी लागली असली, तर त्याना तें कां काढून टाकतील? ज० व्हि०

वानरानें खून एकडलां.– एक गारोडी, त्याची पत्नी, नोकर व दोन वानर वाटेनें चालत असतां, त्यावर मोपले लोकांनीं हल्ला करून, एक वानर शिवाय करून सर्वांस ठार मारलें. एक वानर चुकला तो जवळच्या एका झाडावर जाऊन बसला होता. त्यानें हें सर्व कृत्य पाहिलें होतें. पोलीस लोक जेव्हां तलास करावयास आले तेव्हां त्यानें एका पोलीसच्या पायांतील विजार धरून त्यास आपला धनी कोठें पुरला आहे हें दाखविलें. नंतर ज्या झोंपडी कडे ते मारेकरी पळाले तिकडे त्या शिपायाला त्यानें नेलें. त्या झोंपडींत कोणी नव्हतें. इतक्यांत त्या वानराच्या दृष्टीस नदीमध्यें स्नान करतांना एक मोपला पडला. या प्रमाणें सर्व आरोपी सांपडले असून त्यांस कलकत्यास रावना केलें.

बिन अवाजी दारू– फ्रान्स देशांत दारू तयार करण्याची नवीन युक्ति निघाली आहे. या दारूचा बार भरला असतां त्याचा अवाज होत नाहीं. ८०० कदमांवरून जरी बार काढला, तरी ऐकू येत नाहीं. फ्रेंच लोकांना ही युक्ति सापडल्या मुळें त्यांचे फार कल्याण होईल शत्रूला न कळत त्यावर गोळ्या सोडण्याला ही युक्ति चांगली ... दिवसानु दिवस मनुष्यवधाच्या युक्त्या निघत आहेत यां पासून मानवी जातीचें तादृश हित व्हावयाचें नाहीं. न्य० लि०

फ्रेंच व जर्मन या लोकांचे दरम्यान भर कचेरींत उण्या उत्तरांची रेलचेल उडत असल्या मुळें उभय राष्ट्रांत लवकरच रणकंदन माजेल असा रंग दिसत आहे.

मद्रास इलाख्यांत त्रिपती नांवच्या गांवांत झाडू लोकांचें काम गांव डुकरांकडून करवावयाचें असा परिपाठ आहे व तीं डुकरें ही त्या कामांत अति प्रवीण झालेलीं असून त्यांस घराच्या आवारांत शिरण्यास मनाई नसते. सरकारांतून ही चाल बंद करून झाडूची चाल पडण्याची खटपट झाली, पण ती लोकांनीं ऐकिली नाहीं.

आह्मास लिहिण्यास संतोष वाटतो की मागें माणगांव येथील "ग्रामसुधारणा मंडळीच्या" संबंधानें आह्मी जो मजकूर लिहिला होता त्याच्याच आधारा वरून नारायण गांव येथेंही एक "ग्रामसुधारणा मंडळी" स्थापन होण्याचें वाटत आहे. ही मंडळी अ- अर्थात म्युनिसिपालिटीचीं कामें करणार. अशा मंडळ्या ज्या ज्या गांवांत स्थापन होतील त्या त्या गांवांतील एकीच्या संबंधानें प्रश्नच रहात नाहीं, पण त्या गांवचा संब पाहून त्याकडे कोणाची पहाण्याची देखील छाती व्हावयाची नाहीं एवढेंच नव्हे तर खऱ्या स्वराज्याचें मूळ तीं बनतील हेंही आह्मी खात्रीनें सांगतों. पु० वै०

एक चंद्रमुखी स्त्री चुलींतला विस्तव फुंकित असतां दृष्टीस पडल्या वरूनः— कवि ह्मणतोः—

श्लोक

शशी मुखी फुंकित पावका ला,
आश्चर्य मोठें गमतें मनाला;
अहो समाचार विचित्र झाला,
आकाशीचा चंद्र चुलींत गेला. १

तें ऐकून चंद्राचे दोषदाखवून, आपले मुखाचें श्रेष्ठत्व वर्णित होत्साती स्त्री ह्मणतेः—

श्लोक

अर्तीये ऐक धूर्ता अवगुण शशिचे
हा सदाचा अपुर्ता, एके रात्रीं सपुर्ता,
तदुपरि टपतो राहु खग्रास कर्ता।
ऐशाला डागवर्ता, पतिविरहिणीचा
शस्त्र जो प्राण हर्ता मासांतीं शून्य
वार्ता, शशिमुखिवनिता सांडि हा
शब्द पर्ता. २

मुंबई येथें "बांबे चेस क्लब" बुद्धिबळें खेळणारी मंडळी नुकतीच स्थापन झाली आहे.

हिंदुस्थान सरकारानें दिल्ली शहरचा तट पाडण्याचा व लाहोर गेट काढून टाकण्याचा हुकूम केला आहे कां! न्या० सु०

"TO THE DEAF."

A person cured of Deafness and oNises in the Head of 23 years, standing by a Simple Remedy, will send a description of it free to any Person who applies to J. H. Nicholson, 5 Old Court House Street, Calcutta.

बहिऱ्यांस

बहिरेपणा आणि २३ वर्षांचा कर्णनाद यास गुण आणणारे सोपें औषध.

जे. एच्. निकलसन, ५ वी ओल्ड कोर्ट हौस स्ट्रीट कलकत्ता, यांस पोस्टपेड पत्र पाठविलें असतां औषधाबद्दलची माहिती फुकट पाठविली जाईल

D'ONT LOOK AT THIS!
RARE OPPORTUNITY!!
PROFITABLE LAGAL INVESTMENT!!!
RS. 35000
TO BE GIVEN AWAY!!!
*For particulars— apply, f r prospectus ( to be posted gratis ) to*
MESSRS. J. BHARTIA & BROTHERS.
*General Merchants and Commission Agents.*
FALKLAND ROAD,
BYCULLA POST,
BOMBAY.

इकडे पाहूं नका!
फारच दुर्मिळ संधि!!
कायदेशीर रितीनें
थोड्या खर्चांत मोठा लाभ!!!
रुपये ३५,०००
वाटून द्यावयाचे आहेत!!!
विशेष माहितीसाठीं एका कार्डावर आपला पत्ता कळवा, ह्मणजे प्रास्पेक्टस फुकट पाठविण्यांत येईल.
मेसर्स.जे. भरतिया अँड ब्रदर्स,
जनरल मर्चन्टस अँड कामिशन एजन्टस,
फाकलंड रोड, भायखळा पोस्ट, मुंबई.

☞ हें पत्र आकोला येथें के० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सालभरचे ११ ० ... ८
किरकोळ अंकास.......................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस.........०१

Six monthly..........3 ... as.
Single copy..........................4 as.

Advertisements
Below 10 lines...2Rs
per line over10...4as.
Repetition derline 3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXII — AKOLA MONDAY 17 DECEMBER 1888 — NO.49

वर्ष २२ — अकोला सोमवार तारीख १७ माहे दिसेंबर सन १८८८ इ० — अंक ४९

नमुनाजी.

पंजाब नादारी मुकद्दमा नंबर४४
नादाराच्या ठरावाची सावकारास नोटीस देणें तिचा नमुना
विद्यमान नादारी कोर्टाचे जज्य साहेब कोर्ट आकोला

सर्वत्रांस कळविण्यासाठीं प्रसिद्ध केलें जातें कीं महमद हुशेन वल्द महमद हयाद चुडेवाला मन्यार वस्ती आकोलें हा नादार आहे असा आज तारखेस ठराव झाला आहे. आणि तारीख १९ माहे जानेवारी सन १८८९ हा दिवस नादाराच्या सावकारानीं नेमण्याकरितां आणि सावकारांनीं आपल्या तर्फे आसामी नेमून देण्याकरिता व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा विचार करण्याकरितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं याबद्दल आठ आण्यांचे स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी त्या नोटीशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल तें आणि त्याबद्दल साक्षीस समक्ष करावयाची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमूद करावी. ही नोटीस नेमण्याकरितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवसांपूर्वीं तरी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनां पहाण्या करितां नादारांनीं दाखल केलेल्या यादी उघड रीतीनें ठेविल्या आहेत. ज्या नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं ०८ आण्याचे स्टांपकागदावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरे असा बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्यावर अर्जदारानें सही केली असावी.

२ जे सावकार दूरचे रहाणार असतील त्यांनीं, ०८ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या ज्युडिशियल ऑफिसरा पुढें तिच्या खरेपणा विषयीं शपथ लिहावी. आणि ती यादी टपालांतून कोर्टास पाठवावी म्हणजे ते दावे रजिस्टरीं दाखल होतील. तारीख ११।१२।८८

सावकाराची यादी

१ गोंदुलाल प्रभुदास साहू दुकान आकोलें. रुपये. ७३४।०॥

२ सखाराम भगवंत पंतोजी वस्ती सिलोडे रुपये.५००

३ लक्ष्मण भास्कर वकील वस्ती आकोला रुपयें २००

४ कृष्णराव रामचंद्रराव बुटी बस्ती आकोलें रुपये २००

५ तानअहमद वल्द सेखदावल वस्ती ताजनापेठ आकोलें९०

६ बनसिलाल मुकुंदलाल मयत वारीस पुत्र बालचंद व मोतीलाल वस्ती आकोलें. ३५

७ मुकुंदलाल बाबनलाल म. वा बायको मनाबाई तर्फे मु० रामजी येकोबा वस्ती आकोलें १५०

W. K. Paranjape
क्लार्क आफ कोर्ट.

## जाहिरात.

वऱ्हाड वक्तृत्वोत्तेजक सभेचा सोळावा समारंभ.

— * —

सर्वांस विनयपूर्वक कळविण्यांत येतें कीं, शहर उमरावती येथें या सभेचा समारंभ शुक्रवार ता० ११ माहे जानेवारी सन १८८९ रोजीं सुरू होणार आहे. समारंभाची जागा पुढें कळविण्यांत येईल.

चालू सालीं भाषणा करितां दोन विषय नेमले आहेत.

विषय १ ला—शिक्षण म्हणजे काय; तें कोणत्या धोरणावर असावें? प्रस्तुत सरकारी शाळांतून चालू असलेली शिक्षणपद्धति योग्य तत्वास अनुसरून आहे कीं काय? नसल्यास तींत कोणकोणते फेरफार करणें अवश्य आहे. या गोष्टीचें पूर्ण विवेचन करणें.

विषय २ रा—हिंदुस्थानच्या जमाखर्चाची सन १८८७–८८ सालची माहिती देणें, आणि चालू राज्यव्यवस्था कायम राखून खर्च कमी करण्याचें व उत्पन्न वाढविण्याचें सुखसाध्य उपाय कोणते ते सुचविणें.

बक्षिसें—पहिल्या विषयाला पहिलें बक्षिस रुपये ४० चें व दुसरें रुपये २० चें ठेविलें आहे.

दुसऱ्या विषयास पहिलें बक्षिस रुपये ३५ चे व दुसरें रुपये १५ चे ठेविलें आहे उमेदवारांस लागू असणारे नियम.

+टिप शेवटीं पहा.

( १ ) उमेदवाराचें वय १८ वर्षांहून कमी नसावें

( २ ) प्रत्येक उमेदवाराचें भाषण अर्धा तासांत संपण्याजोगें असावें, परंतु योग्य वाटल्यास अर्ध्या तासा पूर्वींच भाषण बंद करण्याचा किंवा अधिक वेळ पर्यंत चालू ठेवण्याचा अधिकार परीक्षकांस आहे.

( ३ ) कोणी उमेदवार कोणाही व्यक्तीस अनुलक्षून भाषण करील किंवा सरकारच्या विरुद्ध भाषण करील, किंवा निंदित्स शब्द भाषणांत आणील, तर त्याचें भाषण बंद करण्यांत येईल.

( ४ ) भाषणाच्या पूर्ण गुणांच्या एक तृतीयांशाहून अधिक गुण ज्या उमेदवारास मिळाले आहेत. त्यांपैकीं ज्यांचीं भाषणें परीक्षकांस पसंत पडतील त्यांसच बक्षिसें दिलीं जातील.

( ५ ) प्रत्येक उमेदवारानें आपलें भाषण लिहून सभेच्या सेक्रेटरी जवळ आणून दिल्या शिवाय त्यास भाषण करण्याची परवानगी दिली जाणार नाहीं.

( ६ ) नेमिलेल्या दोन विषयां पैकीं एकाच विषया वर भाषण करण्यास उमेदवारास परवानगी आहे.

(७) भाषण करण्यास येणाऱ्या उमेदवारांनीं आपले अर्ज ता० ५ जानेवारी सन १८८९ इ० चे आंत सेक्रेटरीकडे उमरावती शहर–लायब्ररीचे पत्यावर पाठवावें आणि समारंभाच्या पूर्व दिवशीं सेक्रेटरीस भेटावें.

नेमलेल्या अगर दुसऱ्या एखाद्या स्वतंत्र विषयावर सन्मानार्थ भाषण करण्याची कोणा गृहस्थाची इच्छा असल्यास त्यांस सवडी प्रमाणें परवानगी देतां येईल.

+ टीप—पहिल्या विषयावर भाषण करणाऱ्या उमेदवारांनीं 'शिक्षण' या विषयावर हर्बर्ट स्पेन्सर साहेबांचें व बेन साहेबांचें पुस्तकें वाचून माहिती मिळवावी.

दुसऱ्या विषयावर भाषण करणाऱ्या उमेदवारांनीं हिंदुस्थान सरकारचे सन १८८८-८९ सालचे बजेट व मि० दादाभाई नवरोजी यांचे 'हिंदुस्थानचे दारिद्र्या वरील विचार' हीं पुस्तकें वाचून माहिती मिळवावी.

उमरावती ता० ८ माहे नवंबर सन १८८८ इ० — श्रीधर रामचंद्र पिंपळखरे, वासुदेव नारायण जोग, व० व० स० सेक्रेटरी

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा० रा० वऱ्हाडसमाचारपत्रकर्ते यांस

ता. १२-१२-८८

कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विशेष आतां पावसाचें वऱ्हाड उठलें. आकाश स्वच्छ झालें थंडी चांगली पडूं लागली. थंडी बरोबर येणाऱ्या रोगांच्या स्वाऱ्या दृष्टीगोचर होऊं लागल्या. बाजार भावांचे मान आहे तसेंच आहे. गव्हांचीं पिकें चांगलीं आहेत. अखेर ती चांगल्या रीतीनें हातीं लागलीं पाहिजेत. म्हणजे सुबत्ता होईल.

वऱ्हाडचे नवीन नेमिलेले कमिशनर साहेब बहादूर यांची स्वारी येथें ता० ९-१२-८८ इसवी प्रातःकाळीं दाखल झाली. त्यांचे बरोबर त्यांचे शिरस्तेदार मि. पिसोळकर हे होते. सर्व गांवांतील संभावीत लोक पेशवाईकरितां गेले होते. सर्व गांवांतील स्वच्छता उत्तम प्रकारची ठेविली होती हें मुनसिपालीटीचे चालकांस मोठें भूषण होय. रेव्हिन्यु कामाचे संबंधें व खजिना वगैरेची तपासणी झाली. ता० १०।१२।८८ इसवी रोजीं साहेबबहादुरांची स्वारी जिल्हाधिपती सह प्रातःकाळीं सात वाजण्याचे सुमारास बैलगाडीतून क्यांपमधून गांवांत आली. प्रथम सिव्हिल हॉसपिटल पाहिलें. नंतर स्वारी इं० म० शाळेंत आली. सर्व वर्ग पाहिले. परीक्षा पाहिल्या एकदोन वर्गांची घेतली असें ऐकितों. व मुलांच्या संबंधें वगैरे साहेबबहादुरांनीं चांगली चौकशी केली. शाळेची उत्तम व्यवस्था, मुलांची नीती कपडेलत्ते धारण करण्याची शैली, त्यांची स्वच्छता वगैरे पाहून साहेबबहादुरांना फार खुषी झाली असें दिसतें. व या सर्व त्यांच्या बारीक चौकशीवरून त्यांना विद्येची फार गोडी आहे असें दिसतें. व त्यांच्या अमलाखालीं शाळाखात्यास अनेक प्रकारें उत्तेजन मिळे असें लोक इच्छितात. ही शाळा पाहिल्या नंतर साहेब बहादूर देवपेठच्या मराठी शाळेकडे गेले. तेथें कांहीं पाहून तेथून जेल कडे गेले. तेथील व्यवस्था पाहून फार खुष झाले असें म्हणतात. साहेबांनीं ह्या प्रांतांत एकून फक्त पंधरा दिवस झाले इतक्यांत ह्या प्रांतांतील चांगली माहिती करून घेतली व आणखी माहिती करून घेत आहेत. ता० ११ रोजी सिरपुराकडे स्वारी गेली. बरोबर जिल्हाधिपती आहेत. साहेब फार सौम्य असून रयतेला चांगले हातील असें वाटतें.

आमच्या ह्या जिल्ह्यांतील एकुलत्या इं० म० शाळेची स्थिती दिवसानुदिवस भरभराटीस येत चालली आहे हे हल्लींच्या हेडमास्तर साहेबांस मोठें भूषण आहे. गेले सालीं येथें आठवी इयत्ता सुरू झाली. वर्ष पाहिलें असतां ही निकाल चांगला झाला. सालमजकूरच्या परिक्षेंत तर निकाल उत्तम झाला. जितकीं आठवींत परीक्षेस गेली होती तितकीं सर्व परीक्षां उतरली. यावरून शिक्षणपद्धती कशी, व्यवस्था कशी, मास्तर साहेब काळजी किती घेतात हें सहज दिसून येत. येथें ९ वी ईयत्ता सुरु व्हावी असें आमचे गावकरी लोकांचें म्हणणे आहे. परंतु इतक्यांतच ती होईल असें वाटत नाहीं कारण नवीन मिडल स्कुलांत इयत्ता सुरू करण्याचे जे ठराव आहेत त्या ठरावांत पास झालेलीं मुलें इयत्ता सुरू करण्यास बस नाहींत जसजशी अधिक मुलांची संख्या आठवींत होत जाईल तस तशी संधी ... व म- ... त्यानें तसुरु करण्याची येईल. मात्र इ ... आणि दोन ... कीं हा जिल्हा फार गरीब ... ताफ्यास न्यु- ... फार लांब म्हणून दोन्ही ही ... ताफ्याचें बजन ... सून लांब जाण्या येण्याची ... करण्यांत ... तेव्हां येथें नव्या ईयत्तेचा प्र... गें होणार नाहीं.

अलिकडे विद्येची अगदींच माती होऊं गेली. विद्येच्या आंगची किंमत कधीं ही कमी होत नाहीं परंतु नोकरीच्या द्वारानें जी बाहेरची किंमत ती कमी इतकी झाली आहे पाहिजे त्या पगारावर मोठे मोठे विद्वान येऊं लागले आहेत. मी असें ऐकतो कीं येथील ई. म. शाळेंत २५ रुपयावर कोणी बी. ई. पास झालेला मनुष्य येत आहे हें खरें असेल तर आतां इंग्रजी विद्या शिकून पुढें फायदा काय होणार हें उघड आहे भूषणा ... आहे

विद्या शिकणार रेपत वान आमच्या मध्यें कोठे फारसें आहेत? सर्व पोटासाठीं!!

येथील कंपनीचें दुकान उत्तम प्रकारें चालतें आहे " आडव्हांस" आपल्या कडे पत्र द्वारें "आणा आणापा" विषयीं गिला करितो त्या वरून असें दिसतें कीं आणाआपानीं त्याला त्यांचे इच्छे प्रमाणें स्वस्त जिन्नस दिले नसावेत असें वाटतें अगर त्यांचा त्याचा कांहीं खासगी द्वेष असावा ह्या दोंहोंतून कांहीं असल्या शिवाय इतर दुसरें कारण त्याच्या लेखणीची करडी नजर आणाआपा कडे होण्यास कांहीं दिसत नाहीं. कदाचित आणाआपानीं ही गोष्ट मनावर घेतल्यास व न्यायसना पर्यंत मजल ठेपल्यास सदहू आडगावस्थ सिद्ध करून देईल काय? ज्यागोष्टी सार्वजनिक हिताच्या असतील अगर कालांतरानें हिताच्या होतील अशा गोष्टी विषयीं लिहिलें असता वावगें होईल असें नाहीं परंतु व्यक्ती विषयीं एकदम लेखणी उचलून त्यांस गुन्हेगार ठरवून देणें हें किती आश्चर्य आहे बरें। पत्र कर्तोव आम्हीं फार आजारी होतों कामधाम सर्व सोडून घरीं बसलों होतो. सबब नित्या प्रमाणें भेटीस न येतां उशीर झाला. कळावें ही विनंति.

आपला

"क्ष"

---

वऱ्हाडसमाचार.

---

मिती मार्गशीर्ष शुद्ध १४ शके १८१०

---

फार दिवसांपासून वाटत असलेली वऱ्हाडांतील न्यायखात्याचा व्यवस्था अखेरीस पास झाल्या बद्दल प्रसिद्ध झालें आहे. ही बातमी खरीच असल्यासें वऱ्हाडांतील लोकांस हाय कोर्टाकरितां हायद्राबादेस जाण्याचा त्रास होत होता तो सर्व बंद होईल. हल्लींचे जुडिशियल कमिशनर कर्नल मेकंझी हे राहती कीं नाहीं याचा मात्र संशय आहे. कोणी ह्मणतात कीं या जागेवर कोणी तरी न्याय खात्यांत निष्णांत असा कामगार आणणार. त्याचप्रमाणें एक सेशन जज्जाची ही जागा [illegible]णार तिजवर कोण नेमतात पहावें. ज्युडि[illegible] असिस्टंटच्या २ जागा तर अगोदर [illegible] आहेत. ही सर्व व्यवस्था फक्त पा[illegible]हे एवढें कळतें. तिची अमलबारी [illegible]क दिवस लागतील. वऱ्हाडचा [illegible] १८८६ सालीं पास झाला व [illegible] अमलबारी होतच आहे. या व्यवस्थेपासून आह्मा वऱ्हाडवासी जनास दोनें प्रकारें सुख होणार. एकंदर हायकोर्टाकरितां हैद्राबादेस जाण्याचा त्रास चुकला व दुसरें आलिशान रेसिडेंट साहेब हायकोर्टाच्या कामांतून मोकळे झाल्या कारणानें वऱ्हाड संबंधाच्या इतर कामांत लक्ष देण्यास त्यांस फुरसत मिळेल.

याच व्यवस्थे संबंधानें २–३ एक्स्ट्रा अशिस्टंटच्यों जागा अधिक होणार ह्मणून ऐकण्यांत येतें. पण त्यांत आश्चर्याची गोष्ट ही आहे कीं या नवीन जागे पैकीं एकीवर स्कीम सुरू होण्या पूर्वींच कलकत्ता सेक्रेटरीएट मधील एका गृहस्थाची नेमणूक होऊन बसली आहे ह्मणून समजतें! शाबास!! आह्माला वाटतें इकडील जागावर लंडन मधील इंडिया आफिसातील लोकही थोड्या दिवसांनीं येऊं लागतील.

---

वाईट गोष्टी पहाण्याची व ऐकण्याची आह्मास पुष्कळ संवय झाली आहे. तथापि हैद्राबाद संस्थानची सध्यां जी अवस्था झाली आहे तीज सारखे वाईट कशाचेंही वाटत नाहीं. या संस्थानची पुढें मागें काय वाट होणार याची कल्पनाच करितां येत नाहीं. अबदुल हक्क प्रकरणाचें केवढें काहुर उठलें गेलें! अबदुल हक्क रसातळीस मिळाले असें वाटत होतें. पण बहादर सर्व लचांडांतून सुका निसटला इतकेंच नाहीं तर आतां असें ही कळतें कीं निजाम साहेबांचे दिवाण साहेबांची त्यांची समेट होऊन त्यांचा नजराणाही स्वीकारण्यांत आला. अर्थात या सर्व गोष्टी पाठीवर कांहीं तरी दुसरें ऊन असल्या शिवाय झाल्या नाहींत. नशीब आमच्या एतद्देशीय संस्थानिकांचें.

---

या काफड प्रकरणाचे छोटे कोठे कोठे उडतील याचा कांहीं नेम सांगवत नाहीं. आजपर्यंत या बड्या प्रकरणांतून अनेक छोटी छोटी प्रकरणें बरींच निघालीं. असतां असा प्रश्न निघाला आहे कीं पेणशास ल.चा संबंधाच्या सर्व गोष्टी माहित असतां त्यांनीं सरकारच्या कानावर त्या घातल्या नाहींत ही त्यांची चुक आहे. मुंबई युनिव्हरसिटीनें तर आपली एक सिंडीकेट भरवून बहु मतानें पेणशांस या बद्दल विचारलें आहे. पण पेणशांनीं सौम्य रीतीनें युनिव्हरसिटीस उलट उत्तर पाठविलें आहे कीं "जबाब देण्यास मी तयार आहे परंतु तसें करण्या बद्दल अगोदर मला सरकारची मंजूरी पाहिजे आहे तेवढी आणून द्यावी" याचा काय निकाल होतो पहावें.

---

हायरे बिचारी वैतरण! अद्याप तिचा कोठें पत्ता लागत नाहीं. व एक एक बातम्या तर अगदीं निराशपणाच्या येत आहेत. पत्तुंबा नांवाच्या एका बोटीवरील कप्तान असें कळवितो कीं " वैतरणा " शेवटीं ज्या बंदरापासून निघाली त्याच बंदरातून मी निघाल्यावर ज्या वाटेनें ती गेली त्याच वाटेनें मी जात होतो परंतु मध्येंच वादळ लागलें; तेव्हां मीं दिशा वळवून दुसरी कडे चालगों दुसरें दिवशीं नक माशाचे थवेच्याथवे एक सारखे जोरानें कोठें तरी जातांना माझ्या दृष्टी न पडले." अर्थात जो पर्यंत दुसरी खबर आली नाहीं तोपर्यंत हीच गृहित धरून चालावयाचे. बिचारे हजारो प्राणी शेवटीं नक्रांच्या पोटांत गेले ह्मणावयाचे. आपल्या वऱ्हांडांतील कांहीं गुजराथी मारवाडी वगैरे लोक द्वारकेची यात्रा याच बोटींत करून परत येत होते असें लोक ह्मणतात. जळगांव तालुक्यांतील एका गांवाची ३ कुटुंबें त्यांत होती असें एक जळगांवकर बातमीदार कळवितो. काय हा अनर्थ!

# लार्ड डफरीन आणि राष्ट्रीय सभा

यंदाच्या राष्ट्रीय सभेचे दिवस जसजसे जवळ येत चालले आहेत तसतसी तिजसंबंधानें देशांत चळवळ ही अधिकाधिक होत आहे. आजपर्यंत हीच चळवळ फक्त एतद्देशीयां पैकीं लोकांतच सुरू होती परंतु अलिकडे मोठ मोठे आंग्लो इंडियन कामगार ही तींत मन घालूं लागले आहेत हें एक सुचिन्ह समजलें पाहिजे. थोड्याच दिवसा पूर्वीं वायव्य प्रांताचे ले. गव्हरनर सर आकलंड काल्व्हीन यांनीं आपले विचार प्रदर्शित केले. त्यावर लागलेच लार्ड डफरिन साहेबांनीं जातां जातां हिंदुस्थानवासी जनांस आपली शेवटची सूचना उपदेश या रुपानें या विषया वरील आपले विचार प्रगट केले. या सभे संबंधानें सरकारचा रोख कोणीकडे आहे हें आजपर्यंत खात्रीनें सांगता येत नव्हतें. मोठ मोठ्या सरकारी अमलदारांच्या वर्तना वरून सरकार केवळ सभेच्या विरुद्ध नाहीं येवढें मात्र दिसून येत असें परंतु लार्ड साहेबांच्या या भाषणानें पुष्कळ खुलासा करून टाकिला आहे. सभेचे जे उद्देश आहेत व ती जीं कामें करित आहेत त्या पैकीं सरकारला संमत किती आहेत व असंमत किती आहेत या बद्दल पुष्कळ खुलासा लार्ड डफरीन साहेबांच्या भाषणानें केला आहे. हा जातां जातां त्याचा आपल्यावर अनुग्रहच समजला पाहिजे.

लार्ड डफरीन साहेबांच्या भाषणाच्या एकंदर रोखा वरून राष्ट्रीय सभा त्यांना बिलकुल पसंत नाहीं असें जरी होत नाहीं तथापि त्यांनीं तिज मधील जे दोष काढून दाखविले आहेत व ते ज्या रितीनें दाखविले आहेत त्या वरून इतकें मात्र स्पष्ट होतें कीं राष्ट्रीय सभेच्या संबंधाच्या कांहीं गोष्टी त्यांस पहिल्या पासून आवडत नव्हत्या व त्यां बद्दल आपली नाखुषी प्रदर्शित करण्याचा प्रसंग ते पहात होते. हा प्रसंग सेंट आंड्रूज येथील मेजवानीनें आणिला. या प्रसंगीं लार्ड साहेबांनीं आपलें अंतःकरण अगदीं खुलें करून आम्हा लोकांस व आमच्या पुढाऱ्यांस उपदेश केला आहे. अर्थात् या उपदेशाचा फायदा आपण करून घेतला पाहिजे. या उपदेशा वरून, सरकारला आमच्या कृत्यां पैकीं कोणत्या गोष्टी आवडतात व कोणत्या आवडत नाहींत हें आपल्यास कळलें आहे तेव्हां आपल्या वास्तविक चुका असतील त्या सुधारून जेथें आपला सत्य पक्ष आहे येथें त्या बद्दल सरकारची खात्री करण्यास आपण झटलें पाहिजे.

लार्ड डफरीन साहेबांनीं कांग्रेस संबंधानें आपले जे उद्गार प्रगट केले आहेत ते विचार त्यांच्या मनांत उत्पन्न होण्यास कारण कांग्रेसच्या उपदेशां बद्दल त्यांचा एक प्रकारचा गैर समज होय. त्यांचा पहिला आक्षेप असा आहे कीं राष्ट्रीय सभेच्या मनांत हिंदुस्थान देशाला इंग्लंडच्या पार्लमेंट प्रमाणें एक पार्लमेंट असावें व त्यांत सरकार तर्फेच सभासद कमी असावेत. ही गोष्ट वास्तविक असंभव्य आहे. राष्ट्रीय सभा असली विलक्षण मागणी मुळींच करीत नाहीं. तिच्या ठरावांत कायदे काउन्सीलें सुधारण्या बद्दल जे ठराव आहेत त्यांचा अर्थ एवढाच कीं या काउन्सालांत लोकमताला हल्लीं जो मान मिळत आहे त्या पेक्षां अधिक मिळावा व जमाखर्चाची वार्षिक अंदाज पत्रक या सारख्या मोठमोठाल्या प्रश्नांचा विचार होत असतां लोकतर्फे निवडलेल्या कांहीं मुख त्यारांचीं त्यांत मतें असावींत. आतां मि० ह्यूम किंवा त्यांच्या सारख्या राष्ट्रीय सभेच्या उत्पादकां पैकीं [illegible] यांच्या तोंडून अशा प्रकारचे उद्गार निघाले असतील. परंतु तेवढ्या [illegible] व सर्व सभेला ते संमत आहेत असें अनुमान काढितां येणार नाहीं. सय्यद अहमद, काल्व्हिन या सारख्यांचा आक्षेप राष्ट्रीय सभेवर हाच आहे. तरी लार्ड डफरिन साहेबा सारखे दुरदर्शी मुत्सद्दी येथें कसे चकले हें मोठें आश्चर्य आहे.

दुसरा आक्षेप हा कीं राष्ट्रीय सभेनें मोठ मोठ्या राजकीय गोष्टींचा विचार न करितां सध्यां फक्त देशहिताच्या दुसऱ्या ज्या सामाजिक व इतर गोष्टी आहेत, ह्मणजे लग्नाचा अवाढव्य खर्च, शेतीची सुधारणा, व्यापारास उत्तेजन, आरोग्य, लोकांची गरिबी, स्त्रियांची परवशता, धंदशिक्षण, लोकांचे परदेशांत याण, इत्यादी विषयांचा विचार करावा. हा उपदेश कांहीं वावगा नाहीं. तथापि लार्ड डफरिन साहेब आपल्या भाषणांतच कबूल करितात कीं जाती धर्म, आचार विचार यासंबंधानें हिंदुस्थानासारखें वैचित्र्य दुसरें कोठें नाहीं अर्थात जेथें असें वैचित्र्य आहे तेथें सर्व देशाला साधारण अशा सभेंत या निरनिराळ्या विषयांचा विचार करणें अशक्य आहे. हीं कामें जागोजागच्या स्थानिक कमिट्यांनीं करावयाचीं आहेत या संबंधानें राष्ट्रीयसभेचें काम इतकेंच कीं तिनें या विषयांचा विचार करण्याची शिफारस व लागल्यास आपल्या उपदेशाची मदत जागोजागच्या स्थानिक मंडळ्यांस द्यावी. या परतें काम या संबंधानें राष्ट्रीय सभेस मुळींच करितां येणार नाहीं.

साहेब बहादुरांनीं राष्ट्रीय सभे संबंधानें जीं जीं छोटीं पुस्तकें व पत्रकें गुदस्ता प्रसिद्ध झालीं आहेत त्या संबंधानें काल्व्हिन साहेबांप्रमाणेंच आक्षेप आणिला आहे. या आक्षेपास उत्तर मि. ह्यूम यांनीं अगोदरच दिलें आहे व त्या उत्तरा बरोबर छाती ठोकून त्यांनीं असें ही बोलून दाखविलें आहे कीं हीं पुस्तकें राजद्रोही आहेत असें सिद्ध करून ज्याच्यांत शक्ती असेल त्यानें मजवर त्यासंबंधानें फिर्याद करावी ह्यूम साहेबाच्या या बोलावण्यास कोणी ही अद्याप पुढें आलेलें दिसत नाहीं.

हे व या सारखे दुसरे कांहीं आक्षेप साहेबांनीं पुढें आणिले आहेत त्यासर्वांविषयीं येथें लिहीत बसण्याचें कारण नाहीं. या सर्वां वरून आपण बोध इतकाच घ्यावयाचा कीं ज्यांना ज्यांना आपण मित्र ह्मणत होतों त्यांच्या मनांत देखील आपल्या विषयीं संशय व एक प्रकारची भिती उत्पन्न होत चालली आहे. काल्व्हिन, डफरिन, फार्बिस आडाम यांसारखे गृहस्थ पुढें येऊन " तुमच्या मागण्या फाजील आहेत, " असें सांगत आहेत तेव्हां आपण खबरदारच सावध राहिलें पाहिजे.

याच भाषणांत लार्ड डफरिन साहेबांनीं आपणांस दुसऱ्या अनेक गोष्टींविषयीं मनापासून बोध केला आहे व आपल्याबद्दल कळ-

कळ दाखविली आहे त्यासर्वांबद्दल त्यांच आपण आभार मानिले पाहिजेत.

चक्रवर्तिनी महाराणी सरकारचे चिरंजीव ड्यूक आफ कानाट यांची स्वारी परवां शनिवारी दिवसाच्या गाडीनें नागपुरकडे वऱ्हाड मार्गे रवाना झाली. साहेबांच्या येण्या जाण्याचा पूर्व संकेत बहुतकरून पुष्कळांस माहित नव्हता ह्मणून त्यांच्या आदरातित्या साठीं शिष्टसंप्रदायानुरूप कांहीं एक निराळी व्यवस्था झाली नाहीं ही मोठ्या दिलगिरीची गोष्ट आहे. गेल्या दोन आठवड्यांत कांहीं पलटणी मुंबई इलाख्यांतून नागपूर कामटी कडे बदलल्या प्रमाणें वऱ्हाडांतून तिकडे गेल्या त्या निमित्त साहेबांचें मध्यप्रांतांत आगमन झालें आणि सहजरित्या राजपुत्रांचे पाय आमच्या प्रांतास लागले ह्मणून आह्मास फार फार आनंद वाटतो.

ड्यूक साहेबांचें आदरातिथ्य होण्यास सवड नव्हती तरि आनंद मानण्यास जागा एवढी आहे कीं आमचे माजी असिस्टंट कमिशनर दस्तूर बहिमंजी जामास्पजी सी. आय. ई. यांनीं स्टेशनावर ड्यूक साहेबांचें हारतुऱ्याच्या दरबारी थाटावर आगतस्वागत केलें. दस्तूर साहेब लोकप्रिय व व्यवहारदक्ष आहेत तेव्हां त्यांनीं प्रस्तुत प्रसंगीं अकोल्याची नाणी राखिली याबद्दल आह्मी त्यांची वाखाणणी करितों. असें समयोचित काम साहेबांच्या पूर्वीच्या व्हाईस प्रेसिडेंटच्या अधिकारास उचितच आहे हें ही सांगणें नावगें होणार नाहीं.

गाडी स्टेशनावर आल्या पासून ड्यूक साहेब दस्तूर साहेबांशीं प्लाटफार्मवर कुशल प्रश्न विचारीत उभे होते नंतर ड्यूक साहेबांनीं तेथील इतर मंडळीचे आभार मानिले आणि मंडळीच्या जयजयकार शद्बांत गाडी चालूं झाली.

## The Berar Samachar

MONDAY DECEMBER 17, 1888.

### A FEW HINTS TO OUR DELEGATES TO CONGRESS.

This is the first year that this province is being represented at the Congress, and we expect that our delegates would represent us there with credit to themselves and their constituents. Since Mr, Hume came over to this province to enlighten the leaders of local opinion in the matter of the Congress, this province has done a good deal towards making known the Congress and its objects. Mr, Deorao Vinayak deserves an amount of credit for the very active pa[rt] he has taken in the spread of th[e] movement; and we may add that the leaders might do a good deal of good by following in his wake. The province has been divided in to six electoral divisions—a district representing one division. Delegates have been duly elected by the several meetings held in the districts and are probably fast equipping themselves for the journey in view. The delegates who have been elected are all competent persons and know their duties too well to need any advice. But we might as well give them a word of advice in time. We are given to understand that the Berar standing Congress Committee have proposed to put forth certain resolutions at the ensuing Congress, provided, of course that they are approved of by the Subject Committee to be held at Allahabad to discuss the propriety of resolutions to be placed before Congress for consideration. What we expect of them is that they should be moderate in the demands they make, and that consistently with the resources which the government has at hand. The proposals should be such that if they do go before Congress and eventually to Government, the ways and means must also appear along with them. We have not the smallest doubt that, if any proposals are made they would be backed by close reasoning and marked by strong common sense.

Although there is no Legislative Council for this province, yet all our delegates and ourselves naturally wish to get for our friends in the neighbouring provinces the right to send elected representatives of the people to the Legislative Councils of Government. Our delegates will of course heartily support the reaffirming of the proposition about the Legislative Councils; but we would like to see a speech made by one of our delegates regarding the separation of judicial and executive functions— another proposition which the Congress has set its heart upon The evils of that system are so patent here that our delegates will give the Congress some of their experience in the matter. From the Judicial Commissioner downwards you find Judicial decisions influenced by executive ideas. The remarks are not unusually heard from the Bench that action taken by subordinate authorities in their subordinate capacities would be upheld with what is considered to be a strong hand. There are manifold evils arising from the system of the two functions being together which the delegates know only too well. We would expect them to give free utterance to their experience in the matter, at the ensuing Congress.

We have heard that some of the liberal minded Berar officers in the Berar Commission desire to go and see the Congress for themselves to be able to judge of its merits by personal observation. This is exactly the sort of thing needed for the correct application of the Congress and its aims and objects. The leading Anglo-Indian papers which find currency with the official world are hardly fair to the Congress and our sincere desire is that some of the officers ought really to go and see the thing for themselves and judge.

The result of experiments in new kinds of trees which have been ma le in of this province the nurseries has been summarized as follows in the report on arboriculture for 1887—88.

*Amraoti.*—The only surviving plant of the Malta lemon tree referred to in the last year's report is reported to be thriving well. The cuttings of this tree having failed, about 30 seeds of the same were obtained from the Agricultural Society at Calcutta and sown in the early part of April last; of these, only 8 germinated, and the plants are reported to be doing well.

*Ellichpur.*—The experiment of planting young trees of the edible date palm along the river Bichun has not been so satisfactory as was expected. The plants are reported to be "stunted and backward," and to have "suffered much from the depredations of white ants." Hopes are, however, entertained that they will shoot up after the first heavy rains. The fifty Malta lemon trees got from Etawa are reported to be in fairly good condition, one of them producing six large lemons. The fruit-bearing capacity of the other trees will be watched with interest. Of the *Arracacha esculenta* there are now twenty healthy plants.

*Basim.*—Of the seeds of *Grevillia robustâ, Acacia melanoxylon* (Australian blackwood), and *Pithecalobium saman* (rain-tree) put down last year, only the last survived. Of these, 21 plants are in a vigorous state of growth. A supply of ornamental plants was obtained during the year from the agri-horticultural garden at Alipore. Some of these perished in transit, and the few that arrived are doing well.

Lieutenant M. A. Tighe, Officiating Political Assistant to the 3rd class is posted, temporary, as Second Assistant to the Resident at Hyderabad and Assistant Secretary for Berar.

## वऱ्हाड.

येथील सिव्हिल सर्जन डाक्टर मोयान यांची मद्रासेस लष्करी खात्यांत नेमणूक झाल्या प्रमाणें ते नवीन जागीं रुजं होण्या साठीं गेल्या आठवड्यांत वऱ्हाडांतून तात्डतोब निघून गेले.

खामगांव दिवाणी कोर्टात हजार रुपया वरचे दावे त्या कोर्टाचे जज्जास तितका अधिकार नसल्यामुळें वर्ष दिडवर्षा पासून तहकूब राहिले होते ते सर्व येथील स्पेशल असि. कमिशनर मि० आवर्ड यांजकडे दिले आहेत. वऱ्हाडांत मुलकी अधिकार व्यक्तिविशिष्ट असल्या मुळें सदोदित अशा प्रकारच्या अडचणी येतात त्या वरिष्ठ सरकारच्या कानावर घालण्याचे नवीन कोणते उपाय योजावें हा मोठा विचार पडला आहे.

कर्नल ग्रांट साहेब डेपुटी कमिशनर यांची स्वारी खामगांवांकडे आहे.

काल सायंकाळीं बाजारांत एक म्हातार कोष्टी ठेंच लागून मरण पावला. हा आकस्मिक मृत्यु बरेंच प्रकारें चमत्कारिक झाला.

मि. प्लेडन साहेब कमिशनर यांची स्वारी बुलढाणें जिल्ह्यांत दौऱ्यावर आहे.

कर्नल ब्रुक डे० क० हे सध्यांच्या रजेंत उमरावती जिल्ह्यांत फिरत आहेत व नाताळचे सणाकरितां ते चिखलदऱ्यास जाणार आहेत असें समजतें.

येथील हायस्कूलांतील सेकंड असिस्टंट रा. रा. गोपाळ रामचंद्र पिटके बी. ए हे रजेवरून परत आपल्या जागीं रुजूं झालें आणि त्यांचे बदलीं अक्टींग काम पाहणार रा. रा. विष्णु नारायण डांगे हे उमरावती हायकु लांत गेल्या शनिवारीं आपले जागीं परत गेले.

लेफ० एम. ए. टायघे आफिशिएंटी पोलिटिकल असिस्टंट वर्ग ३ रा यास तूर्त अलिशान रेसिडेंट साहेबांचे सेकंड असिस्टंट आणि वऱ्हाडचे असिस्टंट सेक्रेटरी नेमिलें आहे.

नाशिककर व्हिक्टोरिया संगीत मंडळी हल्लीं येथें आली आहे तिचा पहिला प्रयोग परवां शनिवार रात्रौ किर्लोसकरकृत शाकुंतलाचा झाला. खेळ साधारण बरा झाला. नायिकेचें पात्र बदललें असतां नाटक पहाण्यासारखें होईल. कण्व, प्रियंवदा, व शारंगरव यांनीं आपापले भाग उत्तम वठविले.

## वर्तमानसार.

हिंदुची बुद्धि— मानसशास्त्राचा जो सिद्धांत कितीही डोकेंफोड केली तरी इंग्लिश मुलाला कळावयाचा नाहीं, तो सिद्धांत हिंदु मुलाच्या लक्षांत येण्यास उशीर लागत नाहीं.

५००० वर्षांच्या जुन्या मिसरी प्रेताबरोबर सांपडलेले गव्हाचे दाणे अमेरिकेंत एका मनुष्यानें पेरिले. ते चांगले रुजून, झाडे कापणीच्या वेळेस सुमारें ७ फूट उंच झालीं होतीं. परंतु त्यास गव्हांच्या ओंब्या न येतां गव्हांनीं भरलेल्या अशा लहान फांद्या आल्या.

एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं लांकडें आगबोटींत घालून आणण्यास फार खर्च लागतो. ह्मणून एका अमेरिकन मनुष्यानें एक लांबचलांब सांखळदंड आडवा धरून त्याच्या भोंवतीं लांकडाच्या हजारों तुळ्या रचून त्या पोलादी तारांनीं व पट्ट्यांनीं जखडुन बांधिल्या या प्रमाणें मध्यभागीं जाड व टोकाकडे निमुळता असा एक ५९५ फूट लांबीचा, व मध्यभागीं १८० फूट घेराचा ताफा त्यानें तयार करून समुद्रांत लोटला. आणि दोन आगबोटी लावून या अगडबंब ताफ्यास न्युयार्क शहरीं आणून सोडिलें, ताफ्याचें वजन १०००० टन होतें, व असें केल्यानें त्याच्या मालकांस २०००० रुपये नफा झाला आहे.

मेलगाडी लुटली—आग्राहून उज्जनीकडे जाणारी मेल गाडी चोरांनीं लुटली. एका पार्शी गृहस्थाला जखमी केलें आहे.

धडगी उकरणारी कंपनी— अमेरिकेंतील पेरु प्रांतांमधील जुनाट थडग्यांत सोनें नवहीर वगैरे पुरलेलें आहे असा भपका असल्या मुळें ते सोनें वगैरे खणून काढण्यासाठीं एक कंपनी स्थापन झाली आहे. वऱ्हा

तीन वर्षे सार

वी स्कालरशिप अ-

कळ दाखविली आहे त्यासर्वांबद्दल त्यांचे आपण आभार मानिले पाहिजेत.

चक्रवर्तीनी महाराणी सरकारचे चिरंजीव ड्यूक आफ कानाट यांची स्वारी परवां शनिवारी दिवसाच्या गाडीनें नागपुरकडे वऱ्हाड मार्गे रवाना झाली. साहेबांच्या येण्या जाण्याचा पूर्व संकेत बहुतकरून पुष्कळांस माहित नव्हता ह्मणून त्यांच्या आदरातित्या साठीं शिष्टसंप्रदायानुरूप कांहीं एक निराळी व्यवस्था झाली नाहीं ही मोठ्या दिलगिरीची गोष्ट आहे. गेल्या दोन आठवड्यांत कांहीं पलटणी मुंबई इलाख्यांतून नागपूर कामटी कडे बदलल्या प्रमाणें वऱ्हाडांतून तिकडे गेल्या त्या निमित्त साहेबांचें मध्यप्रांतात आगमन झालें आणि सहजरित्या राजपुत्रांचे पाय आमच्या प्रांतास लागले ह्मणून आह्मास फार फार आनंद वाटतो.

ड्यूक साहेबांचें आदरातिथ्य होण्यास सवड नव्हती तरि आनंद मानण्यास जागा एवढी आहे कीं आमचे माजी असिस्टंट कमिशनर दस्तूर बहिमंजी जामास्पजी सी. आय. ई. यांनीं स्टेशनावर ड्यूक साहेबांचें हारतुऱ्याच्या दरबारी थाटावर आगतस्वागत केलें. दस्तूर साहेब लोकप्रिय व व्यवहारदक्ष आहेत तेव्हां त्यांनीं प्रस्तुत प्रसंगीं अकोल्याची वाणी राखिली याबद्दल आह्मी त्यांची वाखाणणी करितों. असें समयोचित काम साहेबांच्या पूर्वीच्या व्हाईस प्रेसिडेंटच्या अधिकारास उचितच आहे हें ही सांगणें नावगें होणार नाहीं.

गाडी स्टेशनावर आल्या पासून ड्यूक साहेब दस्तूर साहेबांशीं प्लाटफार्मवर कुशल प्रश्न विचारित उभे होते नंतर ड्यूक साहेबांनी सांपैल इतर मंडळीचे आभार मानिले आणि मंडळीच्या जयजयकार शब्दांत गाडी चालती झाली.

# The Berar Samachar

MONDAY DECEMBER 17, 1888.

## A FEW HINTS TO OUR DELEGATES TO CONGRESS.

This is the first year that this province is being represented at the Congress, and we expect that our delegates would represent us there with credit to themselves and their constituents. Since Mr, Hume came over to this province to enlighten the leaders of local opinion in the matter of the Congress, this province has done a good deal towards making known the Congress and its objects. Mr, Deorao Vinayak deserves an amount of credit for the very active pa he has taken in the spread of th movement; and we may add that the leaders might do a good deal of good by following in his wake. The province has been divided in to six electoral divisions— a district representing one division. Delegates have been duly elected by the several meetings held in the districts and are probably fast equipping themselves for the journey in view. The delegates who have been elected are all competent persons and know their duties too well to need any advice. But we might as well give them a word of advice in time. We are given to understand that the Berar standing Congress Committee have proposed to put forth certain resolutions at the ensuing Congress, provided, of course that they are approved of by the Subject Committee to be held at Allahabad to discuss the propriety of resolutions to be placed before Congress for consideration. What we expect of them is that they should be moderate in the demands they make, and that consistently with the resources which the government has at hand. The proposals should be such that if they do go before Congress and eventually to Government, the ways and means must also appear along with them. We have not the smallest doubt that, if any proposals are made they would be backed by close reasoning and marked by strong common sense.

Although there is no Legislative Council for this province, yet all our delegates and ourselves naturally wish to get for our friends in the neighbouring provinces the right to send elected representatives of the people to the Legislative Councils of Government. Our delegates will of course heartily support the re-affirming of the proposition about the Legislative Councils; but we would like to see a speech made by one of our delegates regarding the separation of judicial and executive functions— another proposition which the Congress has set its heart upon The evils of that system are so patent here that our delegates will give the Congress some of their experience in the matter. From the Judicial Commissioner downwards you find Judicial decisions influenced by executive ideas. The remarks are not unusually heard from the Bench that action taken by subordinate authorities in their sobordinate capacities would be upheld with what is considered to be a strong hand. There are manifold evils arising from the system of the two functions being together which the delegates know only too well. We would expect them to give free utterance to their experience in the matter, at the ensuing Congress.

We have heard that some of the liberal minded Berar officers in the Berar Commission desire to go and see the Congress for themselves to be able to judge of its merits by personal observation. This is exactly the sort of thing needed for the correct application of the Congress and its aims and objects. The leading Anglo-Indian papers which find currency with the official world are hardly fair to the Congress and our sincere desire is that some of the officers ought really to go and see the thing for themselves and judge.

The result of experiments in new kinds of trees which have been male in of this province the nurseries has been summarized as follows in the report on arboriculture for 1887—88.

*Amraoti.*—The only surviving plant of the Malta lemon tree referred to in the last year's report is reported to be thriving well. The cuttings of this tree having failed, about 30 seeds of the same were obtained from the Agricultural Society at Calcutta and sown in the early part of April last; of these, only 8 germinated, and the plants are reported to be doing well.

*Ellichpur.*—The experiment of planting young trees of the edible date palm along the river Bichun has not been so satisfactory as was expected. The plants are reported to be "stunted and backward," and to have "suffered much from the depredations of white ants." Hopes are, however, entertained that they will shoot up after the first heavy rains. The fifty Malta lemon trees got from Etawa are reported to be in fairly good condition, one of them producing six large lemons. The fruit-bearing capacity of the other trees will be watched with interest. Of the *Arracacha esculenta* there are now twenty healthy plants.

*Basim.*—Of the seeds of *Grevillia robusta*, *Acacia melanoxylon* (Australian blackwood), and *Pithecalobium saman* (rain-tree) put down last year, only the last survived. Of these, 21 plants are in a vigorous state of growth. A supply of ornamental plants was obtained during the year from the agri-horticultural garden at Alipore. Some of these perished in transit, and the few that arrived are doing well.

Lieutenant M. A. Tighe, Officiating Political Assistant to the 3rd class is posted, temporary, as Second Assistant to the Resident at Hyderabad and Assistant Secretary for Berar.

## वऱ्हाड.

येथील सिव्हिल सर्जन डाक्टर मोयान यांची मद्रासेस लष्करी खात्यांत नेमणूक झाल्या प्रमाणें ते नवीन जागीं रुजू होण्या साठीं गेल्या आठवड्यांत वऱ्हाडांतून तावडतोब निघून गेले.

खामगांव दिवाणी कोर्टांत हजार रुपया वरचे दावे त्या कोर्टाचे जज्जास तितका अधिकार नसल्यामुळें वर्ष दीडवर्षा पासून तहकूब राहिले होते ते सर्व येथील स्पेशल असि. कमिशनर मि० आब्डे यांजकडे दिले आहेत. वऱ्हाडांत मुलकी अधिकार व्यक्तिविशिष्ट असल्या मुळें सदोदित अशा प्रकारच्या अडचणी येतात त्या वरिष्ट सरकारच्या कानावर घालण्याचे नवीन कोणते उपाय योजावे हा मोठा विचार पडला आहे.

कर्नल ग्रांट साहेब डेपुटी कमिशनर यांची स्वारी खामगांवाकडे आहे.

काल सायंकाळीं बाजारांत एक म्हातार कोष्टी ठेंच लागून मरण पावला. हा आकस्मिक मृत्यु बरेंच प्रकारें चमत्कारिक झाला.

मि. प्लेडन साहेब कमिशनर यांची स्वारी बुलढाणे जिल्ह्यांत दौऱ्यावर आहे.

कर्नल बुळक डे० क० हे सध्यांच्या रजेंत उमरावती जिल्ह्यांत फिरत आहेत व नाताळचे सणाकरितां ते चिखलदऱ्यास जाणार आहेत असें समजतें.

येथील हायस्कूलांतील सेंकंड असिस्टंट रा. रा. गोपाळ रामचंद्र पिटके बी. ए हे रजेवरून परत आपल्या जागीं रुजूं झालें आणि त्यांचे बदलीं अक्टींग काम पाहणार रा. रा. विष्णु नारायण ढांगे हे उमराती हायकुलांत गेल्या शनिवारीं आपले जागीं परत गेले.

लेफ० एम. ए. टायघे आफिशिएटींग पोलिटिकल असिस्टंट वर्ग ३ रा यास तूर्त अलिशान रेसिडेंट साहेबांचे सेंकंड असिस्टंट आणि वऱ्हाडचे असिस्टंट सेक्रेटरी नेमिलें आहे.

नाशिककर व्हिक्टोरिया संगीत मंडळी हल्लीं येथें आली आहे तिचा पहिला प्रयोग परवां शनिवार रात्रौ किर्लोसकरकृत शाकुंतलाचा झाला. खेळ साधारण बरा झाला. नायिकेचें पात्र बदललें असतां नाटक पहाण्या सारखें होईल. कण्व, प्रियंवदा, व शारंगरव यांनीं आपापले भाग उत्तम वठविले.

## वर्तमानसार.

हिंदुची बुद्धि— मानसशास्त्राचा जो सिद्धांत कितीहि डोकेफोड केली तरी इंग्लिश मुलाला कळावयाचा नाहीं, तो सिद्धांत हिंदु मुलाच्या लक्षांत येण्यास उशीर लागत नाहीं.

५००० वर्षांच्या जुन्या मिसरी प्रेताबरोबर सांपडलेलें गव्हाचे दाणे अमेरिकेंत एका मनुष्यानें पेरिले. ते चांगले रुजून, झाडे कापणीच्या वेळेस सुमारें ७ फूट उंच झालीं होतीं. परंतु त्यास गव्हांच्या ओंब्या न येतां गव्हांनीं भरलेल्या अशा लहान फांद्या आल्या.

एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी लांकडें आगबोटींत घालून आणण्यास फार खर्च लागतो. ह्मणून एका अमेरिकन मनुष्यानें एक लांबचलांब सांखळदंड आडवा धरून त्याच्या भोंवतीं लांकडाच्या हजारों तुळ्या रचून त्या पोलादी तारांनीं व पट्यांनीं जखडून बांधिल्या या प्रमाणें मध्यभागीं जाड व टोकाकडे निमुळता असा एक ५९५ फूट लांबीचा, व मध्यभागीं १८० फूट घेराचा ताफा त्यानें तयार करून समुद्रांत लोटला. आणि दोन आगबोटी लावून या अगडबंब ताफ्यास न्युयार्क शहरीं आणून सोडिलें, ताफ्याचें वजन १०००० टन होतें, व असें केल्यानें त्याच्या मालकांस २०००० रुपये नफा झाला आहे.

मेलगाडी लुटली—आग्राहून उज्जनीकडे जाणारी मेल गाडी चोरांनीं लुटून एका पार्शी गृहस्थाला जखमी केलें आहे.

थडगी उकरणारी कंपनी— अमेरिकेंतील पेरु प्रांतांमधील जुनाट थडग्यांत सोनें नवहीर वगैरे पुरलेलें आहे असा भपका असल्या मुळें ते सोने वगैरे खणून काढण्या साठीं एक कंपनी स्थापन झाली आहे.

...वऱ्हा... तीन वर्षे सार ...बी स्कालरशिप अ-

Single copy......

नायकांना मत देण्याचा अधिकार असावा असें लार्ड सालिसबरींनीं एडिनबरो येथें बोलून दाखविलें.

आगर व उज्जैन यांच्या दरम्यान एक टपालाचा तांगा लुटून त्यांतील कांहीं पार्सल नाहींशी झालीं. चोरांनीं गाडीवाल्यास बरेंच मारलें असें समजतें. तपास चालूं आहे.

एडिनबरो येथें लार्ड सालिबरी यानीं भाषण केलें त्यांत दादाभाई नवरोजी यांना पार्लमेंटचे सभासद लोकांनीं निवडूं नये असें सांगितलें. या बद्दल तेथें बरीच चर्चा चाललेली आहे.

इंग्लंडांतील कांहीं वजनदार पत्रांनीं लार्ड डफरीन यांनां कांग्रेसविरुद्ध बोलल्याबद्दल बराच दोष दिला आहे.

अमेरिकन सरकाराजवळ अतिशय पैसा शिल्लक राहिल्याकारणानें कर कमी करण्या बद्दल कांग्रेसनें अगोदर विचार केला पाहिजे असें मि. क्लीवलंड यानीं बोलून दाखविलें.

सु० प०

मि. ब्राडला यांची माहिती आतां सर्वांस झालेली आहेच. त्यांणीं परवा पार्लमेंटमध्यें गोंधळ प्रकरणा संबंधानें ग्रिफीन साहेबांच्या वर्तणुकीबद्दल कांहीं प्रश्न केले होते, पण त्यांस जबाब त्यावेळीं उडवाउडवीचाच मिळाला. तथापि ब्राडला ह्या प्रकरणाची शहानिशा करतील अशी आशा आहे.

क० त०

रा. काशीनाथ त्र्यंबक तेलंग यांस सरकारी लाक्लासचे प्रोफेसर नेमिलें. पु० वै०

लार्ड डफरिन यांचें स्मारक करण्यासाठव कलकत्यास १७००० रुपये वर्गणी जमली आहे या पैशाचा आमचा व आमचे मडम साहेबांचा अश्वारूढ पुतळा न करतां कांस्याचा पुतळा करावा वगैरे त्यांनीं इच्छा प्रदर्शित केली आहे.

नेटिव स्त्रियांच्या सहीनें एक मानपत्र लेडी डफरीन यांस देण्याचें ठरलें आहे.

ज्या खटल्यांत मुंबई हायकोर्टानें देहांत शिक्षा दिल्या आहेत ते सर्व आज पर्यंतचे खटले मुंबई सरकारानें तपासणी साठीं मागविले आहेत. कां?

रावळपिंडी नजीक फत्तेगड येथें करोसीन तेलाची एक विहीर सापडली आहे असें समजतें.

कराची ठोळ घाड मध्य प्रांतांतील लोकांवर एक नवीन कर बसणार आहे. ज्याचें २५० रु० पासून ५०० रु० पर्यंत सालीना उत्पन्न असेल त्यावर हा पांढरा कर बसावयाचा आहे.

स्वर्गाची मोजदाद—एका कल्पकानें फार मेहनत घेऊन स्वर्गाचें क्षेत्र मापन केलें आहे. दरएक खोली १९ फूट लांब व १६ फूट रुंद आहे अशी कल्पना केली तर एकंदर खोल्या ५,७५९९५०००० इतक्या भरतील.

रेशमाच्या किड्यांची उत्पत्ति.—ब्रह्मणपूर व दुसऱ्या ठिकाणी रेशमांचे किड्यांची संतती कशी वाढवावी या बद्दल उद्योग चाउले आहेत.

न्याशनल कांग्रेसेला कलकत्या कडील एका श्रीमान गृहस्थानें एक लाख रुपये दिल्याचे समजतें.

खालील पांच नकार निळण्यास फार पडतातः—

जननी, जनक, जान्हवी, जन्मभूमी, जनार्दन आणि सहावा पदार्थ इंग्लिश सरकारचे अंमला खालीं ठेतकऱ्या करितां जनावर.

कास्पियन समुद्राचें कांठीं एक शिवालय असून भोंवतालीं ओंवऱ्या आहेत गाभाऱ्यांत श्री गणपती व देवीची अशा दोन दोहोंकडे मूर्ती बसविलेल्या आहेत. येथें स्वयंभू धुराचे दिवे असून ते अद्याप जळत आहेत या देवास त्या प्रांतांतील सर्व धर्माचे लोक नवस करितात. व लक्षावधि यात्रा दरसाल भरत असते! इतके असून श्री शंकराची पुजा हिंदूच्या हातूनच होत असते. हें एक विशेषच समजलें पाहिजे.

माहिती— शिजविलेल्या बटाट्यांनीं मळकट वस्त्रे घासली असतां त्याचा मळ नाहिसा होऊन चांगली स्वच्छ होतात असें समजतें. अनुभव घेऊन पाहवा. न्या० सिं०

नामदार ग्ल्याडस्टन साहेबांनीं अलीकडे आपल्या खासगत पत्रव्यवहारातली पुष्कळ पत्रें फाडून टाकिलीं तरी, पुढें चरित्रकारांच्या उपयोगीं पडतील अशी साठ हजार पत्रें, आग लागावयाची नाहीं असा खोलींत जपून टेविलीं आहेत.

स्वराज्यांतली रयत— एकंदरीनें स्वराज्यांतली रयत इंग्लिश राज्यांतल्या रयतेपेक्षां अधिक सुखी असते. आणि संतुष्ट असते. ती सावकाराच्या कचाटींत सांपडलेली नसते. कां कीं तिच्या मागें सरकार देण्याचा तगादा आमच्या रयते इतका नसतो.

आमची स्वराज्यें अवश्यक आहेतः— ज्यांस हिंदुस्थानची माहिती चांगली, त्यांचें मत असें आहे कीं, हिंदुस्थानाच्या राज्यसंबंधाच्या आणि नीतिसंबंधाच्या अभ्युदयाप्रतेथील व्यवस्थित स्वराज्यें अत्यंत आवश्यक आहेत त्या कृत्यास त्यांचे ठायीं एक प्रकारची विशेष योग्यता आहे. विशेष गुण आहे त्याची कल्पना देखील आह्मांला बरोबर करितां येत नाहीं. ठा० अ०

गरिबांचें अपील—अहो महाराज, पाया पडतों. पावसानें दिला दगा, इकडे कांहीं बघा. गप्पांचा आहे सुकाळ, पण आह्मा गरिबांचा आला आहे काळ! आलें नाहीं पीक, जिकडे तिकडे वाढली भीक! आह्मी ह्मणतों पिकें पहा, अधिकारी ह्मणतात उभे रहा! आह्मी येतों मिळून, पण ते कशाला पहातात वळून! आह्मी मागतों सूट, पण ते ह्मणतात खजिन्यांत तूट! पोटीं उठले गोळे, पण अधिकाऱ्यांना कोठें आहेत डोळे! त्यांना मिळते हजारी, आह्माला मिळत नाहीं बाजारी, त्यांच्या घोड्यांना सुद्धां चणे आह्मास मिळत नाहीं चावणे! त्यांचे क्लबांत होतात खेळ, पण आमची आली उपासमाराची वेळ! त्यांच्या खिशांत वाच, आह्माला होतो सदां जांच! घरांत नाहीं गोटा, जो तो उगारणार सोटा! धडगत नाहीं गुरांची, मग काय वाट पोरांची! नाहीं पीठ नाहीं मीठ कोणा नसे आयुष्याचा वीट! अन्नवस्त्राविणें—नको देवा जगांत जिणें! आहेत बहुत श्रीमान्, पण आह्मी कोठें आहों भाग्यवान! सुचतात सऱ्या, आह्मास मिळत नाहींत बऱ्या! साडू लाडू पैशाचे ख्याल, आमच्या वांट्यास सदा हाल! तुह्मी भोगा सुंदर सेज, आह्मा द्या आंबील पेज! तुह्मी खा गोड साखर, आह्मा द्या जाडी भाकर! सरकाराला पैशाचा हेवा, आमचा वाली कोणरे देवा! पंढरीचे विठाई देवीवगे तूं नगाई! जगाच्या बापा वालीव कीरे आमच्या तापा! आमचा कोणी नाहीं सगा, साहेबा आह्मा कडे बघा! मोठें आलें सांकडें नको पाहूं वांकडें! जिल्ह्याच्या राजा, बघ ओरडते तुझी प्रजा! जातां जातां काढ आमच्या ह्या सुवा, आमचीं मुलें देतील तुला दुवा, पत्रकर्त्यांनो देववा आम्हास भाकरी, जगल्या वांचल्या करूं तुमची चाकरी! चार शब्द लिके, जातों आर्शी भिके! सु. सिं.

---

# जाहिरात.

## डा. नारायण चिंतामण यांनीं मुद्दाम तयार केलेलीं उत्तम गुणकारी औषधें.

सूचना—हीं सर्व औषधें शुद्ध वनस्पतीचीं केलेलीं असून हजारो लोकांनीं अनुभवलेलीं आहेत. रक्तांत दोष उत्पन्न करणारे रसायनांचा ह्यांत बिलकुल उपयोग केलेला नाहीं. जाहिरांतातील औषधांवर लोकांची श्रद्धा बसत नाहीं म्हणून रोग्यांना ह्या सर्व औषधांची गरज पडेल तेव्हां निदान एकवेळ तरी मुद्दाम उपयोग करून पाहवा अशी त्यास माझी सविनय प्रार्थना आहे ह्या सर्व औषधांचा उपयोग शेंकडो रोग्यांनीं करून पाहिला व त्यां पैकी तीन चतुर्थांश बरे होतात अशी आमची खात्री झाल्या मुळें तीं प्रसिद्ध केलीं आहेत.

### गजकर्णावर रामबाण औषध

ह्याची तर सर्वत्र प्रसिद्धीच आहे. याचे गुणा बद्दल मिळालेल्या सार्टिफिकिटां पैकीं कांहीं माहितीचे कागदांत दिलीं आहेत. किं. दर बाटली ०९ आ. बंगी करणावळ ०१ आ. शिवाय टपाल खर्च.

### खरजेवर हटकून गुणकारी मलम

हें लावलें असतां मुळींच झोंबत नाहीं. तीन चार दिवसांत खरून बरी होते. याची ही गुणा बद्दल सार्टिफिकिटें आहेत. किं. दर डबी ०८ आ. बंगी करणावळ ०१ आणा. शिवाय टपाल खर्च.

### खात्रीचें नेत्रांजन

आलेले डोळे, लाली, खुपऱ्या, डोळ्यांतून पाणी येणें, डोळे खुपणें व सारा वगैरे सारखे विकार चार दिवसांत बरे होतात. किं. दर बाटली ०७ आ. बंगी करणावळ ०१ आ. शिवाय टपाल खर्च.

### मूळव्याधीवर अद्भुत सर्बत

अवश्य अनुभव घ्या. रोग नवीन असल्यास एक बाटलींत काम होतें. रक्त पडणें, आंग सूज व ठणका, ही तीन चार दिवसांत कमी होऊं लागतात. किं. दर बाटलीस रु. १०४ बंगी करणावळ ०२ आ. शिवाय टपालखर्च. १ बाटली १२ दिवस पुरते.

मोड असल्यास हें सर्बत घेऊन शिवाय मलम घ्यावे लागतें. किं. दर डबी. ०८ आ. बंगी करणावळ ०१ शिवाय टपाल खर्च.

### आंवरक्ताच्या हगवणीवर गोळ्या.

सुमारें आठ दिवसांत मुरडा, आंवरक्त अगदीं बंद होऊन अन्न पचन होऊं लागतें. रोग समूळ नाहींसा होतो. किं. दरएक २४ गोळ्यांचे डबीस १ रु. बंगी करणावळ ०१ आ. शिवाय टपाल खर्च.

### शीत ज्वर व हिंवावर गोळ्या.

ह्या गोळ्यांची तारीफ करावी तेवढी थोडीच. यांचे सेवनानें कितीही दिवसांचे अगर कितीही दिवसांनीं येणारे हींव असो सुमारें चार दिवसांत हटकून बंद होतें. हिंवावर तर ह्या गोळ्यांची क्रिया केवळ जादू सारखी होते किं. दर १६ गोळ्यांचे डबीस १ रु० बंगी करणावळ ०१ आ. शिवाय टपाल खर्च.

### परम्यावर उत्तम पाक

हा पाक तीन दिवस घेतला असतां लघवीची आग व तिडक नाहींशी होऊन पू वाहणें बंद होऊं लागतो. रोग नवीन असल्यास एक बाटली पुरे आहे. नाना तऱ्हेची रसायनी औषधें खाऊन ज्याचा परमा फार विकोपास गेला असेल त्याला दोन बाटल्या घ्याव्या लागतील. किं. दर बाटली ३ रु० बंगी करणावळ ०२ आ. शिवाय टपाल खर्च.

### स्त्रियांच्या धुपणावर कषाय (काढा)

धुपणी तांबडी अगर पांढरी असो हा कषाय घेतल्या पासून सुमारें चौथे दिवशीं गुण दिसूं लागतो. गरोदरपणीं सुद्धां हा काढा देण्यास योग्य आहे. किं. दर बाटलीस २०४ रु० बंगी करणावळ ०२ आ. शिवाय टपाल खर्च १ बाटली १२ दिवस पुरते.

### कारच उत्तम सालंमिश्री पौष्टिक पाक.

स्त्री पुरुषांस सारखा गुणावह. ह्याचे सेवनानें अग्निमांद्य, जीर्णज्वर, अन्नद्वेष, अशक्तता, मेंदूची क्षीणता, हात पाय व कंबर दुखणें, व मुरती वगैरे सारखे अनेक विकार नाहींसे होऊन कांती वाढते. व धातु शुद्ध होऊन सर्व इंद्रियें बळकट होतात. हा पाक हिंवाळ्यांत घेण्यास फारच प्रशस्त आहे. स्त्रियांना बाळंत होऊन दोन महिने झाल्या वर हा पाक अवश्य द्यावा. किं. दर शेर २०४ रु० बंगी करणावळ ०२ आ. शिवाय टपाल खर्च.

### खोकल्यावर गोळ्या.

खोकला उष्णते पासून उद्भवलेला असो किंवा थंडी पासून असो ह्या गोळ्या घेतल्या पासून दुसरेच दिवशीं गुण दिसूं लागतो, कास श्वास दमा वगैरे सर्व विकार ह्या गोळ्यांनीं हटकून नाहींसे होतात. डांग्या खोकला व क्षयाच्या खोकल्यावर ह्यांचा फारसा उपयोग होत नाहीं. किं. दर ४५ गोळ्यांचे डबीस १ रु० बंगी करणावळ ०१ आ. शिवाय टपाल खर्च.

हीं सर्व व आणखी सर्व रोगांवरील औषधें प्रांत वऱ्हाड, आकोलें येथ आमचे दवाखान्यांत विकत मिळतील. व्ह्या. पेबलनें ही पाठवूं. नादपेड पत्र घेतलें जाणार नाहीं पत्ता सुवाच्य लिहावा. ह्या सर्व औषधांचे अनुपानांचे कागद औषधां बरोबर मिळतील कळावे.

नारायण चिंतामण

बाकर.

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

बाळअंबेर " ७ " ८
किरकोळ अंकास..........................८४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०-१-६
दुसरे खेपेस........०-१

Six monthly............3 " 8 as.
Single copy..............................4 as.

Advertisements
Below 10 lines...2Rs
per line over10...4a s.
Repetition derline3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXII AKOLA MONDAY 24 DECEMBER 1888 NO.50

वर्ष२२ अकोला सोमवार तारीख २४ माहे दिसेंबर सन १८८८ इ० अंक ५०

NOTICE.

The following dates are fixed for for the sale of Abkari Contracts (Country Spirits, Tari, Opium and Drugs) in the Hyderabad Assigned Districts for the year 1889-90.

The sal s in each place will take place at the Court-house of the Deputy Commissioner at 12 o'clock.

Amraoti... Monday...21 Janry 1889.
Ellichpur... Do ......28th, ..Do....
Akola...... Do.......4th, Febry.1889
Buldana... Do ..... 11th,...Do ......
Bassim... Thursday 21st ...Do.......
Wun(Yeotmal) Monday 4th March 1889.

Information regarding the conditions of the auction and of the contracts may be obtained at the district office.

J. Wade.
Superintendent
For Commissioner
Hyd: Assigned Districts.

नोटीस.

रा. कश्यरू वल्लद जयसिंगजी पाटील बाळकर राहाणार खांडवी तालुके जळगांव यांस खाली सही करणार यांज कडून कळविण्यात येतें कीं तुम्हीं मयत कृष्णाई मर्द अवारसिंग ईचे शेत सालीम चंदु वल्लद सूर्यभान व त्याची आई रुखमाई यान पासून खरेदी घेतलें असें ऐकण्यांत आलें या साठीं असें कळविलें जातें कीं मयत कृष्णाईचे निमे जिनगीचा मी वारस असून निमेचा रुखमाई वारस आहे सबब तुम्हीं घेतलें सालीम-शेताचे खरेदी पैकी निमे शेताची विक्री रद्द आहे करितां तुम्हीं निमेवर कबजा करूं नये. तसें न होईल तर रितीप्रमाणें तजबीज होऊन तुम्हा पासून नुकसान खर्च वगैरे सह निमे शेत परत घेतलें जाईल कळावें. तारीख १८ माहे दिसेंबर सन १८८८ ईसवी.

( सही )
सहीची निशाणी सावित्री मर्द दतुजी खडकर तर्फे दतुजी वल्लद रंभाजी याची

नोटीस

चंदु वल्लद सुर्यभान कुणबी व रखमाई मर्द सुर्यभान राहणार खांडवी तालुके जळगांव यांस खाली सही करणाराकडून कळविण्यांत येते कीं मैयत कृष्णाबाई ही माझी आई असूनें तिचे पश्चात तिचे स्थावर जंगम जिंदगीची निमेची वारस मी आणि निमेची रुखमाबाई असतां कृष्णाबाईचे मरणानतर तिची सर्व जिंदगी तुम्ही उभयतांच आटपुन बसले व त्यापैकीं एक शेत आणि घर विकल्याचें ही ऐकण्यांत आलें करितां कळविलें जातें कीं ही नोटीस पावल्या पासुन आठ दिवसांत कृष्णाबाईची जी स्थावर जंगम जिंदगी होती त्यापैकीं निमे जिनगीचा भाग मला देऊन निमेची तुम्ही पाहिजे तशी व्यवस्था करावी तसें न कराल तर रीतीप्रमाणें तजवीज होऊन तुम्हांपासून नुकसानी खर्च वगैरे सह निमे भाग घेतला जाईल व हल्लीं तुम्ही केलेली विक्री निमेपुरती रद्द आहे कळावें. तारीख १८ माहे डिसेंबर १८८८ इ०

सही
सहीची निशाणी सावित्री मर्द दतुजी खडकार तर्फे दतुजी वल्लद रंभाजी याची असें

नोटीस.

मुक्तिराम वल्लद गोकुराम राहणार सांगवी यांस खालीं सही करणार याजकडुन कळविण्यात येतेकीं, तुम्ही तारीख २१ माहे मे सन १८८८ इसवीच्या वऱ्हाडसमाचार पत्रातुन ज्या सहीनें नोटीस दिली त्या प्रमाणें तुम्ही रामप्रताप यांचा दत्त मुलगा नाहीस व नोटीशींत जे तुम्हीं रुपये १००० बद्दल ठेव व दाग दागीन्या बद्दल ३००० व सवदा जवारी खंडी ४० च्या बदलचा नुकसानी ३२० लिहीलें आहे तें सर्व खोटें आहे तुम्हीं आपले कुटुंबासहीत संवत १९४२ मध्यें देशीं गेला त्यावेळी आम्हां पासून नायकीच्या अंगावर घालणें करिता सोन्याचे दागिने रुपये अदमासे दोन हजाराचे घेऊन गेला व आज पावेतों तुम्हा सदर्हु डागिने अदमासें २००० दोनहजाराचें आणून दिले नाहींत. ते १५ दिवसात आणून द्यावेत न दिल्यास रितीप्रमाणें काम चालवून निकाल होई पर्यंत ह्या नोटीसीच्या खर्चा सुद्धा सर्व नुकसान भरून घेतलें जाईल. कळावें तारीख २० माहे डीसेंबर सनं १८८८ इसवी.

सही
सुरजमल गीरधारिलाल दस्तुर खुद्द.

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः

नमोनमः एडिटरराव, पुढील विज्ञप्ती दाखल पत्र आपल्या वर्तमान पत्रांत छापल तर आम्हा विद्यार्थ्यांचें कल्याण होईल आणि आपली कर्तव्यस्मरणी नीट जपल्या प्रमाणें होईल. आपल्या पुरश्चरणांत मेरुमण्या पर्यंत मजल पोचल्यास बोलण्याची सवड सापडल्यामुळें अभिप्राय हा बाहेर येईल अशी उमेद वरली आहे

"राव बहादूर श्रीराम भिकाजी जठार. बी. ए. शाळाखात्यांचे डायरेक्टर मुलूख असमानी हैद्राबाद

स्वामीचे सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना—मुंबई इलाख्यांत 'स्कूल फायनल' परीक्षा सुरू करण्या विषयीं गेल्या दोन वर्षां पासून वाटा होतें त्या प्रमाणें ती परीक्षा पुढील साला पासून मुंबई इलाख्यास लागू झाली आणि तिचे विषय व पुस्तकें ही नियमित झालीं. म्याट्रीक्युलेशन पासून वरील परीक्षा मुंबई युनिव्हरसिटी दरसाल घेते त्या प्रमाणें हा स्कूल फायनल परीक्षा पुढील वर्षाच्या अखेरीस युनिव्हर्सिटी कडून घेतली जाईल. वऱ्हाड प्रांतांतील छात्रसमूहास ह्या परीक्षेच्या संबंधानें आपले विचार अद्याप कळले नाहींत या मुळें पुष्कळास या प्रकरणांत मोठें गूढ पडलें आहे. खरोखर आमची समजूत होती कीं या पूर्वी आपणा कडून कांहीं सूचना होतील पण त्या सारखें घडून आल्याचें कांहीं कळलें नाहीं. ह्या परीक्षेचा संबंध हायस्कुलांतील शिक्षणाशी आहे आणि एखादा उमेदवार या परीक्षेस बसणार असला तर स्कूल फायनलच्या विषया वरून पाहतां साधारणपणें त्यानें येथील नवव्या इयत्ते पासून आपल्या शिकण्याची दिशा बदलली पाहिजे. हायस्कुलांतून या परीक्षेस जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सोयी साठीं निराळी व्यवस्था झाली आहे असेंही कांहीं दिसत नाहीं. ह्मणून आपणास विनंती करीत आहे कीं वरील स्कूल फायनल परीक्षे विषयीं वऱ्हाड प्रांतांत कोणती तजवीज होणार आहे ही माहिती लवकर मिळाल्यास बरें होईल.

'स्कूल फायनल' परीक्षा वऱ्हाडास लागूं करूं नये अशा बद्दल आपण अद्याप कांहीं निश्चयात्मक निकाल केला नसल्यास आपण माझ्या पुढील सूचने कडे लक्ष्य पुरवाल अशी आशा आहे. ही सूचना आपणास नवीन असेल असा कांहीं माझ्या लिहिण्याचा अर्थ निघू नये फक्त विषयाच्या ओघानें कांहीं गोष्टी कळविण्या सारख्या वाटल्या ह्मणून आपणा समोर मांडीत आहे.

स्कूल फायनल परीक्षा वऱ्हाडास लागू केल्या पासून आह्मा विद्यार्थ्यांचें मोठें नुकसान होणार आहे कारण वऱ्हाडांतल्या हायस्कुलांतून मुंबईची म्याट्रिक्युलेशन परीक्षा पसार होणाऱ्या उमेदवारांपैकीं पहिल्या तिघांस कालेजांत शिकण्या साठीं प्रत्येकीं दर महा २० रुपयांची स्कालरशिप मिळत असते ती स्कूल फायनलच्या नादीं लागणाऱ्या उमेदवारांस मिळविण्याचा संधि मिळणार नाहीं. कालेजांत शिकण्यास विद्यार्थी श्रीमान पाहिजे कांकीं तें शिक्षण फार खर्चाचें आहे; परंतु वऱ्हाडांतल्या साधारण हुशार विद्यार्थ्याला कालेजांत राहण्याची ऐपत नसली तरी तो म्याट्रिक्युलेशन परीक्षेंत वऱ्हाडच्या उमेदवारांमध्यें पहिल्या तिघांत आल्यास त्याचा कालेजचा अभ्यास होतो कारण वरील वीस रुपयांची स्कालरशिप त्याच्या कालेजांतल्या खर्चावेंचाला पुरण्या सारखी असते. या वरून वऱ्हाडांतील कांहीं गरीब पण अभ्यासी विद्यार्थ्यांस उत्तम प्रतीचें शिक्षण मिळण्यास साधनें सध्यां आहेत तीं साधनें वऱ्हाडांत स्कूल फायनल सुरू केल्यास पूर्ववत् उपयोगीं पडणार नाहींत; इतकेंच नाहीं तर स्कालरशिपच्या संबधानें म्याट्रिक्युलेशन परीक्षेला जावें आणि तो प्रयत्न हुकल्यास सरकारी नौकरी साठीं पुन्हा एक वर्षभर स्कूल फायनल परीक्षेस आणखी वेळ खर्ची घालावा लागेल. इतके दिवस शिकार करितां साधल्यास स्कालरशिपच्या जोरावर कालेजांत जाता येत असे; किमानपक्षीं नेम चुकल्यास परीक्षेची गोळी निव्वळ वायफळ होत नसे; कारण सरकारी नोकरीधंद्याचे मार्ग खुले असत ते या स्कुल फायनल मुळें बंद पडतील. विद्यार्थ्यांच्या कल्याणा कडे नजर दिल्यास स्कूल फायनल परीक्षा वऱ्हाडास लागूं करण्याचें प्रयोजन दिसून येत नाहीं.

या म्हणण्यावर कांहीं आक्षेप असे काढतील कीं वऱ्हाडांतल्या स्कालरशिप प्रमाणें नाना शंकर शेट संस्कृत स्कालरशिपा सारख्या अनेक स्कालरशिपा मुंबई इलाख्यांत ही आहेत पण वऱ्हाडांतील स्कालरशिप मिळणें जितकें सोपें असतें तितकें तिकडील स्कालरशिप मिळणें सोपे नसुन महत्प्रयत्नानें चांगल्या बुद्धिमानालाच साध्य असतें. तसा प्रकार इकडे नाहीं शिवाय उमेदवारांच्या संखेच्या मानानें मुंबई कडील स्कालरशिपा फार थोड्या आहेत परंतु वऱ्हाडांत तीन व आहेत तरी उमेदवारांची संख्या अद्याप पंचवीस तीसच्या आंत असतें म्हणून वरच्या आक्षेपांत कांहीं हांशील नाहीं. स्कूल फायनलची जशी आवश्यकता मुंबई इलाख्यास आहे त्या प्रमाणें वऱ्हाड प्रांतास अद्याप नाहीं असें कांहीं म्हणतात. हा मुद्दा ही विचार करण्या सारखा आहे. वऱ्हाड प्रांत व मुंबई इलाखा या मध्यें विस्ताराच्या मानानें मोठें अंतर आहे आणि त्या मुळें वऱ्हाडांतून मुंबई युनिव्हर्सिटी परीक्षेस जाणार विद्यार्थ्यांची संख्या फार अल्प आहे म्हणून म्याट्रिक्युलेशन व स्कुल फायनल या दोन परीक्षेंतला फरक वऱ्हाडच्या संबंधानें अती सूक्ष्म आहे आणि त्याचें महत्व या छोटेखानी प्रांतांत किंबहुना नाहीं म्हटलें तरी चालेल. मुंबई इलाख्यांत कालेजांत जाऊं इच्छिणारे आणि सरकारी नोकरी मिळवूं इच्छिणारे असे दोन वर्ग हायस्कुलच्या वरच्या क्लासांतून काढितां येतील पण तसें वऱ्हाडांत लागूं करणें म्हणजे निष्कारण प्रयत्न करण्या सारखे होणार आहे प्रस्तुत प्रसंगीं हेंही सांगणें जरूर आहे कीं शिक्षणाच्या मानाच्या मानानें वऱ्हाड प्रांत सध्या मुंबई इलाख्याशी समतोल होणार नाहीं तरी कांहीं वर्षांनीं मुंबई इलाख्याशी खात्रीनें बरोबरी करील.

दुसरा एक विषय आपल्या कानावर घालण्याचा आज इरादा आहे. हा विषय वऱ्हाड स्कालरशिप संबंधाने होय. तीन वर्षे सारखीं वऱ्हाडची वीस रुपयांची स्कालरशिप अ-

व्याहतपणें चालला असतो तर आमचें कांहीं एक ह्मणणें नव्हतें. परंतु अलीकडे ही स्कालरशीप तीन वर्षें टिकण्या संबंधानें कांहीं कडक नियम केले आहेत आणि त्या अन्वयें वऱ्हाड स्कालरशिप पुरीं तीन वर्षें भोगण्यास न सांपडल्यामुळें कांहीं दरसाल रिकाम्या पडतात. ह्या रिकाम्या पडलेल्या स्कालरशिपा बी. ए. परीक्षेंत पसार झालेल्या वऱ्हाडांतील उमेदवारास पुढें एक दोन वर्षें दिल्यास फार करून दोन तऱ्हेनें फायदा होणार आहे. दरसाल युनिव्हरसिटी परीक्षेत एक सारखे पसार होणारे विद्यार्थी बी. ए. झाल्यावर आणखी एक दोन वर्षें रिकाम्या पडलेल्या स्कालरशिपांपैकीं एखादी दुसरी मिळूं लागल्यास कांहीं एम. ए. होतील कांहीं बी. एस. सी. होतील आणि कांहीं बी. ए. एल एल. बी. ही होतील. अशा व्यवस्थेनें हल्लीं पेक्षां वऱ्हाडांत अधिक ग्राज्युएट आणि डबल ग्राज्युएट निपजतील आणि आणि उच्च प्रतीचें शिक्षण सुलभ करण्यासाठीं स्कालरशिपा काढल्या आहेत तोही स्थानिक सरकारचा हेत चांगला सफल होईल. शिवाय म्याट्रीक्युलेशन परीक्षेत पहिल्या तीन जणांत नंबर न आल्यामुळें कांहीं विद्यार्थ्यांस ही स्कालरशिप मिळत नाहीं तरी ते स्वतांच्या खर्चानें कालेजांत शिकतात आणि त्या पैकीं कांहीं ग्राजुएट ही होतात. अशा विद्यार्थ्यांस उमेद व हुरूप येण्या साठीं बी. ए. झाल्या नंतर पुढें एक दोन वर्षें रिकाम्या राहिलेल्या स्कालरशिपा पैकीं कांहीं दिल्यास दुसरे थोडे उत्तम प्रतीच्या शिक्षणांत पारंगत होतील. असल्या तऱ्हेचा ही थोडी बहुत व्यवस्था ठेविल्यानें कांहीं थोडे विद्यार्थी पुढील स्कालरशिपच्या उमेदीवर कालेजांत अभ्यास करण्यास प्रवृत्त होतील आणि या रीतीनें दुहेरी उपयोग वऱ्हाडांतील स्कालरशीपा पासून घेतां येईल.

विस्तार ल्याहाला ऐसा काय आहे! आपलेच आशीर्वादें सर्वेही उत्तम होईल. मार्गशीर्ष शुद्ध १५ सोमवार शके १८१०.

आपला आज्ञाधारक

विद्यार्थी ''

वऱ्हाडसमाचार.

मिती मार्गशीर्ष वद्य ८ शके १८१०

वऱ्हाडांत हायकोर्टा या धर्तीवर नवीन न्यायखातें सुरू होणार आहे तेव्हां जुन्या न्यायखात्यांत पुष्कळ फेरबदल होऊन सध्यांच्या न्यायपद्धतीस पूर्व स्वरूपाहून अगदीं भिन्न स्वरूप येईल असें आम्हांस वाटलें होतें पण 'वैदर्भ' 'धर्मोद्दीपक' 'शुद्ध व्हाडी' इत्यादि आमच्या बंधूंच्या म्हणण्या वरून 'डोंगर पोखरून उंदीर काढला' असा प्रकार होत आहे. हल्लींची पद्धत मोडून टाकावी नाहीं आणि न्यायखात्याचा योग्य ठिकाणीं नेमणूक होत नाहीं तेव्हां नकार फेरफार होऊन लोकांची सोय व्यवस्थेशीर होणें त्यांत महत्वाचें होतें पण प्रस्तुत तसा कांहीं प्रकार दृष्टीस पडत नाहीं म्हणून लोक निराश आहेत. निराळेपणा कायतो म्हणण्या सारखा हैद्राबादचो फेरो उमरावतीस आणलो आहे म्हणजे ह्या नव्या व्यवस्थे पासून अर्धें खर्चें अपील उमरावतीस होईल. नवी पद्धत वऱ्हाडांत लागू करण्या पूर्वी तिचा मसुदा वर्तमानपत्रांतून, रेसिडेन्सी आर्डर्स मधून व निरनिराळ्या जिल्ह्याच्या कोर्टांतून सर्व लोकांस जाहिर होणें फार जरूरीचें आहे. वर निर्दिष्ट केल्या प्रमाणें नवा मसूदा अद्याप लोकां पुढें आला नाहीं फक्त त्याची बातमी कोना कोपऱ्यांतून अर्धीमुर्धी ऐकूं येते. बातमीच्या निश्चितपणाविषयीं खात्री आह्मा जवळ नाहींत तेव्हां आह्मी पुरी माहिती मिळे पर्यंत कांहीं लिहूं शकत नाहीं.

अलिशान रेसिडेंट मि. हावेल साहेबांनीं या प्रकरणीं लोकांची समजूत उत्तम रितीनें पडण्या साठीं ह्या नव्या पद्धतीचा मसुदा सर्वांस महशूर करावा आणि चांगला शोध करून लोकांचा अभिप्राय काय पडतो तो पहावा अशी साहेब बहादुरांस आमची प्रार्थना आहे. लोकांचें ह्मणणें रुचल्यास रेसिडेंट साहेब विचारपूर्वक आणखी जरुरयात फेरफार करतील अशी आम्हास उमेद आहे म्हणून आम्ही ह्या विषयीं वर आज लोकांचे उद्गार प्रदर्शित केले आहेत.

'हिंगोली प्रेस कंपनी' च्या भागीदारांची वार्षिक सभा मुंबईस भरली होती त्या वेळीं सन १८८८ तल्या आक्टोबर महिन्या पर्यंत बारा महिन्यांचा रिपोर्ट चेअरमन मि० देवजी मावजी यांनीं वाचून दाखविला त्या प्रमाणें एकदरींत साल अखेरीस निव्वळ फायदा रु७,४७७ १२ आ. ८ पै झाला आहे. अकोल्यांतल्या तिन्ही प्रेसांतील गांठे मिळून एकूण ३७४०० गांठे बांधले गेले त्या पैकीं १६०२२ गठे वराड कंपनीनें बांधले या कंपनीच्या मागील वर्षाच्या हिशोबांत रु० ११४६५, १३ आणे रकमेची तूट पडली होती त्यांत यंदाचा नफा वजा जाता बाकी रु० ३९८८, ० अ. ० ४ पै ची अद्याप तूट राहिली आहे. पुढील वर्षी ही तूट भरून येऊन आणखी चांगला फायदा होईल. प्रस्तुतच्या वस्तुस्थिती वरून उमेद बाळगण्यास प्रत्यवाय नाहीं. मागील सालीं व्यापाऱ्यांतल्या चढाओढी मुळें दुसऱ्या दोन्ही प्रेस कंपन्या पेक्षां गठडी बांधण्याचा दर कमी करावा लागत असे तो दर प्रत्येक गठडीस शेवटीं तीन रुपयां पासून अडीच रुपया पर्यंत उतरावा लागला पण हल्लीं तिनि कंपन्यांनीं एकत्र मिळून बहुमतानें दर गठडीस ३रु० ४ आण्याचा कायमचा दर ठरविल्या मुळें नकसान होण्याची भिती उरली नाहीं व्यवस्थेनें साधारण तिन्ही कंपन्यांचें काम [illegible] सुयंत्र चालेल आणि व्यापाराचा हो कार्यभाग चांगला साध्य होईल. कंपन्या ही व्यवहार असा त्यांत सर्वांची आणि एकाचा अतएव एखाद्या विशेष व्यक्तींचा नफा किंवा तोटा न होता केवळ मानवी कल्याण होत असतें हा सर्व व्यापार [illegible] कारखानदारांनी अवश्य लक्षांत वागविण्या सारखा आहे.

पर्वील माजी सिव्हिल सर्जन मोन्खान साहेब हल्लीं आकोबाईच्या चांगलि फिर्यांत सांपडेल आहेत असें दिसतें. पूर्व पाप उभे राहिलें ह्मणजे सर्व कांहीं गोष्टी उजेडांत येऊ लागतात त्यांतलाच पुढील प्रकार झाला आहे. वऱ्हाड रायफल व्हालंटीअर मधील सार्जंट मिंटी साहेबांनीं गेल्या मे महिन्याचे १५ वे तारखेस आपल्या पत्नीस समक्ष पाहण्यासाठीं डाक्टर मोन्खान यांस बोलाविलें. अजाराचें स्वरूप भयंकर दिसलें ह्मणून त्यांनीं सिव्हिल सर्जनास निकून लिहिलें पण ते बोलावण्याप्रमाणें गेले नाहींत. नंतर नुकतीनें पत्रावर १६ वी तारीख टाकली गेली आणि त्या चुकीच्या पुराव्यावर सिव्हिल सर्जन यांनीं १६ वे तारखेस आपण बाहेर गांवीं होतों ह्मणून पत्र पोचलें नाहीं आणि सार्जंट मिंटीकडे जातां आलें नाहीं अशा अर्थाची बतिउ अधिकाऱ्याजवळ बतावणी करून वेळ मारून नेली. हें कर्म हल्लीं सरकारच्या नजरेस आलें आहे म्हणून डाक्टर साहेबांची कायदेशीर रीतीनें चौकशी होण्या साठीं मद्राचे कमांडर इन चीफ कडे हिंदुस्थान सरकारचें लिहून गेलें आहे.

'संस्कृत व देशी भाषा' या विषयावर एक छोटेसें पुस्तक विवेचना साठीं आम्हाकडे आलें आहे त्याचा आम्हीं आभार पूर्वक स्वीकार करितों. पुस्तककर्ते रा. रा. राजाराम रामकृष्ण भागवत हे नामांकित ग्रंथकार आहेत. ह्यांनीं 'मऱ्हाठ्यांच्च संबंधानें चार उद्गार' द्वारा 'आपल्या महाराष्ट्र भाषारूपी जन्मदात्रीस एक लहानसें व सचित्र पण अपूर्व असें लेणें लेवविलें आहे. प्रत्येक वर्तमान पत्रांत व मासिक पुस्तकांत 'पिंडे पिंडे मतिर्भिन्ना' या न्यायानें जसा अनकूल तसाच प्रतिकूल ही लेख येऊन अखेरीस 'वादे वादे जायते तत्वबोधः' या न्यायास अनुसरून तत्वबोध होईल असा आमचें आमचे 'देशबंधु, भाषा बंधु व धर्मबंधु' मराठी रा० भागवतांनीं पुस्तक पाठविलें आहे त्या प्रमाणें वरील विषयावर आमचें मत सवडी प्रमाणें आम्ही सादर करूं.

'शिल्पकला विज्ञान' मासिक पुस्तकाचा नोवेंबरचा अंक येथ्या आठवड्यात आला आहे. ह्या पुस्तकातील विषय बाहेरचा वरून कारागीर व हुन्नरवाले कसबी लोकांनीं हें पुस्तक अवश्य संग्रही ठेवावें अशी आम्ही शिफारस करितों.

'विविध ज्ञान विस्तार' मासिक पत्रकाचे मार्च आणि एप्रील महिन्यांचे अंक मिळून एक मोठा अंक थोड्या दिवसांपूर्वी प्रसिद्ध झाला आहे आणि अद्याप चालू सालचे सहा सात अंक निघावयाचे आहेत. अनिवार्य कारणामुळें उशीर लागत असतो तरी आश्रयदात्यांना त्याबद्दल मोबदला पूर्णपणें भरून मिळत असतो. कारण मराठी भाषेतलें हें पहिलें मासिक पुस्तक असून पहिल्या प्रतीचें आहे. हें पुस्तक 'कुलस्त्रिया व गृहस्थ' या करितां आहे त्या प्रमाणें यांतील भाषा आणि विषय ही सर्वमान्य असतात.

वऱ्हाडांतील 'शेतकरी' मासिक पुस्तकाचा हो सप्तम महिन्याचा अंक काढव निघाला. हें पुस्तक पुण्यास छापिलें जाऊन उमरावतीस प्रसिद्ध होत असतें कां कीं त्याचे प्रकाशक उमरावती येथील 'शेतीची सुधारणा करणाऱ्या मंडळी' चे चिटणीस रा. रा. सखाराम चिमणाजी गोळे व गणेश नारायण बेटखेडकर हे गृहस्थ आहेत. ह्या पुस्तकांची त्रिस्थळी यात्रा होत असल्यामुळें वऱ्हाडांतील लोकांच्या मनोदया प्रमाणें वऱ्हाडच्या शेतो बद्दल यांत विषय फार येत नाहींत बाकी शेतकीच्या संबंधानें हें पुस्तक प्रमाणशास्त्र आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं ह्या लोकांच्या ह्मणण्याकडे सदरहू गृहस्थ लक्ष पोचवितील तर 'दुधांत साखर' या न्यायानें 'शेतकरी' विशेष लोकप्रिय होईल.

'मनोरंजक रत्नाकर' ची ओहटी फार दिवसांनीं संपली आणि थोड्या महिन्यां पासून भरती सुरू झाली आहे. मागील बंद पडलेली कथानकें पूर्ववत् पुढें चालली आहेत आणि नवीन एक दोन सुरू आहेत. भाषा विषयाच्या महत्वा प्रमाणें सोपी किंवा अवघड असते तरी एकंदरींत पुस्तकाचें वर्णन बाळबोध व सरळ आहे. मनोरंजना साठीं मराठी भाषेंत कांहीं थोडीं मासिक पुस्तकें आहेत त्यांत हे एक नांवाजलेल्या पैकीं आहे. ह्याच्या पांचवें पुस्तकाचा नववा अंक नुकताच आम्हा कडे आला आहे.

'कटाक्ष' वर्तमानपत्र अलिकडे नियमितपणें निघूं लागलें आहे आणि त्यांतील विषय ही चटकदार व मनोरंजक असतात आणि कांहीं चटकं विनोदाचें व मौजेचे असतात. वर्गणी सारी १ रुपया असून पंधरवड्यानें दोन अंक एकदम रवाना होत असल्या मुळें टपाल हांशील सहा आणे पडते. क्षणभर गमती साठीं हे 'कटाक्ष' पत्र अवश्य वाचण्या सारखें आहे.

## The Berar Samachar

MONDAY DECEMBER 24, 1888

With the Government of Berar 'Favouritism' secures a passport to high office and honour. If we are not mistaken what we assert is an axiomatic truth. The truism is illustrated in a vivid manner in our province when the higher offices in the Berar commission are generally filled up. We have been habituated to welcome foreigners as our Extra Assistant Commissioners and other officers of high rank and we therefore take this opportunity to congratulate Mr. E. Marshall upon his appointment as an Extra Assistant Commissioner at Buldana. This new gentleman comes direct from Simla where he was a clerk on Rs. 170 in the foreign office of the Government of India. When Mr. H. S. King bid farewell to this Province to be the Treasury officer at Quetta Mr. Marshall marshalled out his *so-called* claim to the vacant post and won it too. Such a system of high handed policy puts in the back ground the *real* claims of the competent men in the commission and thus the road to eminence and power is closed for years together.

The officiating Resident Mr. Howell is certainly expected not to be the sort of man who would approve of such an off-hand patronage but when perhaps an order he receives is likely to be obeyed we cannot find fault with the 'right man in the right place.'

### THE TAIL OF DUSSERAH AND MOHORUM FESTIVITIES.

Long after the Mohorum and the

Hindu festival of Dusserah along with it, pass away, resounding sounds of those tempestuous times are heard back in Courts of Law. Numerous riots and breaches of peace are the eventful scenes of the stormy times of the conjunction of these two Festivals. Persons of great and small importance take prominent part in these events and the result always has been that most if not all suffer punishment at the hands of the executive. Then as a matter of course men of means present appeals through well known Sawcars while poor people appeal through the jailor. The Appellate Court takes in most cases the same view of the matter as the Law Court does and appeals are therefore dismissed. In this manner many though naturally inclined to obey the Laws of the land have to take their abode in a prison house and have their wives and helpless children to the mercy of their neighbours. This falls very heavily upon the poorer classes of people. The question that naturally suggests itself first to us is who is to be held responsible for all these undesirable consequences. Our answer is decisive on the point, and it is this that the executive functionaries are primarily responsible for these direful consequences.

The Queen's High-way is no doubt for the use of all Her Majesty's subjects But if any person or community wishes to make such use of it as is directly hurtful to the feelings of others, or if one class of people holding one kind of religious views wish to make use of it exclusively to the annoyance of others, the Queen's High way ought not to be allowed to be used by such person or community. No one has a right to disturb the public peace. If Mahomedans and Hindus on such occasions as the conjunction of Mohurum and the Dusserah are likely, by their conduct on the Queen's High way, to disturb the public peace, both of these communities should be enjoined never to make use of the same High way. This will appear clear from a recent case decided by the High Court of Allahabad. In Mussamut Mukundi V. Hind, the Hon. High Court decided that since the keeper of the elephant of the Lady Mussamut Mukundi was warned to stop for a horse standing by the road had taken fright at the appearance of the elephant. It was clear duty on the part of the Lady's servant not to use the Queen's High way to the annoyance of Her fellow subject.

The soundness of the principle above given is unquestionable. To prevent the use of the Queen's Road ought to have been the order issued by the Executive in regard to the conjunction of Dusserah and Mohurum festivals. Prevention is better than cure. This is not done by the authorities and consequently poor people have to suffer for a negligence of a very gross kind on the part of our authorities. That many houses are now desolate because the heads of families have been sent to jail is simply owing to the want of foresight on the part of the executive.

Both the Hindus and Mahomedans are affected by religious frenzy on occasions such as those of Mohurum and Dusserah. We should think they are not responsible for their actions on these occasions. Why give them opportunities to make an exhibition of their religious fanaticism? Would it not be better, in view of the disturbance, to prevent both from using the Queen's Road on such occasions. The result would be that the two communities would learn the lesson and so enjoy their right as not to injure others.

---

We were quite amused the other morning while passing the plain opposite the Protestant Church to see a solitary volunteer being drilled. As far as we were able to make out, it was a non commissioned Officer, who, it is said, is the only regular attendant in the Company. Great pity indeed, that others don't follow his footsteps in this respect. There must be something rotten in the street of Denmark for their non attendance. We were told, that the present Sergeant Instructor issued an order a few days ago, setting apart Mondays, Wednesdays and Fridays for class Firing, and Tuesdays, Thursdays and Saturdays as drill days, but this order unfortunately is disregarded by himself. Some poor Volunteers put themselves to a little inconvenience the other day, and made their appearance on the drill ground, but to their surprise the Sergeant was *nonest* They returned home quite disappointed, and by chance found out that some full blown Volunteer was going through his annual course. Why should the days be changed if the orders issued are not meant to be carried out, and why issue them at all? The commandant, or the Officer in charge of the Company should see that his instructions are not violated in the manner they are at present.

---

## IRELAND AND INDIA.

The *Whitehall Review says:*—The name of the 'Rauld O'Brine' reminds us to ask, when is that gentlemen going to India to pitch Lord Lansdowne into the Bay of Bengal? He swore by all the gods that the infamous deeds in Ireland of the new Governor-General of India should be proclaimed from Ceylon to the Himalayas. The attempt to chase his Excellency from Canada was hardly successful: and judging from what the native papers in India says, Mr. O'Brien perhaps had better leave well alone. The ryots of Bengal and the North West Provinces do not know much, and careless, about the wrongs of Erin: still, following the good example of Mr. Wilfred Blunt, Mr O'Brien might go and lead a new crusade on India's coral strands, and hoist the famous tweed suit as an oriflamme. If he escapes cholera and sunstroke and being knocked on the head in a bazar row, he may live to return and explain to a Parliament in College Green what he has done in the East or perhaps, not done. Mr. T. D. Sullivan's beautiful ballad will cheer him in his arduous task: we quote it from memory:—

England fears for India,<br>
"For there her bloody work<br>
Was just as cruel and hateful<br>
As any of the Turk;<br>
But when God sends us thither,<br>
Her rule to overthrow,<br>
With faithful hearts rejoicing,<br>
To work His will we go.

"The mixture of silliness and profanity in these lines is quite worthy of the author of 'God Save Ireland,' and it seems a pity that he will not be permitted to liven Edinburgh again at least, in a 'Catholic Institute' on a Sunday afternoon—With a whoo and a whirroo amid the admiring plaudits of patriotic young men."

---

We congratulate heartily the following gentlemen from Berars and Nizam's Hyderabad upon their elevation from Lieutenant Colonels to Colonels in the army, subject to the Her Majesty's approval:—

Clayton Turner Lane, Bengal S. C.<br>
Robert Bullock, Madras S. C.<br>
Edmund Samuel Ludlow, C. I. E., Madras S. C.

G. I.

---

The Resident has been pleased to authorize Mr. T. Palmer, Barrister-at Law, to practice as an Advocate in the Court of the Resident and of the Courts subordinate to it.

---

Captain J. G. Morris, Assistant Commissioner, 2nd Class, and officiating Deputy Commissioner of the Ellichpur District, has been granted privilege leave for 19 days with effect from the 2nd. December 1888.

---

Mr. R. D. Hare, Assistant Commissioner 2nd. Class, in the Hyderabad Assigned Districts (in foreign service), has been granted privilege leave for three months with effect from the 20th. December 1888, or from such subsequent date as he may avail himself of it.

R. O.

---

## वऱ्हाड.

गेले गुरुवारीं ड्यूक आफ कनाट यांची स्वारी कामठी कडून पंत मुंबईस गेली. ड्यूक साहेब राणी पुत्र या नात्यानें कोठें ही जात नसल्या मुळें मानपानाचे थाटमाट नागपुर सारख्या शहरीं हा उडाले नाहींत बाकी मिलटिरी तोफांची सलामी त्या हुद्या प्रमाणें नागपुरास देण्यांत आली.

---

चक्रवर्तिनी महाराणी सरकारचे मंजुरीनें कांहीं लेफ्टनंट कर्नलांस कर्नलच्या जागीं नेमणार आहेत त्यांपैकीं वऱ्हाड प्रांताकडील तीन युरोपियन आफिसर आहेत ते येणे प्रमाणें:—

क्लेटन टरनर लेन— बेंगाल एस्. सी.<br>
राबर्ट बुल्लक —मद्रास एस्. सी.<br>
एडमंड सामएल लडलौ सी. आय. ई. — मद्रास एस्. सी.

---

लेफ्टनेन्ट आर. डी. सा. डेव्हिस अ. क. यांस दिलेली एक महिना एक दिवसाची रजा त्यांच्याच विनंती वरून रद्द झाली.

---

कुमार श्री हरबानजी रावजी अ. क. यांना आणखी दोन महिन्यांची रजा मिळाली.

---

रा. रा. गोपाळ गणेश ढेरे लोकलफंड सुपरवायझर यांना रा. रा. कृष्णाजी त्रिंबक खामगांवास बदलल्या मुळें त्यांचे जागीं येथील म्युनसिपालिटींत मेंबर नेमिलें.

---

रा. रा. चिंतामण मोरेश्वर आपटे रेसिडेन्सी खात्यांतील इन्स्पेक्टर हे चार महिने रजेवर गेल्या मुळें तिनि त्यांचे जागीं रा. रा. व्यंकटराव रंगराव सब रजिस्ट्रार यांस नेमिलें व यांचे जागीं रा. रा. रामचंद्र मोरेश्वर आपटे यांस नेमिलें.

---

मि. टी पामर ब्यारिस्टर यांस रेसिडेंट साहेबांनीं आपल्या कोर्टांत व सर्व खालील कोर्टांत वकिली करण्याची परवानगी दिली.

---

मि. ए. एफ. हिजिअन्स एक्झीक्युटीव्ह इंजिनियर यास यवतमाळ येथें नेमिलें.

---

यंदाच्या बी. ए. परीक्षेस १९६ उमेदवार होते त्या पैकीं ७७ पसार झाले त्यांत उमरावती हायस्कुलचे हेडमास्तर रा. रा. रघुनाथ बाळकृष्ण तळवळकर यांचे बंधु हरीभाऊ हे पसार झाले हें कळविण्यास संतोष वाटतें.

---

यंदाच्या प्रीव्हीअस परीक्षेस ५५७ विद्यार्थी गेले होते पैकीं २१२ विद्यार्थी पसार झाले आहेत त्या मध्यें वऱ्हाडांतून पुढील दोन गृहस्थ दुसरे वर्गांत पसार झाले:— रा. रा. केशव गोविंद दामळे आणि मोरो भिकाजी अगाशे.

---

रा. रा. रामचंद्र नरसिंह मुधोळकर हे यंदा एल्. एम्. ॲंड. एस्. झाले आहेत तेव्हां उमरावतीस त्यांचा खाजगी दवाखाना आहे तो चांगला भरभराटीस येवो आणि आमचे होतकरू डाक्टर विशेष लोकप्रिय होवोत असें आम्ही मनपासून इच्छितों.

---

मि. आर डी. हेअर असि. कमिशनर वर्ग २ रा यांस तारीख २० दिसेंबर पासून किंवा ते घेताल त्या दिवसां पासून तीन महिन्यांचा हक्काची रजा मिळाली आहे.

---

यंदाच्या राष्ट्रीय सभेस वऱ्हाडांतून अहमदाबाद गृहस्थ लोकांच्या वतीनें गेले आहेत. स्वार्थांत परमार्थ साधतो म्हणजे राष्ट्रीय सभेस जातां येतें आणि काशी यात्रा ही हल्लीं घडून येते म्हणून बरीच मंडळी गेली हें उघड आहे.

---

कामगार लोकांनीं आतां परीक्षा होऊं नये म्हणून अर्ज केला होता त्या प्रमाणें परीक्षेच्या संबंधानें हिंदुस्थान सरकार हुकूम तयार आले आहे तेव्हां गेल्या आठवड्यात उमरावतीस परीक्षा झाली तींत आतां मातबरी राहिली नाहीं.

---

येथून दोन तीन कोसांवर मुकांडे म्हणून खेडेगांव आहे तेथील एका शतकापार दोन क्रम करणाऱ्या एक अल्पवयस्क मुलीशीं जबरी संभोग केला या आरोपावरून त्यास दोन वर्षें सक्त मजुरी आणि ५० रुपये दंड झाला.

---

उमरावतीस छत्रपुर शिंदी जवळ एक बाईस आणि एका मुलांस असे दोन खून झाले. त्या भागांत आठवड्यात आले त्यास लगा अद्याप शहर गावीं लागूं नये हा पोलीस पोलिस मठें दुर्गम आहे.

---

वर्तमान गिराहांत.

नगविख्यात मि. ग्लाडस्टन साहेबांस हिंदुस्थानचे माजी व्हाइसराय लार्ड डफरिन साहेबांनीं सोन्याचा मुलामा दिलेला एक रुप्याचा पेला नजराणा पाठविला होता. हा नजराणा गेल्या नोवेंब्बर महिन्यांत विलायतेस रवना झाला होता. आप्तस्नेही मंडळींनीं परस्पर मेहर नजर धाडण्याचा लौकिकमार्ग सर्वत्र चालूं आहे पण कांहीं धोरणी पुरुष या रुप्याच्या पेल्या संबंधान अनेक मतें प्रदर्शित करितात. ते लोकांचें विचार खरें किंवा खोटे आहेत हे सांगणें सोपें नाहीं तरी लार्ड डफरिन पक्के पाताळयंत्री आहेत तेव्हां या पेल्याच्या गोळीचा टप्पा कोठवर लांबतो पहावें. लार्ड डफरिन साहेबांची हिंदुस्थानच्या व्हाइसरायच्या जागीं नेमणूक होते वेळीं मि. ग्लाडस्टन यांचीं शिफारस पुष्कळ उपयोगी पडली होती तेव्हां हिंदुस्थानची अधिकार सूत्रें सोडण्या पूर्वीं विलायतेस प्रयाण करण्याची सूचक खुण म्हणून धाडली असावी असा कांहीं तर्क बांधतात. कानडा देशाचे गव्हरनर जनरल फार करून हिंदुस्थानचे गव्हरनर जनरल व्हावेत असा साधारण पणें सरकारचा मानस दिसतो त्या प्रमाणें लार्ड डफरिन साहेब कानडा देशांतून परत आल्यावर हिंदुस्थानचे राजे बनले असावे असें ही म्हणणें गैरशिस्त होणार नाहीं. कांहीं ही असो पण डफरीन साहेबांनीं हा पेल्याचा दुटप्पी बारा काढिला आहे तो असा कीं कानसरव्हेटीव आणि लिबरल पक्षा पैकीं कोणत्या पक्षास अनुकूळ आपलीं मतें आहेत याचें अनुमान साधारण लोकांस करितां येऊं नये.

येत्या सत्ताविसावे तारखे पासून अलाहाबाद क्षेत्री पुर्वीं निश्चित झाल्या प्रमाणें चालूं सालचो 'राष्ट्रीय सभा' सुरू होईल. यंदाच्या कांग्रेसला विलायतेहून वुलियम डिगबी सी. आ. इ. हे मुद्दाम आले आहेत त्या बद्दल हिंदुस्थानची प्रजा साहेबांची फार आभारी आहे. हिंदुस्थानच्या कल्याणा साठीं सन १८७९ साल पासून ह्या साहेबांचा अव्याहत प्रयत्न चालला आहे. यांच्या प्रयत्नास यश मिळो आणि हिंदुस्थानची एक वेळ पार्लमेंटच्या पायरी पर्यंत मजल पोंचो म्हणजे आम्हीं आपणास भाग्यशाली समजूं.

औधच्या राजाचे पुतणे जहान कादर मिरझा साहेब यास हिंदुस्थान सरकार कडून पूर्वीच्या तनाती पेक्षां जास्त दरमहा ९०० रुपये देण्याची मंजुरात आली आहे, हिंदुस्थान देश लक्ष्मीचें माहेर घर; त्या कुबेरनगरींतल्या राज पुरुषांची असली स्थिति अभिनंदनीय मानून निमूट बसण्याचा सध्यां मनु आला आहे.

दिव्या खालीं अंधार—मद्रास इलाख्याचे गव्हरनर लार्ड कानेमारा याच्या पत्नीनीं गव्हर्मेंट हाऊस सोडून नजिकच्या हाटेल मध्यें एकटे राहण्या साठीं तळ दिला आहे. साध्या रुसवा रुसवीच्या प्रकारा पेक्षां हा प्रस्तुतचा समय परस्पर नवरा बायको मध्यें मोठी धूमसचक्री माजे पर्यंत ठेपला होता. म्हणून सखेदाश्चर्य वाटतें. सुधारणेच्या शिखरास पोंचलेल्या राष्ट्रांतले उभयतां असून शिवाय मडम साहेब हिंदुस्थानांत दणाणलेले माजी डलहौसी यांची कन्या आहेत तेव्हां अशा नव्या घरांतला बोभाटा कानीं आला म्हणजे मन एकदम थक्क होऊन जातें. अशा तऱ्हेच्या जनापवादामुळें लार्ड साहेबांच्या अत्युत्तम लोकप्रियतेचा ऱ्हास होईल म्हणून फार वाईट वाटतें. बेबनाव होण्याचें कारण पुरतेपणीं लोकांपुढें अद्याप आलें नाहीं तरी गव्हरनरचे एडीक्यांप क्यापटन क्विन यांनीं रजा घेऊन आपल्या पत्नीला कलकत्यास परत न येण्याच्या इराद्यानें नेल्यामुळें पूर्ववत् लाट साहेब व त्यांच्या पत्नी यांचें सख्य होईल असा रंग दिसत आहे यावरून इव्हाक्विनशी लाट साहेबाचें भारी रहस्य होतें तें त्यांच्या पत्नीस अमर्याद वाटलें असावें. लोक निंदेस व उपहासास पात्र अशी गोष्ट घडून आल्यामुळें गव्हरनर साहेबांच्या इतमामापैकीं मिलीटरी सेक्रेटरी सारख्या एकदोघांनीं आपल्या जागेचा राजिनामा दिला आहे. ईश्वर करो आणि ही वडी नवराबायको सुखेनैव नांदो!

शहाण्यांच्या पोकळ गप्पा— लार्ड डफरिन साहेबांनीं आपल्या कारकीर्दीचा सबळ पुराव्यासह इतिहास कलकत्यास महशूर करते वेळीं सांगितलें कीं राष्ट्रीय सभेविषयीं आपल्या प्रतिकूळ मतास आधारस्तंभ अशीं मतें हिंदुस्थानांतील बड्या नेटीव लोकांनीं प्रदर्शित केलीं आहेत. हीं मतें कोणत्या व्यक्तींचीं आहेत व ती कितपत भरंवशा लायक आहेत याचें प्रत्यंतर पाहण्यास फार दूर जाणें नको कारण माजी व्हाईसराय साहेबांस सर. टी. माधवराव, मि. बद्रुद्दीन तय्यबजी मि. बनरजी, इत्यादि गृहस्थ बडे नेटीव वाटत नाहींत तेव्हां त्यांची मतें पसंत कोठून वाटणार? लाट साहेबांची वेदश्रुती म्हटली, म्हणजे सयद अहमद, राजा शिवप्रसाद सारखे गर्भश्रीमान हरीचे लाल होत. ह्या सारख्या दुराळलेल्या मंडळीस हिंदुस्थानची वस्तुस्थिती चित्ररूपानें माहीत असावी किंवा त्याचें स्वप्न तरी पडलें असावें अशा बद्दल देखील आमच्यानें खात्री देववत नाहीं.

दारूबाजांस रेचक— विलायत दारूचें मूळपीठ खरें पण तिकडे स्वीडन देशांतील दोन लक्ष दहा हजार लोकांनीं दारूचा व्यापार बंद करण्याविषयीं आपल्या राजास विनंतीपत्र धाडलें आहे. चैनीसाठीं हव्यासानें दारू पिणाऱ्यांनीं ही गोष्ट लक्षांत आणून वर्तनक्रम बदल्यास श्रेयस्कर होणार आहे.

हिंदुस्थानचा 'सिंह' राजा रणजितसिंग याचा वंशज धुलिपसिंग हिंदुस्थानास पूर्णपणें मुकला इतकेंच नव्हे तर मागें पुढें कांहीं एक धोरण न ठेवितां सिंग हल्लीं पारीस शहरीं हिंदुस्थान सरकाराविरुद्ध उघडपणें बोलतात असें अलीकडे वर्तमान आलें आहे.

कुरूप नवऱ्यावर पिनलकोड— युनायटेड स्टेट मधील मिसेस व्हिक्टोरिआ वुडहिल नांवाच्या लेडीनें कुरूप किंवा रोगीट मनुष्याचें लग्न होऊं नये आणि झाल्यास कायदेशीर शिक्षा व्हावी असा स्टेट सरकारकडून व्यवस्था होण्यासाठीं अर्ज केला आहे. अशा तऱ्हेचें प्रत्यवाय सरकारी कायद्यांत घालून ठेवणें फार हितावह होणार आहे पण तशी पद्धत अंमलवारींत येण्यापूर्वीं वेड्याच्या इस्पितळा सारखीं कुरूप व रोगीट मनुष्यासाठीं नवीन इस्पितळें काढावीं म्हणजे त्यांतले पुरुष व स्त्रिया परस्परामध्यें लग्नव्यवहार चालू करून आपली निराळी सृष्टी बनावितील. हिंदुस्थान सरकार हें मृत्यु लोकीच्या विश्वकर्म्याचें काम पत्करील, काय?

स्त्री शिक्षणाची उन्नती—जपान देशाच्या महाराजानें स्त्रिया साठीं एक कालेज सुरू केलें आहे त्यांत दोन अमेरिकन, दोन इंग्लिश आणि दोन फ्रेंच व जर्मन लेडी प्रोफेसर्स नेमिल्या आहेत. हिंदुस्थानांत ही पुरुषा करितां म्हणून कालेजें आहेत त्या प्रमाणें स्त्रिया साठीं निराळीं कालेजें स्थापन होण्याचा काल लवकर समीप येत आहे आणि तशांत अनुकरण करण्यास उदाहरण मिळाल्यास सुधारक मंडळी विलंब लावणार नाहीं असा भरंवसा आहे.

सिम्ला येथील गिरीशिखरीवरील बड्या अधिकाऱ्यांचा वाप निम्या एप्रिल महिन्यापर्यंत लांबणीवर टाकावा आणि नंतर उन्हाळ्या निमित्त आफिसे तिकडे न्यावींत अशी स्टेट सेक्रेटरी कडून नुकतीच सूचना झाली आहे.

लंगड्याला आंधळा वाटाड्या— भोपाळ संस्थान सध्यां कालचक्रा खालीं चुरडून जाण्याच्या बेतांत आलें होतें पण तेथील बेगम साहेबांच्या सुदैवें करून सर लिपेल ग्रिफीन निजधामास गेले म्हणून ते संस्थान रसातळाशीं न पोंचतां त्यास थोडीशी उचल मिळाली. या संस्थानांत अव्यवस्था झाली आहे आणि ह्या अव्यवस्थेचा समूल नाश करण्यास सरकार प्रवृत्त आहे तेव्हां अशा आणी बाणीच्या वेळीं भोपाळ संस्थानच्या प्रधानकीचीं वस्त्रें मुनशी इम्टी आस अली यांस देण्याचें ठरलें आहे. ही बातमी बहुतेकांस रुचणार नाहीं कां कीं मशारनिल्हे मुनशी लखनौ शहरचे सामान्य वकील आहेत आणि त्यांची मुकी शिफारस म्हणजे ते राष्ट्रीय सभेचे द्वेष्टे आहेत. सर अहमद साहेबांच्या असल्या पिरजादे अनुयायांनीं हें राष्ट्रीय सभेच्या उत्साची पर्वणी चांगली सोळा आणे साधली यांत तिलप्राय संदेह नाहीं. परंतु भलत्या जागीं भलता मनुष्य नेमिला म्हणजे पिशाच्या हातीं कोलीत दिल्या सारखें होण्याची भीती असते. आणि तशांत भोपाळ संस्थानच्या कल्याणा कडे सरकारची विशेष मेहर नजर आहे म्हणून लोक नशिबा कडे बोट दाखवीत आहेत.

व्यसनपराङ्मुखता हें तर आरोग्याचें अगदीं जीवन आहे कामधंदा करताना अंगीं ताकद व उत्साह येण्यास कांहीं तरी व्यसन पाहिजे असें पुष्कळांना वाटतें; पण वैद्यशास्त्रज्ञांचा ह्या बाबतींत अगदीं उलट अभिप्राय आहे व्यसनानें मैत्री जडते असेंहि म्हणतात; पण " चोरी केल्यानें द्रव्य मिळतें" ह्या म्हणण्याप्रमाणेंच त्याची योग्यता आहे. तसेंच व्यसनाच्या योगानें क्षणभर तरी मनास एक प्रकारचें समाधान सुख वाटतें असेंहि सांगतात. व हें कदाचित खरें हि असेल; पण तेवढ्यासाठींच जर व्यसनाधिन होऊन रहावयाचें असेल तर आम्ही निरुपद्रवी व उत्कृष्ठ अशीं दोन व्यसनें सांगतों त्यां पैकीं तरी व्यसन आळगावें तीं कोणतीं, तर–, "विद्याभ्यसनं व्यसनं अथवा हरिपादसेवनं व्यसनं॥"

घराचें वर्णन

॥जागेस ओल, वरि डांस चिलीट भारी॥
॥घाणेरडे परस–आंगण–ओटि सारी॥
॥स्त्री कर्कशा, किरकिराचि घरांत पोरी॥
॥देवा कधींहि गृहवास असा नको रे॥१॥

कोणत्याही लोकांच्या सुधारणेच्या अगदी आरंभी व त्यांना अक्षरांचें ज्ञान होण्याच्या पूर्वीं बहुत वर्षें, त्यांना असें एकादें साधन असावेसें वाटेंत कीं त्याच्या योगानें फुरसतीच्या वेळीं करमणूक व्हावी व लढाइच्या वेळीं वीरश्री यावी. ही उणीव भरून भरून काढण्याकरितां पवाड्यांची योजना होते. हे पवाडे सर्व प्रकारच्या ऐतिहासिक ज्ञानाचे पाये होत व ते एकनाएक रूपानें पृथ्वीवरील कित्येक अत्यंत जंगली लोकांमध्यें देखील आढळतात. ते गाणारे लोक बहुधा ज्यांचे काम दंतकथांचा पुरवठा सांभाळून ठेवण्याचें असतें, तेच असतात. आणि गत, गोष्टीं विषयींची जिज्ञासा इतकी स्वाभाविक आहे कीं, जेथें असले हे भाट किंवा गोंधळी नाहींत असें देश क्वचितच असतील.

पुराणकथा ह्या ऐतिहासिक कादंबऱ्या कादंबऱ्या आहेत (historical novels) तेव्हां त्या ज्याला इंग्रजींत light literature म्हणतात त्या जातीच्या होत. असले ग्रंथ विद्वान् लोकांना फार कमी आवडतात. ज्यांची बुद्धि गंभीरविषयविचारांनीं प्रगल्भ झाली आहे अशांना light literature ची गोडी लागू नये व प्रसंगीं वीटही यावा यांत आश्चर्य नाहीं. हा आजकालचा प्रकार नाहा. कोणत्याही देशांतल्या विद्वानांची पहा हीच स्थिति. 'रंडागीतानि काव्यानि' ही उक्ति बऱ्याच जुन्याकाळची असावी. तिच्यावरून तरी काय अर्थ निष्पन्न होतो? वाघाला एकदा मनुष्याच्या रक्ताची चट लागली म्हणजे बकरी वगैरे त्यास आवडत नाहींत, त्याच प्रमाणें गंभीर व गहन विषयांची बुद्धीला चट लागली म्हणजे क्षुल्लक व लघु विषयाकडे तिला प्रवृत्ति होऊं नये हें साहजिक आहे. तेव्हां पुराणकथा ह्या कादंबऱ्या असल्या कारणानें विद्वान् लोकांना त्या आवडू नयेत हें नीट आहे. वि० ज्ञा० वि०

निवडुंग–हिंदुस्थान देशांत निवडुंग फार आहे तशांत इंदूर प्रांतांत हीं झाडें अतोनातच आढळतात. या झाडांचा हल्लीं कांहीं उपयोग होत नाहीं डाक्तर वार्व्हानिया नावाचे एक गृहस्थ असें सुचावितात कीं, ह्या झाडावर उत्तम उत्तम फल झाडांची पिवदा बांधली असतां चांगली येते व हें जर होत नसेल तर याच्या फळाचा आळकोहोल (एक प्रकाची दारू) काढावी. शे० क०

यंदाच्या राष्ट्रीय सभेंत आठ दहा विषयांचा विचार होणार आहे त्यांत पुढील विषय लोकांनीं अवश्य लक्षांत वागविण्यासारखे आहेत:— हत्यारांचा कायदा; हिंदुस्थानांतील लोकांची स्थिति; देशी व्हालंटीअर; कायदे कौंसिलांत सुधारणा; टेक्निकल एजुकशन प्राथमिक माध्यमिक व वरिष्ठ प्रतीचें शिक्षण आणि सभेची व्यवस्था.

वऱ्हाडचे माजी रेसिडेंट सर स्टूअर्ट बेली यांनीं कलकत्याकडील वकील डाक्टर बिहारीदास यांस लेजिसलेटीव्ह कौन्सिलांमध्यें नेमिले म्हणून त्यांच्या गुणाच्या परीक्षेबद्दल बाबुमंडळी साहेबांची फार वाहवा करितात.

☞ हें पत्र आकोला येथें के० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही " ३ " ८
सालअखेर " ७ " ८
किरकोळ अंकास............................४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे अं... रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस........०१

Per annum in advance 5 Postage 13 as.
Per annum in arrears 7 "1Rs. 6 as.
Six monthly............3 " 8 as.
Single copy..............................4 as.

Advertisements
Below 10 lines...2Rs
per line over10 ..4as.
Repetition derline3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXII AKOLA MONDAY 31 DECEMBER 1888 NO.51

वर्ष २२ अकोला सोमवार तारीख ३१ माहे दिसेंबर सन १८८८ इ० अंक ५१

NOTICE.

The following dates are fixed for the sale of Abkari Contracts (Country Spirits, Tari, Opium and Drugs) in the Hyderabad Assigned Districts for the year 1889 90.

The sales in each place will take place at the Court house of the Deputy Commissioner at 12 o'clock.

Amraoti...Monday...21 Janry 1889.
Ellichpur... Do ......28th,...Do....
Akola...... Do.......4th,Febry 1889
Buldana... Do ..... 11th,...Do ......
Bassim...Thursday 21st....Do......
Wun(Yeotmal) Monday 4th March 1889.

Information regarding the conditions of the auction and of the contracts may be obtained at the district office.

J. Wade.
Superintendent
For Commissioner
Hyd: Assigned Districts

जाहिरात.

सर्व लोकांस खाली सही करणार याज कडून कळविण्यांत येतें की नारायण सदाशिव वाणी राहणार बोरगांव हा आमचा व्यापाराचे मुखत्यार कामावर होता त्यानें आमच्याशी बेमानी केली आहे व त्याजबद्दल आम्ही त्यास पकडून योग्य समज दिली आहे. त्यास हल्ली आज सुमारें ११ महिने होत आले. परंतु अलीकडे सदरहू इसम पुन्हा आमच्याशीं लुच्चेगिरी करूं लागला आहे तर आमच्याशी ज्यांचा देवघेवीचा कापूस गल्ला वगैरेचा व्यापार आहे त्यांनीं आमच्या सही शिवाय कांहीं ही देवघेव सदरहू मनुष्याबरोबर करूं नये केल्यास आम्हांस कोणत्याही रीतीनें संमत नाहीं. ह्मणुन दिली जाहिरात सही ता० २४ दिसेंबर सन १८८८

(सही)
सेख अबदूलकरीम वलद सेख
मुसा राहिला साहू राहणार
बोरगांव खुर्द ता० अकोले
दस्तुर खुद.

दामोदर काशिनाथ काळे
आणि कंपनी यांचा
दवाखाना

या ठिकाणीं मनुष्यांचे व गुराचे सर्व रोगांवर औषधें मिळतात.

औषधें घेण्यास फार सुलभ आहेत. कोणत्याही रोगांवर वैद्य व अलोपाथिक डाक्तर जी औषधें देतात त्याहून आमचे जवळ असलेल्या औषधांनीं फार लौकर चांगला व फार वेळ टिकणारा गुण येतो.

पटकी, मुळव्याध, परमा, आम्लपित्त खरूज, पैण, नायटे, खवंद, हिवताप, संधिवायु, दमा व खोकला, भगंदर, लहान मुलांचे आगांत येणें, मुलाचे पोटांतील डबा, गरोदर अवस्थेंतील ओकारी, बाळंतरोग व इतर प्रकारचे माणसांचे सर्व रोग ह्यांजवर उत्तम गुण देणारीं औषधें आह्मीं आमचे दवाखान्यांत ठेविलीं आहेत.

गुरांचे रोग—पटकी, लाळ, खेसणें, पाठीला लागणें, पोट फुगणें, गळा सुजणें, आवरक, आचळांतून रक्त येणें, क्षतें, पोटांतलि कृमी, ज्वर व इतर सर्व रोग यांजवर या दवाखान्यांत औषधें ठेविलीं आहेत. गाई, बैल ह्मशी, हेले, घोडे, कुत्रीं, मांजरें, बकरीं, या जनावरांचे सर्व रोगांवर आह्मीं औषधें ठेविलीं आहेत.

या दवाखान्यांत रोग्यांना औषधाबद्दल थोडी किंमत द्यावयास लागेल.

बाहेर गांवीं राहणारे लोकांना आपआपले रोगाची हकिकत लिहून कळविली असतां माफकदरानें त्यांस अभिप्राय मिळेल. औषधें मागविली असतां जीं औषधें आह्मीं पाठवूं त्याबरोबर औषध घेण्याचे माहितीचा कागद पाठवूं.

वर लिहिलेल्या कित्येक रोगांवरील औषधांचे एका कुपीत पांच मनुष्यांस पुरण्याइतकें औषध असतें.

जुने रोग व ज्या रोगांना बरे करण्यास वेळ लागतो अशा रोगानीं पिडलेल्या लोकांस त्यांची मर्जी असेल तर ठराव करून ठरावाची जी रकम ठरेल त्यापैकीं कांहीं आगाऊ द्यावी लागेल.

"हा दवाखाना उमरावती येथें मुख्य दरवाज्या बाहेर मिस्टर प्रल्हाद नारायण कोनकाल यांचे वाड्यांत खालचे दिवाणखान्यांत आहे"

उमरावती मेडिकल हॉल.ता० २७-१०-८८
दामोदर काशिनाथ काळे आणि कंपनी.

नोटीस.

नारायण सदाशिव वाणी राहणार बोरगांव खुर्द यांस

खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येतें कीं, तं आमचा नोकर होतास व कामगारींत तुं विश्वासघात करून आम्हास बऱ्याच रुपयास डुबविलेंस. व तुजला त्याजबद्दल पकडून चांगली समजही दिली असून तूं आमच्या व्यापारांत मुखत्यार प्रमाणें असामी पाहून वसूल करून आम्हास डुबवीत आहा तर तुम्हास असे कळविलें जातें कीं फेब्रुवारी सन १८८८ पासून आजपावेतों व पुढेंही तुम्ही आमच्या व्यवहारांत कोणत्याही प्रकारचा संबंध ठेवूं नये व आजपावेतों जो ठेवला असेल व त्याजबद्दल जे पैसे जमा झाले असतील, व त्याजबद्दल तुम्ही पावत्या दिल्या असतील. ते सर्व आठ दिवसांत आम्हास समजून द्यावें असे न केल्यास तुम्ही दगलबाजी केल्या बद्दल योग्य काम चालवून योग्य तजवीज केली जाईल. कळावें तारीख २४ माहे दिसेंबर सन १८८८ इसवी.

(सही.)
सय्यद आबदुलकरीम वलद
सय्यदमुसा रहिला साहु
राहणार बोरगांव खुर्द
दस्तुर खुद.

नोटीस.

गणपती वलद तुकाराम मोहड राहणार आकोट ता० आकोटें.

खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येतें कीं तुम्ही माझे देणें रोख रुपये १२ व १२ बारा मण कापुस बद्दल लिहलेले सर्व कागद आमचा पूर्वीचे नोकर नारायण सदाशीव वाणी यानें मुखत्यारी प्रमाणें करून घेतले. त्याज बद्दल. ते सर्व रोख वगैरे आम्हांस सदरहु मनुष्य काम ज्या वेळे पर्यंत इमानानें नोकरी करीत होता त्या वेळे पर्यंत ठीक होते. पुढें त्यानें बदमासपणा करून आम्हांस डुबविलें आहे तर यापुढें जें येणें आहे तें आमच्या सही शिवाय व पावती शिवाय तुह्मी देऊं नये. दिल्यास आम्हांस मान्य नाहीं. रीती प्रमाणें वसुलाची तजवीज केली जाईल. आतां तुम्हाकडे येणें रोख रुपये १२ व १२ मण कापुस हें आठ दिवसांत आणून निकाल करावा असें न केल्यास रीती प्रमाणें तजवीज केली जाईल व अखेर निकाल होई पर्यंत सर्व नुकसान भरून घेतलें जाईल ह्मणुन दिली नोटीस सही तारीख २१ माहे डिसेंबर सन १८८८ इसवी.

(सही.)
सय्यद अबदुल करीम वलद
सय्यदमुसा रहिला साहु
राहणार बोरगांव खुर्द
दस्तुर खुद.

नोटीस

गिरजा मर्द जयराम कोळी राहणार मौजे आपोती खुर्द ता० आकोले इजला झाशु वलद माधोजी कोळी राहणार मौजे आपोती खुर्द ता० आकोले याजकडून नोटीस देण्यांत येत आहे कीं तू माझा कनिष्ट भाऊ जयराम याची स्त्री बायको आहे. तुझा नवरा मयत झाला सबब त्याचे नावें असलेला तुझे नावांना लागून ती तुझे ताब्यांत आहे आतां तुझे मनांत दुसरा घरठाव करावा ह्या हेतूनें तूं आपला बाप घरी आणुन ठेविला आणि मालाचा अफरातफर करून राहिली आहे. वास्तव ह्या नोटीशीनें कळविलें कीं स्थावरमाल सर्व वडिलोपार्जित आहे. तुझे नवऱ्याचे कमाईचा नाहीं वास्तव कायद्याप्रमाणें तुजला विकण्याचा अधिकार नाहीं. फक्त दुसरा नवरा न करतां तशीच राहशील तर अन्नवस्त्राचा अधिकार आहे करितां याउपर वडिलोपार्जित स्थावर माल कोणास विकूं नये. व जंगम मालाची अफरातफर करूं नये. केल्यास त्याचे नुकसानीस जबाबदार तूं व विकत घेणार असे होतील मी होणार नाहीं.

बाजारलम सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं वरील नोटीशीबद्दल सर्वांनीं विचार करून गिरजा मर्द जयराम इजपासून शेती वगैरे कोणी विकत घेऊं नये. तिजला कायद्या प्रमाणें बिलकुल अधिकार नाहीं सबब कोणाचे विनाकारण नुकसान होऊं नये ह्या करितां सुचविलें आहे. वास्तव याउपर मशारनिल्हे बाईचे नावची सेती कोणी बाईपासून विकत घेतल्यास त्याचे नुकसानीं बद्दल मी जबाबदार न होता ज्याची त्यास सोसावी लागेल कळावे ता० २९-१२-८८ इ० अकोला

[ सही ]
झासु वलद माधोजी कोळी राहणार
अपोती खुर्द नि० खुद्द हस्तकी

वऱ्हाडसमाचार.

मिती मार्गशीर्ष वद्य १३ शके १८१०

सन १८८६ सालच्या वऱ्हाड म्युनिसिपल कायद्याची नवीन पुरवणी वऱ्हाडांत अंमलांत येण्या साठीं गेल्या १९वे तारखेस 'रेसिडेंसी आर्डरी' च्या जादापत्रकांत जाहीर झाली आहे. ह्या पुरवणींतल्या नियमांचा मसुदा लोकांच्या अभिप्रायासाठीं सहा महिन्यापूर्वीं 'रेसिडेन्सी आरडर' ह्मणून छापून प्रसिद्ध झाला होता त्यावर लोकांनीं आपापली मतें सरकारास कळविण्या करितां जुनच्या दहावे तारखे पर्यंत सरासरी पाऊण महिन्याची मुदत दिली होती. ह्या नियमांवर वऱ्हाडांतील वर्तमान पत्रांतून बरीच मतामतें नमवाति झाली होती आणि त्यांतील गुणदोष ही प्रसंगानुसार स्पष्टपणें प्रदर्शित केले होते. कायदे कानूच्या रिवाजाप्रमाणें लोकमताच्या धोरणानें कांहीं कांहीं ठिकाणीं फेरफार होऊन मसुद्यांतील अठेबावीस नियम हल्लीं पसार झाले आहेत

सार्वजनिक कामें ठिकठिकाणच्या सुबरस्तु गृहस्थांनीं चालवावी असा हिंदुस्थान सरकारचा फार वर्षां पासून मनोदय आहे म्हणून तदनुरूप थोडे थोडे सरकारांतून मदत होत आहे त्यांतलाच एक पर्याय नवीन नियममांचे कोड हें होय. लोकनियुक्त समाज दिवसेंदिवस उदयास येत जाऊन त्या मानानें सरकारचा हेतु सिद्धीस जाणार आहे आणि हाच नियम म्युनसिपालिट्यांस ही लागू पडतो. म्युनसिपालिटीची संस्था फार करून लोकनियुक्त समाजाच्या धोरणावर बसविली आहे आणि ति-

ची भरभराट होणें हें सार्वजनिक कल्याणास अत्यंत महत्त्वाचें आहे तेव्हां कायद्यातील कलमाच्या स्वरूपानें प्रसिद्ध झालेले नियम लवकरच अंमलांत येतील अशी पूर्ण आशा आहे.

आम्ही मागील दोन महिन्यांत वरील अर्ध-वार्षीक नियमांवर साधक बाधक प्रमाणा सहीत लोकांचे विचार प्रदर्शित केले होते त्या प्रमाणें ॲक्टिंग रेसिडेंट साहेबांनीं कांहीं थोडे मुद्देसुत फेरफार केले आहेत हें कळवि-ण्यास आम्हांस संतोष वाटतो. ज्या थोडया बहुत नियमांत फेरबदल झाला आहे त्या नियमांचें पृथक पृथक तात्पर्य खालीं देऊन हा विषय पुरा करितों.

३ मत देणाऱ्याला अवश्य लागूं असणारा एक रुपया टाऊन फंडाचा किंवा पंचवीस रुपये पाण्याचा नियम पुढील गृहस्थांस लागूं न करितां त्यांस मत देण्याचा अधिकार दिला आहे:— म्युनिसिपल कायद्या अन्वयें प्रत्यवाय येत नसल्यास कोणत्याही युनिव्हरसिटीचा पदवीधर किंवा लायसेन्स, सनदी वकील, डाक्टर, अंमलदार, आणि ऑनररी माजिस्ट्रेट यांचीं नांवें मत देण्यास लायक ठरलेल्या गृहस्थांमध्यें नमूद होतील आणि त्यास मुनिसिपालिटीचे सभासद होण्यासाठीं उमेदवारही करण्यास मोकळीक आहे.

विद्वान, गुणी आणि अधिकारसंपन्न गृहस्थांस दहाव्या नियमाप्रमाणें सभासदांच्या जागेसाठीं उमेदवार होतां येत असे परंतु वरील तिसऱ्या नियमांतील पोटनियमाप्रमाणें उमेदवार होण्यास हरकत उरली नाहीं तरी या अपवादाचा पुन्हां स्पष्टपणें दहाव्या नियमांत उल्लेख होणें जरूर आहे.

मत देण्याचे लायकी येण्यास निदान सहा महिनेपूर्वीं मत देणारा मनुष्य त्या त्या म्युनिसिपाल हद्दींत राहणारा असला पाहिजे. हा फरक झाला आहे तेव्हां साहजिकच अ-निवट माहितीचे लोक मत देण्यास लायक ठरणार नाहींत हें बरें झालें.

१७ मत देणाऱ्या पुरुषानें स्वतां हजर राहून मत द्यावें आणि मत देणाऱ्या स्त्रीनें आपल्या मुखत्यारामार्फत कळवावें. या नियमाविषयीं विशेष केल्या नियमा अन्वये पंधराव्या नियमांतील दुसऱ्या कलमांतला दोस आता साफ झाला आहे

२८ मुनसिपाल कमिटीचा ठराव प्रसिद्ध ठिकाणी जाहिर करावा आणि वर्तमानपत्रकर्ते ते ठराव फुकट छापतील तर यांच्या पत्रांचा मानपत्रास देण्यांत यावा म्हणजे निरनिराळ्या महत्त्वाच्या मानानें सर्व ठरावाचे ठराव किंवा त्यांतील कांहीं भाग छापिला जाईल. फुकट छापविण्याची पद्धत सरकार सुरू करण्यास एका पायावर उभें असतें. या प्रमाणें सरकारी आणि लोकल ब्यांतर नसूनें त्या त्या स्थानिक छापखान्यांतून छापवावे अशा अर्थाचे नियम झाले असून हां तें अमलांत येत नाहींत हें कहीं नवल नव्हे.

खामगांव मुनसिपालिटीच्या हद्दींतील सुताळपुरा आणि [illegible] या दोन्हा पुऱ्यांबद्दल एक मेंबर ठरविला होता त्याबद्दल हल्लीं दोन केले आहेत.

## राष्ट्रीय सभा.

(सन १८८८ सालचा प्रयागक्षेत्रीं समारंभ)

प्रयाग उर्फ अलहाबाद आजकाल कार्तिम शहर बनलें आहे कारण मान्या हिंदुस्थानांतले गुणी श्रीमान व विद्वान् लोक तेथें एकत्र जमले आहेत. प्रत्यक्ष सरासरीनें आठशेंवर गृहस्थ लोकांच्या वतीनें यंदाच्या समारंभास आले आहेत त्यांत बहाद्दर प्रांताचा वतीनें एकाणीस गृहस्थ आहेत. ही 'राष्ट्रीय सभा' राजनिष्ठ आहे आणि स्वदेशाभिमानात तत्पर आहे हें दाखविण्यास प्रस्तुतच्या सभेचा हकीकत पाहिली असतां पुरें होणार आहे.

लार्ड डफरिन साहेब स्वदेशीं जातांना म्हणाले कीं राष्ट्रीय सभा भरणें हक्क आहे खरें पण तिचें काम हल्लीं पेक्षां निराळ्या धोरणानें प्रस्तुत पद्धतींत राजद्रोह दिसून येतो आणि कदाचित एखादें बंड ही उभें राहील. सभेचे सेक्रेटरी ह्यूम साहेब सरकारच्या मार्गांत आड येतात तेव्हां त्यांना ही कांहीं सजा मिळाली पाहिजे. असें किंवा अशा अर्थाचे मोघमपणें खरे ठोकणें सोपें आहे आणि अशा आक्षेपाचें निरसन करण्यास एक गोष्ट असते. ती ही कीं राष्ट्रीय सभेने आजपर्यंत केलेलीं कामें लोकांपुढें मांडावें, आणि तीं निर्दोष आहेत हें सिद्ध करून दाखवावें.

यंदाच्या समारंभास गेल्या बुधवार पासून अलाहाबादेस सुरुवात झाली. प्रथमतः आनरेबल अयोध्या नाथ पंडित यांनीं सभेस आलेल्या गृहस्थांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानिले आणि नंतर सभेच्या पूर्वी व्यवस्थे-स्थेस काय काय विघ्नें आलीं तीं सांगितलीं. 'लौदर क्यासल' येथें राष्ट्रीय सभेचा दरबार हल्लीं भरला आहे ती जागा मिळण्यास मोठी पंचाईत पडली. सरकारी मदत कांहीं एक मिळाली नाहीं. सभेस येणाऱ्या लोकांचें आदरातिथ्य आनरेबल पंडित यांच्या अध्यक्षतेखालीं होत आहे म्हणूनच सभेची व्यवस्था सुयंत्र लागली. सभेस आलेले गृहस्थ अनेक धर्मांचे आणि अनेक पंथाचे आहेत आणि त्यांचे भोजनादि व्यवहार भिन्न भिन्न प्रकारचे आहेत तरी सर्वांस त्यांच्या त्यांच्या धर्मा प्रमाणें राहण्यास सोयीदार पडेल असा बादशाही डौलावर उत्तम बेत ठेविला आहे. खाण्यापिण्याच्या खर्चाबद्दल प्रत्येकास दहा रु. द्यावे लागतील तरी खर्चाच्या मानानें सर्व व्यवस्था फारच सुरेख होत आहे. राष्ट्रीय सभे सारख्या संस्थे पासून रशियन सरकारास हिंदुस्थानांत पाय शिरकविण्यास सुगम मार्ग सांपडेल असा कांहीं आक्षेप काढीतात तो निव्वळ चर्कीचा आहे कारण राष्ट्रीय सभेची मूळ स्थापना इंग्रज सरकारच्या संमतीनें झाली आहे आणि इंग्रज सरकारच्या छत्राखालींच तिची शाश्वती आहे रशिया हिंदुस्थानावर कंबर बांधून चालून येत आहे ही बातमी चोहोंकडे पसरली तेव्हां दान वर्षीमागें आमच्या राजेरजवाड्यांनीं किती मोठी मदत दिली आहे हें विसरतां कामा नये. विलायतेंत कांहीं मंडळींचा चुकीचा समज झाला आहे कीं राष्ट्रीय सभेविषयीं हिंदुस्थानांतील बडे लोक, राजेरजवाडे आणि हुशार लोक हे प्रतिकूल मतांचे

आहेत. हे मोठमोठे गृहस्थ कोण कोण आहेत हें पाहूं गेलें असतां फार करून गर्भश्रीमान, विदेशी बडाई मारणारे आणि हडबाड्यानें इंग्रज सरकारचा सदोदित स्तोत्र पाठ म्हणणारे असे गृहस्थ आढळतील.

पंडित अयोध्यानाथ यांचें सुरस व मुद्देदार भाषण संपल्या नंतर मि. फेरोजशा मेथा यांनीं मि० यूल साहेबांस चालू समारंभाचे प्रेसिडेंट नेमण्याची सूचना केली आणि त्या सूचने प्रमाणें मि० यूल स्थानापन्न झाले. हे गृहस्थ कलकत्त्याकडे बांधीत मशहूर आहेत कलकत्त्याचे कांहीं दिवस शेरीफ होते तेव्हां त्यांनीं आपला प्रचार हिंदियन शाळा बांधवि-ण्याकडे खर्चिला हे आणखी मेम्बर आफ कामर्सचे प्रेसिडेंट आहेत. सारांश यंदाचे प्रेसिडेंट ही मि. बनरजी मि. दादाभाई नवरोजी. मि० बद्रुद्दीन तय्यबजी इत्यादि गृहस्थांच्या बरोबरीचे आहेत. प्रेसिडेंट मि. यूल साहेब यांचें भाषण पुष्कळ लांबलचक असून वागलें मुद्देसुत झालें. सन १८५७ साला पासून हाऊस आफ कामन्स कडील हिंदुस्थान संबंधानें प्रश्न निघत आहेत त्या श्रमाणेंच अक्षरशः राष्ट्रीय सभेचे सरकार पाशीं मागणें आहे असें सप्रमाण त्यांनीं स्पष्ट करून सांगितलें. लंडन कौन्सिल हिंदुस्थानची राज्यव्यवस्था ठेवीतो ती अनेक प्रसंगीं अपयाची होते तर महाराणी सरकारच्या सुप्रसिद्ध जाहिरनाम्या प्रमाणें नेटिव लोकांस राज्यसंबंधीं योग्य हक्क मिळावे आणि नेटिव लोकांचा राजकीय उन्नति होण्यास कारणीभूत साधनें लोकांस अनुकूल असावीत. प्रेसिडेंटचें भाषण आटपल्यावर महत्वानें कांहीं ठराव झाले ते येणेप्रमाणें:—

१ आयव्यय कौन्सिलांत लोकांच्या वतीनें सभासद असावेत; २ उच्च पदाच्या सरकारी नोकऱ्या नेटिव लोकांस हल्लींपेक्षां ज्यास्त सुलभ असाव्या; ३ न्याय मुलकी आणि मुलकी कामें एकेका व्यक्तीकडे असूं नयेत ४ युरोपियन लोकांप्रमाणें नेटिवांस हा फौजदारी खटल्यांत ज्युरीचा उपयोग घ्यावा यावा ५ पोलीस खात्यांत विशेष फेरफार व्हावे पाहिजेत ६ लष्करी खात्यांतल्या मोठमोठ्या पदवीचे अधिकार योग्यते प्रमाणें नेटिवास हीं देण्यांत यावेत ७ युरोपियन किंवा युरोपियन लोकांस मिलिटरी शिक्षण मिळतें त्या प्रमाणें नेटिवांस देण्यासाठीं कांहीं शाळा स्थापाव्या आणि ८ हत्यारांचा कायदा, इनकम ट्याक्स इत्यादि प्रकरणांत मजेत सुख हीं याच्यासाठीं पुष्कळ फेरफार होणें आवश्यक आहे.

काफर्ड जुबिली— सर आरथर क्राफर्ड साहेब आमच्या वऱ्हाडांस मशहूर आहेत तेव्हां याची पूर्वपीठिका निराळी सांगण्याचें प्रयोजन नाहीं. साहेबांची शहामत खरी कीं पुष्कळ खटल्यांची चौकशी संपली तरी म्हणण्यासारखा निश्चयात्मक आरोप शाबीत होऊं नये. पाहतां पाहतां काफर्ड कमिशनची पन्नासाची बैठक होत आली तरी खटलें संपलें नाहींत पण उलटें कांहीं नवीन जोडले आहेत. त्या मानानें पुढें कन्या लोकांचा निर्णय होईपर्यंत किती लक्षांचा चुराडा उडतो पाहावें. सरकार तिजोरींतले पैसे उधळणार आणि प्रजेची नि-

नाकारण नागवणूक होणार!

राशियाचे ग्रांड ड्यूक अलेक्झांडर यांची स्वारी हिंदुस्थानांत आली आहे आणि ते सध्यां काशीचे महाराजांच्या राजवाड्यांत राहून आहेत. हिंदुस्थान पाहण्याची एवढी उत्कट इच्छा कां झाली हें समजत नाहीं.

सिंधप्रांत पंजाबास जोडल्यामुळें मुंबई इलाख्याचें बहुत मोठें नुकसान होईल म्हणून मुंबई सरकारानें हिंदुस्थान सरकारकडे तें प्रकरण दुबार पाठविलें पण सिंध प्रांत पंजाबांत सामील करण्याचा लार्ड डफरिनचा बेत मात्र दिसून येतो.

अंमरावतीतलीं हत्यें उकलत येण्यास ज्या प्रसंगीं मांडलतट पुष्कळ प्रकारें उपयोगीं पडतात त्याप्रमाणें नाशीक हायस्कूल हेडमास्तर रा. रा. हिरपाठक यांजवर त्यांचे असिस्टंट रा० रा० पळनिटकर यांनीं कांहीं अनन्वित कृत्याबद्दल बडी तोहमत आणली आहे. सृष्टि विरुद्ध कर्में करण्याचा आरोप रा. रा. हिरपाठकावर आला आहे तो त्यांनीं दूर करावा नाहींतर नोकरी सोडून तत्काळ दूर केले जाईल असें सरकारांतून त्यांस निक्षून ताकीद मिळाली आहे. या विषयीं खटला पण्याचे माजिस्ट्रेट फ्रांकस साहेबापुढें चालला आहे. रा. रा. हिरपाठक मुख्याध्यापक ह्या तारखेस गैर हजर राहिल्यामुळें कोर्टानें त्यांस चार जामिनदारी नेमल्या केल्या आहे. या खटल्यांत निर्णय कांहीं ही ठरो पण शाळाखात्यांतील मुख्य मुख्य अधिकाऱ्यांवर असले आरोप येणें हें मुलांच्या नीतिशिक्षणास अपायकारक आहे

The Berar Samachar

MONDAY DECEMBER 31, 1888.

## THE NATIONAL CONGRESS. (AT ALLAHABAD).

The fourth annual gathering of the National Congress commenced its meetings from Wednesday last at Allahabad. The Congress-camp with its banners—red, green and white—has far excelled even a Durbar Hall of a Mogul Emperor or a British Viceroy. The Lowther Castle where the Congress sits is now full of life and activity. The whole scene is, as it were, encircled by the National Spirit in its most loyal and patriotic movements. As one of the greatest holy-places in *Hindustan* are now centered all the Indian Nationalities which abound in varied castes and creeds with their different dialects prevalent in the whole extent of the Indian Empire. The Congress at Allahabad represents in a more vivid light than it did in the previous years all what constitutes birth, wealth native rank and high official *status* which in their complicated combinations form the representative majesty of the whole nation. Nearly two thousand delegates have been elected throughout India; of this number more than one thousand and two hundred have attended the Congress of this year. The delegates owe their heartfelt thanks to the Honorable Ajudhia Nath Pandit the President of the Reception

Committee. Inspite of all the obstructiveness and ill nature of the Anti-Congress parties the reception and the accomodation of the delegates from all parts of India have been done on a grand scale which speaks volumes in favour of the loyal patriots that have got up the Reception Committee. The people at large would have also to thank their delegates for their honorable move in the matter even when they are touched in their purses.

After having offered a hearty welcome to those assembled there the President of the Reception Committee told his story of the difficulties he had to grapple with in his connection with many civil and military authorities.

After the Honorable Pandit's thrilling and enthusiastic speech was over the Honorable Pherozshah Mehta M. L. C. comes to the business of nominating a President and at once puts himself in harmony with the audience by describing the past presidents.

"At Calcutta, he said, one president was that 'blackman' of whom Lord Salisbury has spoken, but who is esteemed and loved from one corner of India to the other, Mr. Dadabhai Naoroji. This remark was received with great applause, and loud cries of 'shame'. Mr. Mehta paid a well-deserved tribute to Mr. Yule, pointing out that while Sheriff of Calcutta, he devoted the fees of that office to the support of Indian schools. The nomination was seconded by Sirdar Dyal Singh, the premier Sikh noble of the Punjab, who sat to the right of the President's chair while a Mahomedan talukdar from Oudh and a Madrasi Hindu mofussil merchant and manufacturer, supported the nomination. Mr. Yule having been taken to the Presidential chair amidst very great applause, at once proceeded to deliver what was evidently a very carefully prepared and well considered address. Mr Yule's address proved to be a plea for quasi representative Councils after the manner suggested in the tentative scheme put forward by the Congress two years ago as an assistance to our law makers when they are really to listen to the Congress prayer. One most significant incident, shortly after the address was commenced, must be mentioned as indicating the loyalty of the a[illegible] 'veiled seditionists.' A three fold reference to the Queen, to her proclamation as a half fulfilled charter of India's rights, and to the proclamation having been first read and published in that very city of Allahabad in which they were assembled, proved too much for the continued equanimity the audience: Led by Mr. W. C. B. Bonnerji they greeted the first mention of the sovereign's name with three cheers heartily given. The address is, as I have said, no common or common-place production. It is full of matter which hostile critics will find hard of digestion. If it had a special object, that object was clear seen to be an attempt to convince non official Europeans that it was to their interest as well as to the interest of the State that they should support the prayers of the Congress."

---

Severa important subjects were discussed at large and the following 8 resolutions that were unanimously carried out command our fullest attention:—

(I). That the members of the National Congress deem it necessary to expand and enlarge the present constitution of the supreme legislative council and widen its representative character so as to represent correctly as far as possible, the wants and [illegible]kes of the millions of the soil. (II) That there should be established in India military college to train and discipline native soldiers so as to draw upon the native martial intelligence and ability. The Viceroy Lord Dufferin has moved the Home Government for India on the same subjec with a view to utilize the native military taken to the utmost possible extent. (III) In connection with the same subject it was also resolved that higher military service should be thrown open to natives of tried ability and intelligence. The late Viceroy has proposed a scheme to the Home Government that the armies of native princes should be disciplined by European officers and as to fight side by side with their compeers the European soldiers and should be employed, as far as possible in the offensive and defensive military operations of India. (IV) That Natives of higher intelligence and abilities should be admitted into the higher branches of administration. To achieve this result, there should be two simultaneous examinations in England and India and a student who stands the test should stay in England for a year to acquaint himself with English manners and customs, to get a clear conception of their political and economical views so that the native public servants should work satisfactorily with their Egulish colleagues in the higher public service. (V) The evils resulting from the amalgamation of the two branches of the administration i. e. judicial and executive are too obvious to be further enlarged upon. The members of the Congress have this year again reaffirmed the resolution of the last Congress that the revenue and judicial branches of the administration should be separated. The sixth resolution unanimously passed concerningthe right of trial by Jury. In the present advanced position of the natives of India, it is but necessary that they should enjoy this right so that there should be no miscarriages of justice which are likely to occur through the individual whims and personal prejudices of a single judge. The seventh resolution passed by the Congress relates to the reform of the police administration. The late Viceroy has admitted in his last political harangue at St. Andrew's Dinner that the existing police administration is defective and stands in need of immediate reform. The eighth and the last resolution was that the present Arms Act, Abkari Acts, and Excise Act, and the income tax Act work oppressively on the subject classes and should therefore, be modified so as to agree with the means, wants and manners of the people

It has been further resolved by the Congress that there should be a conference of the delegates to discuss social topics and that was to be held on sunday last.

## THE NEW JUDICIAL SCHEME.

The Judicial Scheme for Berar has received the sanction of the Supreme Government and will be brought into force from the 1st January 1889. Many of our contemporaries have criticised it and shown its merits and demerits. We for the present refrain from giving our opinion as to the good or evil that will result from the same to our Province but we cannot but express the opinion that the central idea of our Supreme Government is nothing less than the good of the people entrusted to them by His Highness the Nizam's Government. This being our firm conviction, whatever has received the sanction of so wise a ruler as our Ex-Viceroy, cannot be unproductive of good to the people. When the scheme is placed before us we shall then fully discuss its merits and demerits. Be that as it may, we havesome few things to suggest to the Resident in connection with the new scheme. A High Court in a Province means an establishment of a complete judiciary system. Such has been the invariable understanding of people of Provinces where High Courts have been instituted. In regard to appointments of Judges subordinate to the High Court the rule is to recruit the subordinate judiciary service from among pleaders of recognised ability and reputation. In fact, the reason why the Bench is held in utmost esteem is, that the Bench is composed of persons who have far greater legal knowledge and experience in the profession than the practising pleaders. The opinions of a judge in regard to legal questions are honoured with due respect. The Bar then learns to look upon the Bench as the repository of legal learning. Such of the counsels or pleaders who have earned complete proficiency in the profession are raised to the Bench and thus feelings of emulation are created in the minds of practising lawyers and work of a superior order is secured by the administration when it secures for its own use the services of well trained legal practitioners. We have amongst us in the Province a few if not many who deserve to be raised to the Bench. A few of them are indeed qualified to hold the responsible positions of Assistant Commissioners and there are others who though holding no University degrees are entitled by their long and successful practice to hold positions of E. A. C. Men of the first order are Messrs Mudholker, Jog, Joshi, Pandurang Govind and Deorao Vinayak &c. Excepting the single instance of Mr. Khaperde, no gentleman was elevated to the *Benches* from amongst practising lawyers. Elevation to the high officials if not favouritism could secure for men positions of responsibility and trust. This course of administering affairs of the Province cannot stand the times when the new Judicial Scheme will come into force. Subordinate Judges of recognized ability will only stand the uncompromising sifting of men and things before the High Court Judicial Commissioner and the practising counsel and pleaders engaged therein. So our prayer to the Resident is to make a small beginning in this matter by raising some one or another of the practising lawyers to the seat of Extra Assistant Commissioner or Assistant Commissioner.

---

A telegram to the President of Congress from the Secretary of the Mahomedan Association at Yeola.- The Mahomedan community here of 5,000 members sympathise with the Congress and wish it every success.

---

## वऱ्हाड.

मि० माणिकशा रतनजी दस्तुर ए. अ. क. खामगांव यांची येथें बदली झाली, व क्यापटन ग्यारिट अ. क. उमरावती यांची खामगांवास बदली झाली, असें म्हणतात.

मे० कमिशनर साहेब व डायरेक्टर साहेब यांच्या स्वाऱ्या बुलढाणें जिल्ह्यांत आहेत.

युनिव्हर्सिटी फायनल स्कूल परीक्षा व्हावी अशा बद्दल मुंबई सरकारचे ग्याझीटांत ठराव प्रसिद्ध झाला. पहिले परीक्षा ता० २ दिसेंबर १८८९ रोजी सुरू होणार. ही परीक्षा इकडे लागू करणार किंवा कसें हें अद्याप पक्के समजलें नाहीं.

रावसाहेब देवराव विनायक हे अलाहाबादेहून परत येई पर्यंत त्यांचें क्लार्क प्रेसिडेंटचें काम रा. रा. कृष्णाजी हरी तहशिलदार पहातील.

चालू सालच्या म्याट्रीक्युलेशन परीक्षेंत ३१४२ उमेदवारा पैकी ८३६ उमेदवार पसार झाले आहेत त्या मध्यें वऱ्हाडांतील ४७ उमेदवारा पैकीं १९ पसार झाले आहेत त्यांची नांवें येणे प्रमाणें:—

अकोला हायस्कूल— पांडुरंग बाळकृष्ण चांदेकर, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, नामदेव सदाशिव पाटील, वामनकृष्ण सहस्त्रबुद्धे, श्रीधर परशराम सोमण, गोपाळ बाजाजी शुक्ल. दिनकर जैराम वहाळकर,, शंकर पांडुरंग वैद्य; खाजगी विद्यार्थी— विष्णु बाळकृष्ण मराठे आणि पंढरीनाथ रंगो दातार.

उमरावती हायस्कूल— महादेव [illegible] देशपांडे, निळकंठ गोविंद देशपांडे, दत्तात्रेय वासुदेव गोखले, भास्कर वामन जोशी, बळवंत यादव कोल्हटकर, श्रीधर रामचंद्र पाटणकर, एकनाथ नारायण तारे, दत्तात्रय विठ्ठल सरजा[illegible]

एकंदरीनें अकोला हायस्कुलांतुन आणि उमरावती हायस्कुलांतुन सारखी मंडळी पसार झाली हें फार उत्तम झालें. आता दोन्ही हायस्कुलांतील हेडमास्तरांच्या गुणदोषांचें निरूपण करण्याचें काम लोकांच्या हातून यानें हायस्कुलांनी हिरावून घेतलें हें पाहून बहुतेक निष्पक्षपाती लोकांस आनंद होईल.

---

नोटीस

ते॥ रा. रा. रंगराव पुरुषोत्तमराव देशपांडे यांचे शवेशी

पुरुषोत्तम अच्युत देशपांडे यांचा सविस्तर नमस्कार विनंति विशेषः नोटीस देण्यास कारण कीं मी आपणास हिश्या करितां फार वेळ म्हटलें असतां आपण माझा हिस्सा मला देत नाहीं करितां या नोटशीच्या द्वारें कळवितों कीं नोटीस पोचल्या पासून बारा दिवसांचे आंत माझा हिस्सा मला मिळावा नाहींतर आपली कोणती अट असेल ती मला कळवावी. आपण जर कळविणार नाहीं तर योग्य रितीनें तजवीज करण्याची आपली आज्ञा घेतों. तारीख २९ माहे दिसेंबर सन १८८८ इसवी.

सही.

पुरुषोत्तम अच्युत देशपांडे बाळापुर.

दस्तुर खुद.

---

## वर्तमानसार.

अपघात— गेले शुक्रवारी अस्तमानीं लष्करी येथें ल्यांकाशायर फ्युसिलियरपैकीं चाइल्ड नांवाचा सोल्जर, बंदुक साफ करीत असतां, तींत भरलेला बार एकाएकीं उडून तींतली गोळी शेजारीं उभा असलेल्या दुसऱ्या सोल्जरास लागून त्याचा प्राण गेला. चाइल्ड यांस कैद केलें आहे.

वऱ्हार प्रांतात चालू सालीं इतकी विलक्षण थंडी पडली आहे कीं रब्बीचीं पिकें नकुल[illegible] झालीं आहेत.

चांगल्या जनावरांची समृद्धि होण्यास उत्तम, साधा व साधण्याजोगा मार्ग झटला ह्मणजे त्यांच्या जातींत सुधारणा करणें हाच होय. आतां या देशांत ज्या ज्या ठिकाणीं उत्तम उत्तम जाती आहेत व ज्यांची जिकडे तिकडे वाढ आहे त्याच जातींपासून फक्त यापुढें उत्पत्ति करविण्याची तजवीज आतां पासून केली पाहिजे. वाईट जातीची उत्पत्ति होणें ज्या साधनांनीं टळेल ती तजवीज अवश्य केली पाहिजे. आतां ही तजवीज गरीब हिंदुस्थानच्या हातून होणें दुरापास्त गोष्ट आहे. ही सरकारकडूनच झाली तरच होईल. हल्लीं इंग्रज सरकारनें या देशांत ठिकठिकाणीं वळू वगैरे ठेवून घोड्यांच्या उत्तम उत्तम जाती तयार सुलभ रीतीनें व्हाव्या ह्मणून एक निराळें खातें काढून त्या करितां व्यवस्था ठेविली आहे. असाच किंवा याहून कांहीं जास्त सधारलेला मार्ग काढून सरकारनें गाय, बैल उत्तम तयार होण्याचें साधन करून व हाएक जागा योजून हें काम वळू घोड्याचे खात्यास जोडून कांहीं लोक पैदास्तीस ठेवण्याचा खर्च सरकारनें इतर मुलकी पोलीस खात्याप्रमाणें सरकारी अंगावर सोसला पाहिजे. खरोखरा गोष्टीचा विचार सरकार अवश्य करितें करितें, व त्यांत सरकारच्या पदरास कांहीं खार लागण्याची वेळ आली कीं, सरकारचे ठरावीक उत्तर "सध्या सरकार या कामांत हात घालूं शकत नाहीं; व तसें करण्याची सरकारास तूर्त पैशाच्या टंचाईमुळें गरज दिसत नाहीं" वगैरे आपल्या हरदासाच्या कथेंतील जसें काय पालुपदच असें येतें. दुःखांत दुःख व डागावरडाग अशी आपणा आपेजनावर सध्यांचा वेळ आली आहे. सुधारणेचा मार्ग सरकारनें काढणें हें मग्र राहूंद्या एका बाजूला. शे०

लार्ड डफरीन साहेबांनीं राष्ट्रीय सभेविरुद्ध जें भाषण केलें तें त्यांनीं एकदम सेंट आंड्रयु सभे पुढें येऊन केलें नसून पूर्वींच लिहून ठेवलें होतें इतकेंच नसून त्यांनीं छापवून घोकून घोकून पाठ केलेलें होतें न्होंवास प्रांतांतून परत येतें वेळीं त्यांनीं तें लिहिलें व लिहितें वेळीं त्यांच्या पुढें सर बुइलसन यांच्या भाषणाची छापील प्रत पुढें ठेविली होती. आपल्याकडून पाठ करवेल तितकें यांनीं तें पाठ केलें होतें. हें यांचें व्याख्यान पूर्वीं जाड्या अक्षरांनीं छापविलें व तें त्यांनीं सेंट आंड्रयु सभे पुढें जात वेळीं गुपचुप खिशांत ठेवलें होतें अशा कडेकोट तयारीनें गेल्यावर त्यांनीं भाषणास सुरुवात केली, दुर्दैवानें त्यांची आठवण तितकी जागृत नसल्या मुळें मध्येंच ते विसरले! मग काय पाय हालवटले, तव तेंच वाक्य पुन्हा उच्चारिलें, [illegible] केलें तरी पुढचे कांहींच आठवेना मग हळूच आपल्या खिशांतील छापील प्रत [illegible] काढली व मग जें [illegible] झालें तें जसें कांहीं बृहस्पती बोलतो आहे या वेळीं लार्ड डफरीन जर एखादे पक्के श्रीन कामगार असते तर त्या सभेंत त्यांची टर झाली असती पण हे हिंदुस्थानचे व्हाइसराय असल्या मुळें सर्व श्रोते मंडळी तोंडांत मारल्या प्रमाणें स्वस्थ बसली यांचें हें घोकीव भाषण झालें या वेळीं इतर श्रोते मंडळी मोठ्या मोठ्यानें गप्पा मारीत होती.

निझामाच्या राज्यांतील दरोडखोर युरोपियन मायनिंग कंपनी व निझाम यांच्यांत खाणी संबंधानें समेट झालें असें जें बाहेर आलें आहे तें खोटें असून निझामानें या कंपनीस चांगल्या सवलती दिल्या असून त्या ती कंपनी कबूल करीत नाहीं यावरून हें प्रकरण इतक्यांत मिटेल असें वाटत नाहीं.

ठा० अ०

संस्कृत भाषा नको; कारण १–तिची गरज उरली नाही. २–तिच्या येगानें धर्मवासना शिथिल होत. ३–तिच्यांत शृंगार काजिल असतो, त्याच्या परिशीलनानें कोवळा मनें दूषित होतात व बिघडतात. ४–तिच्यांत वर्णांतकराचा बाऊ केलेला असून, ब्राह्मणेतरांचा ठिकठिकाणीं अपमान केलेला असतो व त्यांच्याविषयीं तुच्छ बुद्धि प्रदर्शित केलेली असते. ५–तिच्यांत ऐतिहासिक गद्य ग्रंथ बिलकुल नाहींत. ६–तिच्या प्रसारानें लोकसमूहाची स्थिति सुधरण्याचा बिलकुल संभव नाहीं. ७–स्वराज्य नसल्यामुळें ती निरवकाश झाली आहे. ८–राष्ट्रीय बुद्धीचा रोपा प्रत्येकाच्या हृदयांत लावण्याचें काम तिच्या हातून होणें नाहीं ९–तीतील हवा कष्टपणानें उग्र झालेली असल्यामुळें व इतिहासाचा तींत गंधही नसल्यामुळें, कोणींही चांगलें उदाहरण घालून देऊन आपलें नांव वंद्य करून व आपलें आचरण उदाहार्य करून ठेविलें तींत वाचण्यांत येत नाहीं.

मद्रास शहरांत ट्रामवे करण्याबद्दल एके [illegible] कंपनीस तेथील सरकारानें मंजुरी दिली आहे.

केरोसिन तेला विरुद्ध कट—सुरतच्या चौकी बाजारच्या कापडाच्या दुकानदारांनीं असा ठराव केला आहे कीं, जो कोणी आपल्या दुकानांत केरोसिन तेलाचा दिवा लावील त्यास चार आणे दंड द्यावा लागेल.

किताबाचा समारंभ त्रावणकोरच्या महाराजास सी. एस. आय. हा किताब देण्याचा समारंभ गेल्या मंगळवारीं झाला पाऊस फार पडल्यामुळें समारंभाच्या रंगांत थोडासा कमीपणा आला. याच दिवशीं व्यकटगिरिचे राजासही नाइट कम्यांडर इन्डियन आफ धी इंडियन यम्पायर हा किताब देण्यांत आला.

पांडिचेरी येथील पर्जन्यवृष्टि– मागील शनिवारपासून बुधवारपर्यंत पांडिचरी येथें पावसानें कहर केला. मंगळवारीं पुर आल्यामुळें व्यापारही बंद होता वारा नव्हता त्यामुळें नुकसान मात्र फार झालें नाहीं

जुनें देवालय—कलकत्या जवळ चुनार येथें एका गुंफेत लष्करी खात्याकडून कांहीं खोदकाम चालले होतें. त्यांत उत्तम कारागिरानें केलेलें एक नकशीदार देवालय सांपडलें आहे. हें २००० वर्षांपूर्वी बांधलेलें आहे असें ह्मणतात.

ते. मि.

गेल्या जानेवारीपासून दर सहा महिन्यांनीं रशियन भाषेची एक परीक्षा या देशांत घेतली जाईल; व ह्या कामाकरितां एक निराळा परीक्षक नेमिला जाणार आहे ह्मणून समजतें.

बागलकोट तालुक्यांत हेरकल ह्या गांवीं एक स्वयंभु मारुतीची मुर्ति निघाली असून गुद्दस्त साली ती अगदीं लहान होती; परंतु चमत्कार ह्मणून इतकाच मानावयाचा कीं, ती मुर्ति यंदा दुनारें दोन हात वाढली असून तींत मनुष्याच्या आकृतीसारखे सर्व अवयव आहेत !!

गाजीपुर येथें एका मनुष्यानें दुसऱ्याजवळून ४० रुपये घेऊन त्याशीं आपल्या मुलीचे लग्न करून देण्याचें ठरविलें. लग्नाची तिथी पक्की ठरली. ह्या मनुष्यास स्वतःची मुलगी नसल्यामुळें त्यानें एक मुलास मुलीचें सोंग देऊन व एका डोलींत बसवून कांहीं अंतरावर आणिलें नाहीं तोंच त्यानें भोयांस डोली खालीं ठेवण्याची खूण केली. इकडे ती कृत्रिम नवरीमुलगी पळून गेली. पुढें ह्या फसवणाऱ्या मनुष्यावर खटला होऊन त्यांत त्यास दोन महिन्याच्या कैदेची शिक्षा झाली. ह्या जगांत कसकसें विचित्र लोक आहेत पहा!

न्या० सु०

*K. B. Rele and caclousco smosteffi.*
*PREPARATIONS.*

१ धातु पौष्टिक शक्तिवर्धक गोळ्या.

शरीर निरोगी सुदृढ करणाऱ्या गोळ्या ह्याच आहेत अति श्रमानें व हरएक दुसऱ्या कारणांनीं झालेली क्षीणता, मुखावरची निस्तेजता, पांडुरता, मनाची उदासीनता, जीर्णज्वरानें, हगवणीनें खोकल्यानें झालेली क्षीणता, स्वप्नावस्था, मस्तकशूळ, कटीशूळ, निद्रानाश, गंडमाळा, क्षयरोग, रजस्वलावस्थेमध्यें पोटांत दुखणें, धातु जाणें, वाईट स्वप्नें पडणें, हीं ह्यांच्या सेवनानें, नाहींशीं होऊन तोंडावर टवटवी येते मज्जातंतुस तीव्रता येऊन स्मरण शक्ति वाढते काम व अभ्यास करण्यास उल्हास येतो. तोंडास रुचि येऊन भूक लागते. पाचनशक्ति वाढते. तें प्रत्येकानें ह्याचा अवश्य अनुभव घ्यावा कि० १२ आणे

२ परम्यावर खात्रीचे बस्ताद औषध.

हें निरभीक अत्युत्तम त्वरित गुणकारी आहे. लघवीची जळजळ, तिडिक, धातु जाणें ही तात्काळ बंद होतात परमा कितीही जुना व हट्टी असला तरी निश्चयात्मक बरा होतो. कि० १ रु०

३ परम्यावर पिचकारीचें औषध.

हें ही परम्यावर रामबाण आहे. कि० ०८ आणे.

४ धुपणी ( प्रदर ) वर अमोलिक औषध

सर्व प्रकारच्या नव्या व जुन्या धुपण्या ह्यानें हटकून जलद बऱ्या होतात भूक फार लागते. रक्तवृद्धि होऊन शक्ति येते. किंमत १ रुपया.

५ धुपणीवर पिचकारीचें औषध

वरील औषधा बरोबर हे वापरल्यानें रोगी रोगमुक्त झाला नाहीं हें क्वचितच. किंमत ०८ आणे.

६ सर्व प्रकारच्या जखमांवर मलम

रेट्टा, चांदी, सर्व नव्या व जुन्या जखमा वाय इ० मीटविणारे मलम कापसें हेच कि० ८ आणे.

७ खोकल्यावर अचूक औषध.

ह्यानें कफ सुटा पडतो, पडसें, दमा जाती, क्षयाचा, डांग्या घशांत गुरगुरी होऊन येणारी इ० खोकले अचुक बरें होतात. कि. १२ आणे

८ तापावर रामबाण औषध.

हिंवताप, पाळीचाताप, अंतरताप; जीर्णज्वर, ह्यांवर तर हें रामबाण आहे. जंगल किंवा म्यालेरियल नांवाच्या तापावर हें प्रख्यात आहे ह्यानें भूक लागते अन्न पचतें. किंमत १२ आणे.

९ अजीर्ण, अतिसार, ह्यांवर औषध.

अजीर्ण, अतिसार. संग्रहणी, अग्निमांद्य, आमरक्ताची व साधी हगवण इ० बंद करण्यांत हें कधीच मागें हटलें नाहीं. किंमत १२ आणे.

ह्या औषधांच्या गुणाविषयीं ज्या अनेक सर्टिफिकीटा मिळाल्या आहेत त्यापैकीं एकाचा सारांशः—

"के. बी. रेळे यांस लिहावयास आनंद वाटतो कीं, मज कडे पाठविलेलीं सर्व (वरील) औषधीं मी उत्तम पुरुष तपासून पाहिलीं. तीं फार गुणकारी असून निर्भीक आहेत.

( सही ) डाक्टर वि. कि गोखले, "एम. ए. एल. एम."

सूचना--अनुपाना व कागद औषधा बरोबर असतो. घाऊक घेणारास चांगलें कमिशन मिळेल. प्याकिंग व पास्टेज शिवाय पडेल.

विशेष सूचना–आमच्या वरील औषधां शिवाय सर्व प्रकारची दुसरी विलायती औषधें जसें, पेनकिलर, क्लोरोडाइन, पेपरमिंट, कॉडलिव्हर ऑईल, नाना तऱ्हेचीं तेलें, मलम, मात्रा, पॉस्फास, टिकवरें, स्पिरिट्स, [illegible] फुलस्कॅप, वैद्यांस दवाखान्या करितां लागणारी औषधें व शस्त्रें. वृद्ध व तरुण यांचे उपयोगास लागणारे उत्तम पौष्टिक चूर्णें, मुद्दाम आणल्या शिवाय, लागणाऱ्या योग्य नजरांचे पाठविण्यांत येतील त्याच प्रमाणें औषधांशी व इतर पुस्तक हीं पाठविण्यांत येतील.

पैसे आल्यास किंवा व्हाल्यूपेएबल पद्धतीनें औषधें व इतर सामान पाठवूं नादारी पत्रें पाठवूं नयेत. पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करावा.

पत्ता. के. बी रेळे कंपनी, जुबिली मेडिकल हॉल कायमजी- पटेल ब्यांकरोड मुंबई

हीं औषधें सर्व इंग्रजी औषध विकणाराकडे व मालकाकडे मिळतील.

"TO THE DEAF."
A person cured of Deafness and Noises in the Head of 23 years, standing by a Simple Remedy, will send a description of it free to any Person who applies to J. H. Nicholson, 5 Old Court House Street, Calcutta.

राजमाचीकर व साठे न्यायाश्रयकर्ते पुणें यांनीं नवीन तयार केलेला.
हिंदुस्थानचा करांगचा आक्ट.
सन १८७२ चा ९ वा
कमजुतीच्या टिपा व मुंबई, कलकत्ता, मद्रास व अलाहाबाद हायकोर्टाचे नि-

वाड्यांचा मुद्दा
किंमत रु० २॥ व टपाल खर्च ०६ आ.
हीं पुस्तकें आमचे छापखान्यांत व सदाशिव काशीनाथ आणि कंपनी यांचे दुकानीं विकत मिळतील

☞ हें पत्र आकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.